



# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै, २०१७ • पृष्ठे १०० • किंमत १५ रुपये
• वर्ष सतरावे • अंक सातवा


दुरितांचे तिमिर जावो।
विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।
जो जे वांछिल तो ते लाहो
प्राणिजात॥

## आवर्जून वाचावे


# प्रकाशन समारंभ...
(कोल्हापूर)

## कुस्तीपंढरीत 'आखाडा'चे जोरदार स्वागत...




लाल मातीतला धोबीपछाड म्हणजे फक्त मर्दानी कामगिरी, हा पूर्वापार समज. पोटच्या पोरींना मैदानात उतरवत महावीरसिंग फोगाट यांनी त्या समजाला लाल मातीतच समाधी दिली. 'दंगल' सिनेमानं फोगाटांच्या या कामगिरीला लोकप्रियतेचे नवे आयाम दिले. या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाच्या आयुष्याचा पट सौरभ दुग्गल लिखित 'आखाडा' पुस्तकानं वाचकांसमोर आणला. मेहता पब्लिशिंग हाऊसने हा 'आखाडा' मराठीत आणला आहे. कुस्तीपंढरी असणाऱ्या कोल्हापुरातील शाहू स्मारक भवन इथं 'आखाडा'च्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन झाले. या प्रसंगी हिंदकेसरी गणपतराव आंदळकर, लेखक सौरभ दुग्गल, प्रकाशक सुनील मेहता, अनुवादक लीना सोहोनी, हिंदकेसरी दीनानाथ सिंग उपस्थित होते.

# मेहता मराठी ग्रंथजगत

। जुलै २०१७ । वर्ष सतरावे । अंक सातवा ।

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन सहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| लेखक परिचय | १० |
| उपक्रम | १४ |
| पुरस्कार | २० |
| करगिल दिन | २२ |
| आषाढी विशेष | ३० |
| व्याघ्रदिन विशेष | ४४ |
| यशोगाथा | ५० |
| स्मृतिगंध | ६६ |
| शब्द शब्द जपून ठेव... | ७४ |
| संध्या-छाया | ७८ |
| श्रद्धांजली | ८४ |
| स्मरण | ८६ |
| अभिप्राय | ९२ |
| बालनगरी | ९६ |



# संपादकीय

दिव्यत्वाची जेथ प्रचिती,
तेथे कर माझे जुळती...

बा. भ. बोरकरांच्या कवितेच्या या ओळींचा सार्थ प्रत्यय देणाऱ्या काही व्यक्ती असतात. यावेळच्या आपल्या ग्रंथजगतच्या अंकातून दिव्यत्वाची प्रचिती आपण घेणार आहोत. संत चोखामेळा आणि भागवत धर्म, जे.आर.डी. टाटा, मिसाईल मॅन डॉ. अब्दुल कलाम, कॅप्टन विक्रम बात्रा या व्यक्ती दिव्यत्वाची वेगवेगळ्या प्रकारे प्रचिती देणाऱ्या आहेत. भागवत धर्म आणि भारतीय सेना हे भक्ती-शक्तीचं रूपही दिव्यत्वाची प्रचिती देणारं. तर 'जोहार मायबाप जोहार', 'जेआरडी : एक चतुरस्र माणूस','योद्धा शास्त्रज्ञ राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम', 'परमवीरचक्र' (रणांगणावरील आपले महान योद्धे) या आमच्या पुस्तकांमधून या दीपस्तंभांचे हे प्रकाशकिरण वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा आम्ही प्रयत्न केला.

हे दीपस्तंभ वेगवेगळ्या काळातील आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रांतील आहेत; पण मन:शक्ती, निष्ठा, उदात्तता, झोकून देण्याची वृत्ती, धाडसीपणा आणि मानवता ही गुणवैशिष्ट्यं हा त्यांच्यातील समानतेचा धागा आहे. या व्यक्तींचं कार्य पुस्तकरूपाने लोकांपर्यंत पोहोचत असतं; पण 'या व्यक्तींचा जीवनपट प्रेरणादायक आहे. आम्हाला त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या गोष्टी समजल्या' इतपतच या पुस्तकांची फलश्रुती असते. अशा पुस्तकांवरून प्रेरणा घेणाऱ्यांचं प्रमाण नगण्य

आहे. सर्वसामान्य माणसाचा समज असा असतो, की या लोकांइतकं मोठं होण्याची पात्रता आमच्यामध्ये नाही; पण काही वेळेला ती पात्रता असूनही माणसं काम करायला घाबरतात.

मोठं होणं म्हणजे नावारूपाला येणं, हा आणखी एक गैरसमज माणसांच्या मनात असतो. उपरोल्लेखित व्यक्तींनी नावारूपाला येण्यासाठी काम केलं नाही. त्यांनी आत्मोन्नती आणि देशाची उन्नती यासाठी काम केलं आणि त्यांच्या बहुमोल कार्यामुळे ते नावारूपाला आले. या लोकांच्या सकारात्मकतेतील नेमका कोणता पैलू या लोकांना सर्वसामान्य लोकांपेक्षा वेगळं ठरवतो, याचा विचार आपण करणार आहोत.

चोखामेळा यांचा जन्म शूद्र जातीत झालेला. तत्कालीन समाजात शूद्रांच्या वाट्याला जी अवहेलना यायची, ती चोखोबांच्याही वाट्याला आली. त्याबद्दल त्यांनाही विषाद वाटत होता; पण विठ्ठलाच्या दर्शनाला जरी सवर्णांनी मला बंदी घातली, तरी माझ्यातलं आणि विठ्ठलामधलं अद्वैत कुणीच हिरावून घेऊ शकत नाही. माझ्या अंतरंगात विठ्ठलाचं दर्शन मला सदैव होत राहणार आहे, या विश्वासाने चोखोबांनी जीवन व्यतीत केलं. त्यामुळे त्यांच्या हातून अलौकिक अशा अभंगांची रचना झाली आणि त्यामुळे शूद्रत्वाची भावना गौण ठरली.

जे. आर. डी. टाटांच्या शिरावर टाटा उद्योग समूहाची धुरा आली, तेव्हा ते वयाने लहान होते. इंजिनियर होण्याचं त्यांचं स्वप्न होतं; पण ते अपुरं राहिलं; मात्र ती खंत मनात असूनही वडिलांची इच्छा शिरसावंद्य मानून त्यांनी टाटा उद्योग समूहाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली आणि ती समर्थपणे पेलली. गुणग्राहकता, उत्तम नेतृत्वगुण आणि मुख्य म्हणजे कर्मचाऱ्यांबद्दल मानवतेची दृष्टी यामुळे टाटा उद्योग समूहाचा त्यांनी यशस्वीपणे विस्तार केला. थोडक्यात, आपली जबाबदारी निष्ठेने पार पाडून पुढच्या पिढीसाठीही त्यांनी बरंच काही करून ठेवलं.

अब्दुल कलामांकडे बुद्धिमता होती आणि आपल्या देशाच्या संरक्षण सिद्धतेत आपण मोलाचं योगदान देऊ शकतो, हा दृढविश्वास होता; पण कलामांच्या या बुद्धिमत्तेला आणि इच्छेला सरकारच्या इच्छाशक्तीचीही गरज होती. काही वेळेस असेही प्रसंग आले, की जीव ओतून केलेलं काम पूर्णत्वाच्या अगदी जवळ पोहोचलेलं असताना केवळ वरून आलेल्या

आदेशामुळे थांबवावं लागलं. एखाद्या महत्त्वाकांक्षी, बुद्धिमान शास्त्रज्ञासाठी यासारखी दुसरी दु:खदायक गोष्ट कोणतीही नसेल; पण तो सल बाजूला ठेवून ते सदैव पुढच्या संशोधनासाठी सज्ज राहिले. म्हणूनच योग्य संधी मिळताच महत्त्वाच्या पाच क्षेपणास्त्रांची निर्मिती आणि पोखरणची अणुबॉम्ब चाचणी त्यांच्या नेतृत्वाखाली झाली.

कॅप्टन विक्रम बात्रा हे तर देशसेवेचं मूर्तिमंत प्रतीक. शत्रूच्या गोटात शिरून त्याला नेस्तनाबूत करण्याचं अतुलनीय शौर्य त्यांनी गाजवलं. पॉइंट ४८७५ काबीज करण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांचं बलिदान दिलं आणि  परमवीरचक्राचे (मरणोत्तर) ते मानकरी ठरले. ज्या क्षणी लष्करी अधिकारी रणांगणावर लढत असतात, त्यातल्या एखाद्या क्षणी जरी ते मनाने दुर्बल झाले तर त्याचा परिणाम त्यांच्या सहकाऱ्यांवरही होऊ शकतो; पण कॅप्टन बात्रा हे आव्हानात्मक जबाबदाऱ्यांसाठी नेहमीच पुढे असत. 'ये दिल मांगे मोअर' असं ते नेहमी म्हणत.

तेव्हा यशस्वितेसाठी मन:शक्तीची किती गरज असते, हे वरील उदाहरणांवरून लक्षात यावं. केवळ मोठं होण्यासाठी नाही, तर माणूसपणाकडे वाटचाल होण्यासाठी मन:शक्ती महत्त्वाची असते आणि ती ज्याची त्यालाच मिळवावी लागते. चोखामेळा, जे. आर.डी. टाटा, अब्दुल कलाम, कॅप्टन विक्रम बात्रा यांसारख्या व्यक्तींची मन:शक्ती पुस्तकांद्वारे लोकांपर्यंत पोहोचत असते. ती मिळवण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला तर एक सुसंघटित आणि सुव्यवस्थित समाज निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

तेव्हा, अशा दीपस्तंभांचे प्रकाशकिरण सर्वांपर्यंत पोहोचावेत. या दीपस्तंभांना मन:पूर्वक वंदन!



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ५००रुपये

## डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

## सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पायर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.
संपर्क. ९८९०३९७१९८ / ९९६०३०९८०८

---

अधिक माहितीसाठी संपर्क
www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

amazon dailyhunt Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!


**इथे मिळतील ई-बुक्स...**

**www.amazon.com**

**m.dailyhunt.in**

**play.google.com**

**eBooks**



**Online पुस्तके खरेदी करा** **www.mehtapublishinghouse.com**

# लेखक परिचय



## माधवी देसाई

माधवी देसाई हे साहित्य वर्तुळातील एक उल्लेखनीय नाव. भालजी पेंढारकरांची कन्या आणि रणजित देसाईंची पत्नी अशी त्यांची ओळख असली तरी आपल्या साहित्य संपदेने त्यांनी स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या 'नियती', 'हरवलेल्या वाटा', 'मंजिरी', 'कांचनगंगा', 'प्रार्थना' या पाच कादंबऱ्या, 'धुमारे' हा ललित लेख संग्रह, 'सागर', 'किनारा', 'शुक्रचांदणी,' 'असं म्हणू नकोस', 'कथा सावलीची' हे कथासंग्रह मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहेत.

'नियती' ही नवरा-बायकोच्या नात्यावर वेगळ्या प्रकाराने प्रकाश टाकणारी कादंबरी आहे. मानसी ही एक सुंदर, सुशिक्षित, मध्यमवर्गीय तरुणी. रितेन हा श्रीमंत, देखणा तरुण तिला बघतो आणि तिच्या प्रेमात पडतो. तिच्यासमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवतो. दोन्ही घरातील मंडळींच्या संमतीने रितेन आणि मानसीचं लग्न होतं; पण लग्नाच्या पहिल्या रात्रीच मानसीच्या लक्षात येतं, की रितेन तिला शरीरसुख देण्यास असमर्थ आहे. हे कळल्यावर मानसी कोलमडते. तिच्या नणंदेचा मुलगा संतोष तिच्या प्रेमात पडतो आणि त्यांच्यात जवळीक निर्माण होते. त्या संबंधातून मानसीला मुलगी होते. रितेनसह घरातल्या सगळ्या माणसांनी या सत्याचा स्वीकार केलेला असतो; पण मानसी आतल्या आत जळत राहते. तिचा मनोसंघर्ष आणि रितेनचं व तिचं नातं, सत्-असत्‌चा, नीती-अनीतीचा झगडा या कादंबरीतून माधवीताईंनी अधोरेखित केला आहे.

‘हरवलेल्या वाटा’मधूनही नवरा-बायकोचं नातं उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. विजय हा एक प्रथितयश वकील; त्याची बायको रेणू. त्या दोघांना एक मुलगा. रेणूचं नवऱ्यावर प्रेम; पण विजयला तिचं हे प्रेम समजत नाही. विजयच्या कोरड्या वागण्याला कंटाळून रेणू मुलासह घर सोडून निघून जाते. विजयच्या जीवनात आभाही असते. अभाशी त्याची दाट मैत्री असते. आभाला वाटत असतं विजयने रेणूला घटस्फोट देऊन तिच्याशी लग्न करावं. दरम्यान, डॉ. तेजस्विनी आणि डॉ. प्रशांत यांच्या घटस्फोटाची केस विजयकडे येते. तेजस्विनीच्या वागण्या-बोलण्यातून स्त्रीच्या नवऱ्याविषयी काय भावना असतात, नवऱ्याकडून तिच्या काय अपेक्षा असतात, घटस्फोटित स्त्रीला समाजात कसं वागवलं जातं इ. बाबी विजयला समजातात आणि मग त्याला रेणू समजायला लागते. विजय आणि तेजस्विनीच्या भावांदोलनांचं समांतर चित्रण ही कादंबरी करते.

एका कलावंतिणीच्या घरात जन्मलेल्या जयाची कहाणी ‘मंजिरी’ या कादंबरीत सांगितली आहे. खानदानी घरातील मानसिंग शिर्क्यांचं कांचनमालाशी लग्न होतं; पण त्यांचे सूर जुळत नाहीत. मानसिंग जयाच्या गाण्याबरोबरच तिच्यावरही लुब्ध होतात. ते जयाशी लग्न करतात. त्यांना जयापासून एक मुलगाही होतो; पण मानसिंगांचा खून होतो आणि त्यांच्या मृत्यूनंतर कांचनमालाबाई पत्नी या नात्याने त्यांच्या इस्टेटीवर हक्क सांगू पाहतात. जया त्यांना आडवी येते. तिचं म्हणणं असतं, की तीही मानसिंगांची पत्नी आहे आणि तिचा मुलगा शिर्क्यांचा वारस आहे; पण कांचनमालाबाईंच्या दृष्टीने जया ही मानसिंगांची रखेली असते. जयाला इस्टेटीपेक्षाही मानसिंगांची पत्नी म्हणून स्वत:ला सिद्ध करण्यात जास्त रस असतो. जयाच्या जिद्दीची आणि तिच्या स्वत्वाची ही लढाई आहे.

‘कांचनगंगा’ ही तीन स्त्रियांच्या जीवनावरील कादंबरी आहे. अंजनीबाई मालपेकर, हिराबाई पेडणेकर आणि सुरंगा मुळगावकर या त्या तीन स्त्रिया. १९व्या शतकात गोव्यात जन्मलेल्या या तिघींविषयी माहिती मिळवून माधवीताईंनी ही कादंबरी लिहिली आहे. अंजनीबाई

एक श्रेष्ठ गायिका, हिराबाई पेडणेकर या महाराष्ट्रातील पहिल्या नाट्य-लेखिका, तर सुरंगा ही महान भारतीय चित्रकार राजा रवि वर्मा यांची प्रेरणा. या तिघींनाही आपल्या व्यक्तिगत जीवनात बरेच चटके सोसावे लागले, परंपरेविरुद्ध संघर्ष करावा लागला; पण या तिघींनीही उच्च जीवनमूल्यं जपली आणि आत्मिक उन्नतीचं 'कांचनगंगा' गाठलं, त्याची ही कहाणी आहे.

'प्रार्थना' या माधवीताईंच्या कादंबरीला कला अकादमी पुरस्कार आणि गोमांतक अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. ही कादंबरी साकारते गोव्यातील एका छोट्या गावातील फादर रॉबर्टच्या नजरेतून. एक अनाथ मुलगा गणेश ते फादर, असा या व्यक्तिरेखेचा प्रवास झालाय. फादर होण्यासाठी सगळे मोह रॉबर्टने निश्चयपूर्वक बाजूला सारले आहेत. तरीही कधी कधी त्याचं मन आसक्ती-विरक्तीच्या संघर्षात सापडत असतं. त्याच्या गावातल्या लोकांची दु:खं त्याला पाहवत नसतात. नुसत्या शाब्दिक प्रार्थनेने या लाकोंची दु:खं दूर होणार नाहीत, तर त्याला कृतीची जोड हवी, असा सल्ला त्याला देवतास्वरूप ग्लोरियाने दिलेला असतो. मग या लोकांची दु:ख दूर करण्याचं बळ रॉबर्टला कसं मिळतं, त्याच्या मनातील संभ्रम कसा दूर होतो, त्याचं चित्रण या कादंबरीत केलं आहे. गोव्यातील निसर्ग, एका छोट्याशा गावातील लोकांचे परस्परांशी असलेले संबंध, त्यांचं सामाजिक जीवन इ. बाबींचं दर्शन माधवीताईंनी या कादंबरीतून घडवलं आहे.

'धुमारे' हा त्यांच्या ललित लेखांचा संग्रह. त्या तीस वर्षांनी बांदोडला परतल्या. त्या निसर्गाच्या सान्निध्यात, परिपक्व वयात त्यांच्या मनाला फुटलेले धुमारे त्यांच्या या ललित लेखांतून व्यक्त झाले आहेत. या लेखांमधून त्यांनी काही व्यक्तिचित्रं रेखाटली आहेत, काही ठिकाणी त्या गावातील रूढी, परंपरांबद्दल आणि आजच्या काळात त्यांच्या बदलत्या संदर्भांवर भाष्य केलं आहे. एकूण, हे लेख विविधरंगी आहेत.

❖

## माधवी देसाई यांची साहित्यसंपदा

| **कादंबरी** | **किंमत** | **ललित गद्य** | **किंमत** |
|---|---|---|---|
| नियती | १२० | धुमारे | १२० |
| हरवलेल्या वाटा | १२० | **कथासंग्रह** | **किंमत** |
| मंजिरी | १५० | सागर | १०० |
| कांचनगंगा | २२० | किनारा | १२० |
| प्रार्थना | २२० | शुक्रचांदणी | १२० |
| | | असं म्हणू नकोस | १७० |
| | | कथा सावलीची | १९० |

**२री आवृत्ती**

एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या
जन्मरहस्याचे उत्कंठावर्धक नाट्य

# जॅपनीज ऑर्किड



मूळ लेखक
**रेई किमुरा**

अनुवाद
**स्नेहल जोशी**

**किंमत : २२० /-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

तेत्सुयो अकिनिचो... न्यूयॉर्कमधील एक प्रतिष्ठित, धनाढ्य उद्योजक, डीएनएचा बादशहा. त्याला जगाच्या दुसऱ्या टोकावरून धमक्यांच्या ई-मेल्स येऊ लागतात, ज्यात त्याच्या भयानक कौटुंबिक रहस्याचा उल्लेख असतो. एक असे रहस्य, जे उघड झाल्यास सर्व प्रतिष्ठा, नावलौकिक धुळीस मिळेल... तेत्सुयोचा वकील, त्याचा गुप्तहेर मित्र आणि एक इतिहासतज्ज्ञ मिळून या रहस्याचे धागेदोरे उलगडत नेऊ शकतील? जपानी ऑर्किडचं रहस्य जगासमोर येईल?

# उपक्रम दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडित वाचित जावे।।

श्री समर्थ रामदास स्वामी

**❋ वाचकांसाठी सुवर्णसंधी ❋**
**करा मैत्री पुस्तकांशी**
**'मेहता पब्लिशिंग हाऊस' चा नवीन**
**उपक्रम**

**१६ जुलै २०१७ ते १५ ऑगस्ट २०१७**
**दरम्यानचा दिनविशेष**

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.

authors@mehtapublishinghouse.com

# दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर
# ५०टक्क्यांपर्यंत सूट

## २२ जुलै - धनंजय बिजले यांचा जन्मदिन

‘लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा, अण्णा हजारे : भ्रष्टाचाराच्या विरोधातील भारतीय लढ्याचा चेहरा’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३४०/-**

*२२ जुलै ते २४ जुलैपर्यंत*

सवलत किंमत १७०/-

## २८ जुलै - जागतिक नैसर्गिक संरक्षण दिन

‘आपली सृष्टी **१०** पुस्तकांची मालिका, वसुंधरा, पर्यावरण प्रदूषण, वेध पर्यावरणाचा, वायू प्रदूषण’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २१२०/-**

*२८ जुलै ते ३१ जुलैपर्यंत*

सवलत किंमत १०४९/-

## २९ जुलै - शि. द. फडणीस यांचा जन्मदिन

शि. द. फडणीस चित्रित द. मा. मिरासदार यांच्या **२५** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३१५५/-**

*२९ जुलै ते ३१ जुलैपर्यंत*

सवलत किंमत २०४९/-

## २९ जुलै - जे. आर. डी. टाटा यांचा जन्मदिन

‘जे. आर. डी. टाटा यांची पत्रे, की नोट जे. आर. डी. टाटा, टाटा एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती, जे. आर. डी. एक चतुरस्त्र माणूस’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ११०५/-**

*२९ जुलै ते ३१ जुलैपर्यंत*

सवलत किंमत ६९९/-

## ३ ऑगस्ट – अनिल काळे यांचा जन्मदिन

‘मार्कर, ओल्ड सिटी हॉल, ओमेता, द फर्म, द फिस्ट ऑफ गॉड, द रेनमेकर, द रनअवे ज्युरी’ या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २६१०/-**

*३ ऑगस्ट ते ५ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत १३०५/-**

## ४ ऑगस्ट – राजीव तांबे यांचा जन्मदिन

राजीव तांबे लिखित **११** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ७३०/-**

*४ ऑगस्ट ते ७ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत ३९९/-**

## ४ ऑगस्ट – लीना दामले यांचा जन्मदिन

लीना दामले लिखित ‘अंतरिक्षाच्या अंतरंगात, कथारूपी खगोलशास्त्र’ पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २७०/-**

*४ ऑगस्ट ते ५ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत १६२/-**

## ४ ऑगस्ट – हिरोशिमा दिन आणि अँटी न्युक्लीअर दिन

वि. स. वाळिंबे लिखित ‘वॉर्सा ते हिरोशिमा’ पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत - ४००/-**

*४ ऑगस्ट ते ७ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत २४९/-**

## ६ ऑगस्ट – मैत्री दिन

‘चौघीजणी, टु ब्लु, मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा, फाईव्ह पॉइंट समवन, द थ्री मिस्टेक ऑफ माय लाइफ, एक

होता मित्र, दोस्त, अदान ॲण्ड ईव्हा, मैत्री अशी आणि तशी'
या पुस्तकसंचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - १९००/-**
*६ ऑगस्ट ते १० ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत ११९९/-**

## ८ ऑगस्ट - शंकर पाटील यांचा जन्मदिन

शंकर पाटील लिखित **२१** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत – २६१५/-**
*८ ऑगस्ट ते १४ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत १३०८/-**

.

## ११ ऑगस्ट - वि. स. वाळिंबे यांचा जन्मदिन

'नेताजी, वॉर्सा ते हिरोशिमा, वुइ द नेशन, वुइ द पीपल' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत – १३८५/-**
*११ ऑगस्ट ते १४ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत ८४९/-**

## १५ ऑगस्ट – स्वातंत्र्यदिन

'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया, फ्रिडम ॲट मिडनाइट, मोहनदास, परमवीरचक्र' या पुस्तकसंचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - १८१५/-**
*१५ ऑगस्ट ते १७ ऑगस्टपर्यंत.*

**सवलत किंमत ८९९/-**

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
website : www.mehtapublishinghouse.com

जानेवारी असो वा असो डिसेंबर
बारा महिने अनुभवा पुस्तकांचा बहर
महिन्यांच्या नावातलं निवडा आद्याक्षर
बारा महिने मिळवा दमदार ऑफर

## JULY महिना विशेष

**'J'** आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ६,०१५/-**

*१ जुलै ते ३१ जुलै*

**सवलत किंमत ४,०१०/-**

**'U'** आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३,६१५/-**

*१ जुलै ते ३१ जुलै*

**सवलत किंमत २,३५०/-**

**'L'** आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ५,०३५/-**

*१ जुलै ते ३१ जुलै*

**सवलत किंमत ३,२७३/-**

**'Y'** आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २,१८०/-**

*१ जुलै ते ३१ जुलै*

**सवलत किंमत १,४१७/-**

वरीलप्रमाणे **'J', 'U', 'L', 'Y'** या सर्व आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचासाठी कमीत कमी **३००० रुपयांच्या नेट** खरेदीवर **३७.५० टक्क्यांची** सवलत.
*१ जुलै ते ३१ जुलैपर्यंत*

## AUGUST महिना विशेष

**'A'** आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत - २२,२००/-**
*१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट*

**सवलत किंमत ११,१००/-**

**'U'** आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत - ३,६१५/-**
*१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट*

**सवलत किंमत २,३५०/-**

**'G'** आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत - ८,८००/-**
*१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट*

**सवलत किंमत ४,८९९/-**

**'S'** आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत - ३१,७६४/-**
*१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट*

**सवलत किंमत १७,४७०/-**

**'T'** आद्याक्षरापासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत - ३५,८१४/-**
*१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट*

**सवलत किंमत १९,६९८/-**

वरीलप्रमाणे **'J', 'U', 'L', 'Y'** या सर्व आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या पुस्तकसंचासाठी कमीत कमी **१०,००० रुपयांच्या नेट** खरेदीवर **४२.५०टक्क्यांची** सवलत.

*१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट*

# पुरस्कार

## ल. म. कडू, राहुल कोसंबी ठरले साहित्य अकादमी पुरस्काराचे मानकरी

साहित्य अकादमीचे मानाचे समजले जाणारे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले. वेगवेगळ्या विभागांसाठी हे पुरस्कार देण्यात येतात. त्यांपैकी युवा पुरस्कार आणि बालसाहित्य पुरस्कारांची घोषणा साहित्य अकादमीने केली. मराठी भाषा विभागात राहुल कोसंबी यांची युवा पुरस्कार, तर बालसाहित्यासाठी ल.म. कडू यांची निवड करण्यात आली आहे.

२४ भाषांमधील लेखकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. बहुमताच्या आधारे या साहित्यिकांची निवड करण्यात आल्याचे अकादमीने म्हटले आहे. ३५ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या साहित्यिकांची साहित्य अकादमीच्या युवा पुरस्कारासाठी निवड केली जाते. ५० हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.


मराठी भाषेत राहुल कोसंबी यांना ‘उभं-आडवं’ या कथासंग्रहासाठी अकादमीचा युवा पुरस्कार जाहीर करण्यात आला. तर कोकणी भाषेत ‘मोग डॉट कॉम’ या कवितासंग्रहासाठी अमेय विश्राम नायक यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

युवा पुरस्कारांसह साहित्य अकादमीने बालसाहित्य पुरस्कारांची घोषणाही केली आहे. ५० हजार रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारांमध्ये मराठीत ल. म. कडू यांना ‘खारीच्या वाटा’ या पुस्तकासाठी बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

❖

**२ री आवृत्ती**

# ॲन्ड देअरबाय हँग्ज अ टेल




**लेखक** – जेफ्री आर्चर
**अनुवाद** – डॉ. देवदत्त केतकर

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

'जाता जात नाही...'ची कथा भारतातील. दिल्लीच्या एका ट्रॅफिक सिग्नलजवळ थांबलेले असताना जामवाल आणि निशा प्रेमात पडतात... या पंधरा कथांपैकी एकीची ही सुरुवात. जेफ्री आर्चर यांना त्यांच्या जगभराच्या भ्रमंतीतून मिळालेल्या गोष्टींचा हा सहावा लघुकथासंग्रह – 'पारखी नजर' ही गोष्ट जर्मनीत घडते. एक अमूल्य तैलचित्र एका कुटुंबात दोनशे वर्षं असतं. पण एके दिवशी... 'फक्त सदस्यांसाठी' या खाडीतल्या बेटावरच्या एका तरुणाला नाताळच्या पोतडीत गोल्फ बॉल मिळतो, आणि त्याचं आयुष्यच बदलून जातं... 'हाउसफुल्ल'ची गोष्ट इटलीतील. हॉटेलात खोली घ्यायला गेलेला एक तरुण थेट तिथल्या रिसेप्शनिस्टच्या बिछान्यात पोहोचतो...'हाय हील्स' इंग्लंडमध्ये घडणारी घटना. बुटांचे जोड सहजासहजी का जळून जाऊ शकत नाहीत, हे एक स्त्री तिच्या नवऱ्याला सांगते...
काही गोष्टींनी तुम्हाला हसू येईल... काहींनी डोळ्यांत पाणी येईल... त्या तुम्हाला खिळवून ठेवतील, हे नक्की!

# वीरांची शौर्यगाथा

सैनिक हो, तुमच्यासाठी...
हा वीर-फुलांचा हार
तव पराक्रमांची गाथा
राष्ट्राला देते धीर.
बळ पायी तुमच्या आहे
हत्तींचे निश्चल, भव्य
तळहाती तुमच्या नाचे
देशाचे भविष्य दिव्य.
संग्रामी तुमच्या गोळ्या
विजयाची गीते गाती
अन् राष्ट्रीय समरसतेची
दृढ होती इथली नाती.

- ***आनंद यादव***

('सैनिक हो, तुमच्यासाठी...' या पुस्तकातून)

*भारतीय सेनेनं आपलं सामर्थ्य वेळोवेळी सिद्ध केलं आहे त्याच सामर्थ्याचा प्रत्यय भारतीय सेनेनं कारगील युद्धाच्यावेळेस दिला. भारतीय वीरांच्या अतुलनीय शौर्यामुळे कारगिलचं युद्ध भारताने जिंकलं; पण त्या युद्धात काही योद्ध्यांना आपल्या प्राणांचं बलिदान द्यावं लागलं. कॅप्टन विक्रम बात्रा हे अशा योद्ध्यांपैकी एक. त्यांच्या या बलिदानासाठी त्यांना परमवीर चक्राने (मरणोत्तर) गौरविण्यात आलं. कॅप्टन विक्रम बात्रा आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या अजोड अशा साहसाचं आणि प्रखर देशभक्तीचं हे देदीप्यमान दर्शन...*

**हम्प, पॉइंट ५१४० व पॉइंट ४८७५ हस्तगत करण्यासाठीची लढाई**

१२ जून, १९९९ला १३ जम्मू व काश्मीर रायफल्सला द्रासला जाण्याचा हुकूम मिळाला. तोलोलिंग ह्या मुख्य भागाशी संलग्न अशा 'हम्प' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या भागावर ताबा मिळवण्यासाठी १८ ग्रेनडिअर्सचे राखीव सैन्य म्हणून ते जात होते. दोन रात्रींच्या घनघोर लढाईनंतर १७ जूनला संध्याकाळी पाच वाजता 'हम्प' तसेच त्याच्या जवळचे 'रॉकीनॉब' ही दोन्ही ठिकाणे काबीज करता आली. शत्रसैन्यापैकी आठ जण मरण पावले व नऊ जण जखमी झाले. शत्रूसैन्याने तीन UMG (युनिव्हर्सल मशिनगन्स) व बऱ्याच मोठ्या प्रमाणात दारूगोळाही तिथेच सोडून पळ काढला होता. आपल्या फौजांनी नंतर याच मशिनगनचा, शत्रूवर मारा करण्यासाठी उपयोग केला.

**पॉइंट ५१४० काबीज**

१३ जम्मू व काश्मीर रायफल्सवर त्यानंतर सोपवलेली कामगिरी म्हणजे पॉइंट ५१४० हस्तगत करणे. हे द्रास खोऱ्यातले अत्यंत मोक्याच्या ठिकाणी वसलेले, महत्त्वाचे ठिकाण होते. ह्याच ठिकाणाहून शत्रूने 'स्टिंजर मिसाइल'च्या साहाय्याने आपले एक हेलिकॉप्टर खाली पाडले होते. त्यानंतर या ठिकाणावरून आपले एकही हेलिकॉप्टर फिरकू शकत नव्हते. हे ठिकाण हस्तगत करणे म्हणूनच फार महत्त्वाचे झाले होते.

पॉइंट ५१४० हस्तगत करण्याची जबाबदारी 'बी' व 'डी' कंपनीवर सोपवली होती. कॅप्टन एस. एस. जामवालकडे 'बी' कंपनीचे नेतृत्व होते व 'डी'

कंपनी कॅप्टन विक्रम बात्रा यांच्या अधिपत्याखाली होती.

१९ जून, १९९९ला पहाटे चार वाजता त्यांनी 'टोलोलिंग' टॉपहून प्रयाण केले. सकाळी साडेसहाला हम्पच्या पश्चिमेकडील उतारावर सर्व एकत्र जमले व दिवसभर तेथे निपचित पडून राहिले.

दिवसभरात दोन्ही कंपनींच्या कमांडरना त्यांच्या कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल वाय. के. जोशी यांनी सविस्तर माहिती पुरवली होती. त्यानंतर त्या दोघांनी त्या प्रदेशाची बारकाईने पाहणी केली होती.

कमांडिंग ऑफिसरला माहिती देत असताना कॅप्टन विक्रम बात्रांनी सांगितले होते, 'काम फत्ते झाल्यावर मी यशप्राप्तीचा संदेश देईन, 'ये दिल मांगे मोअर' व कॅप्टन एस. एस. जामवाल यांचा यशाचा संदेश असणार होता, 'ओह या! या! या!'

अंधार पडल्यावर तोफांच्या भडिमाराचा फायदा घेत, दोन्ही कंपन्या पॉइंट ५१४०कडे निघाल्या.

सुमारे पंधरा हजार फूट उंचीवर असलेल्या या डोंगरमाथ्यावरच्या ठिकाणाकडे, चढून जाणे फार त्रासाचे होते. डोंगराचा कडा उभा व चढायला कठीण होता. हवा विरळ असल्यामुळे श्वास घेण्यासाठी एकसारखे थांबावे लागत होते.

तोफांनी फेकलेले प्रकाशगोळे वापरून शत्रूने ती जागा चांगली प्रकाशित केली होती. त्यामुळे चढणाऱ्या सैनिकांचा वेग आणखी मंदावला होता. शत्रूने हल्ला करावयास आलेल्या आपल्या सैन्यावर, तोफांचा भडिमार केल्यामुळे आपल्या सैनिकांना इजा पोहोचली होती. हल्ला करणाऱ्या शत्रूवर, तोफांचा परिणामकारक भडिमार करून, आपल्या सैनिकांनी त्यांचे खूपच लोक मारले. अशा विपरीत परिस्थितीत ही कंपनी आगेकूच करत होती.

रात्री तीन वाजून पंधरा मिनिटांनी ते त्या ठिकाणाजवळ पोहोचले. त्या ठिकाणी शत्रूचे एकूण सात खंदक होते, दोन माथ्यावर व पाच पूर्वेच्या बाजूला होते. कॅप्टन एस. एस. जामवाल यांच्या नेतृत्वाखालील 'बी' कंपनी प्रथम माथ्यावर पोहोचली व त्यांनी डाव्या बाजूकडून हल्ला केला. हल्ला करण्याच्या थोड्या आधी पॉइंट ५१४० स्थित शत्रू, १३ जम्मू व काश्मीर रायफलच्या रेडिओ नेटवर्कवर आला व त्याने हल्ला करावयास आलेल्या 'शेरशहा'ला (कॅप्टन विक्रम बात्राला) आव्हान दिले व हल्ला करण्यापासून परावृत्त करण्यासाठी धमकावून सांगितले की, त्यांच्यापैकी कोणीही जिवंत परत जाणार नाही.

जे रेडिओ नेटवर्कवर होते, त्या सैनिकांनी व विक्रम बात्रांनी त्यांच्यावर यथेच्छ तोंडसुख घेतले. मानसिक दहशत घालणे हेच त्यांचे लक्ष्य असेल, तर त्यात शत्रूला घोर अपयश आले होते. कॅप्टन एस. एस. जामवाल यांच्या कंपनीला पहाटे तीन वाजून पस्तीस मिनिटांनी आपले निर्धारित लक्ष्य गाठण्यात यश मिळाले. त्यांचा 'ओह या! या! या!' हा यशाचा इशारा, कमांडिंग ऑफिसरच्या कानाला संगीतासारखा आनंदमयी वाटला.

या दरम्यान विक्रम बात्रांच्या कंपनीने, पूर्वेकडील खंदकावर तीन रॉकेट्स सोडली व नंतर विक्रम बात्रांच्या पुढाकाराने शत्रूवर हल्ला चढवला. यात सहा पाकिस्तानी सैनिक मारले गेले व उरलेले पळून गेले.

सकाळी चार वाजून पस्तीस मिनिटांनी विक्रम बात्रांचा आवाज रेडिओवर दुमदुमला, 'ये दिल मांगे मोअर!'

त्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात हत्यारे व दारूगोळा हस्तगत झाला. यावरून पॉइंट ५१४० या ठिकाणी पाकिस्तानी फौजेची एक प्लॅटून कार्यरत होती, हे स्पष्ट दिसत होते.

पॉइंट ५१४० काबीज केल्यानंतर द्रास सेक्टरमधील युद्धाच्या लाटेने वेगळे वळण घेतले. या आघाडीनंतर शत्रूचे धाबे दणाणले. अचानक व गुप्तपणे केलेली कारवाई, फौजेची लवचिकता, पुढाकार घेण्याची वृत्ती, धैर्य या गुणांमुळे यश मिळाले. पॉइंट ५१४० काबीज केल्यानंतर तोलोलिंग टॉपवर हेलिकॉप्टर्स उतरू लागली. यानंतर जम्मू व काश्मीर रायफल्स सेनेस २६ जून, १९९९ला द्रास सेक्टरमधून फौजा काढून घेण्याचा व मुश्कोह खोऱ्यामध्ये कारवाई करण्याचा आदेश दिला गेला.

**पॉइंट ४८७५ काबीज**

पॉइंट ४८७५ हे लढाईच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण होते. मुश्कोह खोऱ्यातील या ठिकाणावरून 1/A राष्ट्रीय महामार्गावरील द्रास ते मातायन ह्या भागावर प्रभुत्व ठेवणे शक्य होते. ह्या ठिकाणाहून तीस ते चाळीस किलोमीटरच्या टापूवर नजर ठेवता येत असे व पाहिजे तेव्हा परिणामकारकरीत्या गोळीबार करता येत असे. त्याचमुळे शत्रूला इथून हुसकावून लावून हे ठिकाण काबीज करणे फार जरुरीचे होते.

द्रास हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरू शकत नसे; कारण त्या ठिकाणास शत्रूने आपले लक्ष्य बनवले होते. हेलिकॉप्टरना पान्ड्रास रिजवळून कमी उंचीवरून उड्डाण करावे लागत होते. पॉइंट ४८७५ काबीज करण्याची जबाबदारी १३ जम्मू व काश्मीर रायफल्सवर सोपवली होती. या बटालियनने घुमरीला विसावा घेऊन,

पुनर्बांधणी करून, पुढच्या मोहिमेसाठी ताजेतवाने व्हायचे अशी योजना आखली होती; पण ती रद्द करून त्यांना ३० जून, १९९९ला मुश्कोह खोऱ्याकडे जावयास सांगितले. ७९ माऊंटन ब्रिगेडच्या आधिपत्याखाली त्यांना पॉइंट ४८७५ काबीज करण्याची कामगिरी पार पाडावयाची होती. पॉइंट ४८७५ वरून शत्रूला आपल्या सैन्याच्या हालचालींवर सहज नजर ठेवता येत असल्यामुळे रात्रीच्या अंधारात सैन्याची जुळवाजुळव करावी लागली.

१ जुलै, १९९९ला प्राथमिक टेहळणी करण्याची व हल्ला करण्याची योजना आखण्याच्या दृष्टीने, कमांडिंग ऑफिसर कर्नल वाय. के. जोशी व 'ए' कंपनीचे कमांडर मेजर विजय भास्कर हे दोघे, जिथून घडामोडी सुस्पष्टपणे दृष्टिपथात येतील, अशा ठिकाणावर चढून आले. २ जुलै, १९९९ला ७९ माऊंटन ब्रिगेडच्या प्रधान कार्यालयामध्ये या योजनेवर चर्चा झाली. जनरल ऑफिसर कमांडिंग ८ माऊंटन डिव्हिजन मेजर जनरल मोहिंदर पुरी, ब्रिगेडिअर कक्कर, कमांडर ७९ माऊंटन ब्रिगेड्स व लेफ्टनंट कर्नल वाय. के. जोशी, कमांडिंग ऑफिसर १३ जम्मू व काश्मीर रायफल्स या सर्वांनी चर्चेत भाग घेतला होता.

सर्व बटालियनना हल्ला चढवायच्या ठिकाणी आणण्यात आले. हे ठिकाण सर्व बटालियनना हल्ला चढवायच्या ठिकाणी आणण्यात आले. हे ठिकाण पॉइंट ४८७५ पासून पंधराशे मीटरवर होते. ती जागा आगप्रतिबंधक करण्यात आली होती.

दिनांक २ व ३ जुलै, १९९९ या दोन दिवसांमध्ये २८ राष्ट्रीय रायफल्स व ह्या बटालियनच्या ओझे वाहणाऱ्या (पोर्टर्स) सैनिकांकरवी, जड शस्त्रास्त्रे व दारूगोळा आणून ठेवला. ४ जुलै, १९९९ला 'ए' व 'सी' कंपन्यांचे कमांडर्स मेजर एस. व्ही. भास्कर व मेजर गुरप्रीत सिंग यांनी दिवसा शेवटची टेहळणी केली व आपल्या सर्व 'ओ' ग्रुप्सना लक्ष्य प्रत्यक्ष दाखवले.

४ जुलै संध्याकाळी सहा वाजता बोफोर्स तोफांतून व मल्टी बॅरेल लाँचर्समधून गोळाफेक चालू झाली. हल्ला चढवणाऱ्या कंपन्यांनी वीस वाजून तीस मिनिटांनी (रात्री साडेआठ वाजता) मारा सुरू केला.

रात्र दाट काळोखी होती. जमीन खडकाळ असल्यामुळे पुढे जाणे कठीण जात होते. नियोजित लक्ष्यापासून दोनशे मीटर्स अलीकडे, शत्रलसैन्याने आपल्या कंपन्यांवर जोरदार गोळाफेक केली. हल्ला करणाऱ्या कंपनीने पहाटे साडेचार वाजता, आपल्या स्वयंचलित तोफा डागल्या व टेकडीच्या

माथ्यावरील चांगला बंदोबस्त असलेल्या शत्रूच्या मोक्याच्या ठिकाणावर, गोळ्यांचा वर्षाव केला. प्रथम दोन्ही कंपन्यांना यश मिळाले होते;

पण पॉइंट ४८७५च्या सपाट माथ्यावरून जोरदार गोळाफेक झाली. त्यामुळे त्यांना थांबावे लागले. गोळाफेकीच्या प्रकाशात ते दिसण्याचा फार मोठा धोका होता. शत्रूने अतिशय परिणामकारकरीत्या छोट्या बंदुकींतून व लपतछपत गोळीबार केला. हल्ला करण्यासाठी फार मर्यादित जागा असल्यामुळे आपला हल्ला थांबवावा लागला.

५ जुलै, १९९९ला सुमारे सव्वादहा वाजता 'सी' कंपनीचे कमांडर, कमांडिंग ऑफिसरांबरोबर बोलले व उद्भवलेल्या अडचणींची त्यांना कल्पना दिली. ज्या जागेवरून शत्रूसैन्याकडून परिणामकारकरीत्या गोळीबार होत होता, त्याबद्दलची माहिती दिली. कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल जोशींनी स्वत: फायर-बेसवरून दोन FAGOT क्षेपणास्त्रे डागली व व्यत्यय आणणाऱ्या शत्रूचा नायनाट केला. या बरोबर झालेल्या माऱ्यामुळे शत्रूसैनिक खंदकातून पलायन करताना दिसले. 'सी' कंपनीने ताबडतोब त्या ठिकाणावर हल्ला केला. ५ जुलै, १९९९ला रात्री दहा वाजता, पॉइंट ४८७५च्या उत्तरेकडील भागातून, या दोन्ही कंपन्यांवर शत्रूकडून अचूक व जोरदार गोळीबार करण्यात आला. सतत कराव्या लागत असलेल्या गोळीबारामुळे दारूगोळा संपत आला होता. ६ जुलै, १९९९ला पहाटे पावणेपाच वाजता 'सी' कंपनीने तसे कळविले. 'बी' कंपनी राखीव म्हणून तैनात होती. तिने ताबडतोब दारूगोळा आणला व गोळीबारास पुन्हा सुरुवात झाली.

६-७ जुलै, १९९९च्या रात्री युद्ध करणाऱ्या दोन्ही बाजूंचे सैन्य इतके जवळ आले की, त्यांच्यामध्ये घनघोर लढाईबरोबरच शाब्दिक चकमकीही उडाल्या. पाकिस्तानी ठाणे उद्ध्वस्त करण्यासाठी तातडीने काही करणे आवश्यक आहे, नाहीतर परिस्थिती हाताबाहेर जाईल, हे आता स्पष्ट झाले होते. ह्याच सुमारास पॉइंट ४८७५च्या उत्तरेकडील एका अरुंद अशा तुटलेल्या कड्यावरील मध्येच पुढे आलेल्या भागावर, शत्रूसैन्य असल्याचे आढळले. तो भाग शत्रूच्या ताब्यात होता व तिथे सैन्याची मोठी कुमक होती. त्या भागातून पाकिस्तानी घुसखोरांना हुसकावून लावण्याची कामगिरी 'डी' कंपनीवर सोपवली होती. अगदी जवळ असलेल्या संगरातून शत्रू प्रतिकार करत होता. त्यामुळे कंपनीला पुढे जाण्यामध्ये अडथळा निर्माण झाला होता. ७ जुलै, १९९९ला कॅप्टन विक्रम बात्रांनी आपल्या सैनिकांबरोबर पुढे जाऊन पॉइंट ४८७५च्या भागाची पाहणी करण्याची व त्या कड्यावर पाय रोवण्याचा प्रयास करण्याची जबाबदारी स्वत:हून स्वीकारली.

शत्रूसैन्याकडून स्वयंचलित बंदुकांमधून व तोफांमधून तुफानी गोळीबार होत होता; तरीही कॅप्टन विक्रम बात्रा पुढे जात राहिले. संगरजवळ जात त्यांनी आपल्या एके ४७मधून गोळीबार चालू केला. ते संगरच्या तोंडाशी एका अरुंद वाटेने पोहोचले. त्यांच्या अकस्मात येण्याने शत्रू भांबावला. त्यांनी तिथेच पाच पाकिस्तानी सैनिकांना ठार केले; पण संख्याबळात ते कमी पडले. शत्रूने अगदी जवळून त्यांच्या छातीत गोळी मारली. ते खाली कोसळले. याच वेळी तोफेतून उडणाऱ्या ठिकऱ्यांनी ते आणखी जखमी झाले.

कॅप्टन बात्रांनी त्यांच्यावर सोपवलेल्या कामगिरीच्याही पुढे जाऊन कामाविषयी असणाऱ्या आपल्या निष्ठेचे प्रदर्शन केले. आपल्या प्राणांचे बलिदान केले. आपल्या कंपनीचा पुढे जाण्याचा मार्ग सुकर केला. त्यांच्या कामगिरीमुळे पॉइंट ४८७५वर ताबा मिळवणे शक्य झाले. द्रास ते मातायन या राष्ट्रीय महामार्गावरचे शत्रूचे वर्चस्व संपुष्टात आले.

कॅप्टन बात्रा नेहमीच आपल्या फौजेच्या अग्रणी असत. आपल्या आघाडीमधील धोक्याची त्यांना पूर्ण कल्पना होती. 'लेज'वरून पाकिस्तानी फौजांना हुसकावून लावण्यासाठी ते कृतनिश्चयी होते. त्यांच्या जोखीमपूर्ण हल्ल्यामुळे पॉइंट ४८७५ सर झाले आणि शत्रूचा कणा मोडला. त्यांचे धाडस व कृती त्यांना नेमून दिलेल्या कामापलीकडची होती. ते धोका पत्करत राहिले. त्यांनी भारतीय सैन्यदलाच्या श्रेष्ठ परंपरेला साजेसा अत्युत्तम त्याग केला.

'ये दिल मांगे मोअर' या त्यांच्या घोषणेमुळे देशप्रेमाला एक नवा अर्थ प्राप्त झाला. आपल्या सैनिकांकडून देशाची काय अपेक्षा आहे? लोकांकडून सैनिकांना कोणत्या पाठिंब्याची अपेक्षा असते? कॅप्टन विक्रम बात्रांसारख्या तरुण अधिकाऱ्यांच्या आयुष्याकडून काय मागण्या आहेत. मोठे धोके, मोठी आव्हाने? ह्या सर्व गोष्टींना नवा अर्थ प्राप्त झाला आहे.

'कितीही मोठे आव्हान असले तरी ते स्वीकारण्यासाठी जिवाचे रान करू, आणखी सांगा!' असे सांगणारेच हे विधान आहे. आपण पत्करत असलेल्या धोक्याची कॅप्टन बात्रांना कल्पना होता; पण बहुतेक तरुण अधिकाऱ्यांप्रमाणेच, मृत्यूची शक्यता त्यांच्या मनाला शिवलीच नाही. ते त्या दिवसासाठी जगले. प्रत्येक दिवसासाठी जगले; पण भरभरून जगले.

युद्धबंदीपूर्वीच्या शेवटच्या लढाईत पोहोचण्यासाठी अशक्य असणाऱ्या ठिकाणी शत्रूने जोरदार गोळीबार चालू केल्यामुळे, त्यांच्या बटालियनला

हल्ला थांबवावा लागला होता. एका अरुंद कड्यावरून जाणारा फक्त एक मार्ग होता व तो शत्रूच्या ताब्यात होता. त्यांच्या अचाट साहसी कृत्यामुळेच ती जागा हस्तगत झाली; पण त्यात त्यांच्या प्राणाची आहुती पडली. त्यांनी वडिलांना पाठवलेल्या शेवटच्या पत्रावरून जाणवतेय, की त्यांना स्वत:पेक्षा वडिलांची जास्त काळजी वाटत होती. 'आधीच्या' लढाईतील यशाबद्दल ते सांगतात व पुढच्या कार्यातील यशासाठी प्रार्थना करायला सांगतात.

> *'मी पुन्हा खाली केव्हा यायला निघेन सांगता येत नाही; पण जेव्हा शक्य होईल तेव्हा मी तुम्हाला फोन करेन. माझ्या पुढच्या कामातील यशासाठी प्रार्थना करा. काळजी घ्या.'*
>
> *तुमचा मुलगा विकी.*

**ज्योत्स्ना लेले**

('परमवीरचक्र' ('रणांगणावरील आपले महान योद्धे') या पुस्तकातून)

❖


# टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

**टी बुक क्लब योजनेतील'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹१०० भरून उपलब्ध असलेल्या कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹ १३५० राहील किंवा ८ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५. इतर कोणत्याही पुस्तकांवर २०% सवलत मिळवा.

# संतांची मांदियाळी

*संत चोखामेळा हे वारकरी संप्रदायाच्या प्रभावळीतील महत्त्वाचे संत. शूद्र जातीत जन्माला येऊनही उच्च विचारांमुळे, शुद्ध आचारामुळे आणि स्वच्छ मनामुळे नामदेवांसारख्या थोर संताचं, विठ्ठलाच्या निस्सीम भक्ताचं मार्गदर्शन आणि प्रेम चोखामेळ्याला लाभलं. भागवत धर्माविषयी चोखोबांच्या मनात अनेक प्रश्न होते. ते प्रश्न मनात घेऊन चोखोबा नामदेवांना भेटायला गेले. त्या भावपूर्ण भेटीचं आणि नामदेवांनी भागवत धर्माविषयी सांगितल्यामुळे चोखोबांच्या मनात चेतलेल्या ज्ञानज्योतीचं दर्शन घडविणाऱ्या प्रकरणाचा हा संपादित अंश...*

नामदेवांनी मिठीत घेतलं आणि चोखा जणू सगळा, सर्वांगानं शांत शांत झाला. ब्राह्मण-मराठा समाजाकडून सोसलेले अत्याचार, वैश्य-वाण्यांनी दिलेला त्रास, सगळ्यांनी केलेले हुडुतहुडुत, परंपरेने अंगावर पडत आलेलं सगळंसगळं घाणेरडं काम, रोज अंघोळ करतो म्हणून भावकीतल्या लोकांनी, मित्रांनी केलेला अपमान, अवहेलना यातून त्या विठ्ठलाची लागलेली ओढहे सगळंसगळं घेऊन चोखा नामदेवाच्या मिठीत विरघळला. दुधात खडीसाखरेचा खडा विरघळावा तसा. नामदेवाच्या मिठीत कितीतरी वेळ चोखा स्फुंदत होता आणि काही न बोलता नि:शब्दपणे नामदेव चोखाच्या पाठीवरून हात फिरवत होता. अगदी मूकपणे; पण त्या स्पर्शालाही एक आवाज होता, एक नाद होता, एक भाषा होती, एक लय होती. ‘विठ्ठल-विठ्ठल!’ नामदेवांच्या स्पर्शातून चोखाला ती लय जाणवली. त्याच्या शरीरात भिनली. मनात उतरली आणि हृदयात रुतून बसली. नामदेवांचा स्पर्श,

त्यांचा श्वास, त्यांची नजर, त्यांचं प्रसन्न हास्य, सगळ्यासगळ्यातून तो एकच नाद जणू उमटत होता, 'विठ्ठल-विठ्ठल'. तो नाद झिरपत झिरपत चोखाच्या शरीरभर पसरला आणि एखादं गारूड व्हावं, तसा त्या नादानं चोखाच्या सर्वांगाचा जणू ताबा घेतला. चोखामेळा आता जणू सावित्री-सुदामचा राहिलाच नाही. तो विठ्ठलमय झाला. त्याचं जनकत्व घेतलं जणू स्वत: विठ्ठलानं आणि त्याचं पालकत्व घेतलं जणू नामदेवानं. चोखाचा जणू पुनर्जन्म झाला आणि या घटनेनं चोखा एकदम उल्हसित झाला. ताजातवाना, टवटवीत झाला, पाकळीवरच्या दवासारखा आणि पुन:पुन्हा नामदेवाच्या मिठीत विरघळायला सिद्ध झाला...

नामदेव आपल्याकडे हसऱ्या चेहऱ्यानं पाहताहेत हे चोखाच्या लक्षात आलं. तो किंचित लाजला. आपल्या मनातली नामदेवाबद्दलची विभूती भावना त्यांनी ओळखली या विचारानं त्याला एकीकडं बरंही वाटत होतं, तर दुसरीकडे आपण पकडले गेलो की काय या शंकेनं शरमही वाटत होती. आपल्याकडे नामदेव एकटक पाहताहेत, आपला चेहरा वाचताहेत हे चोखाच्या लक्षात आलं आणि नामदेवांच्या नजरेतून होणारा स्नेहाचा वर्षावही असह्य झाल्यामुळं चोखा पुन्हा खाली बसला आणि त्यानं नामदेवाचे पाय धरले. ''देवा, मला शहाणं करा. मला काही शिकवा. मला मार्ग दाखवा,'' असं व्याकूळ वाणीनं म्हणत चोखा पुन्हा नामदेवांच्या चरणांवर मस्तक टेकवून बसून राहिला.

आता मात्र नामदेवांना त्याची दयाही आली आणि त्याच्याबद्दल मायाही वाटली. त्यांनी चोखाच्या खांद्याला धरून पुन्हा उभं केलं आणि म्हणाले, ''चोखोबा, तुमची घायाळ अवस्था मला समजली. माझ्या मतीप्रमाणे मी तुम्हाला नक्की मार्गदर्शन करेन. पण हे पुन्हा:पुन्हा पायावर डोकं ठेवू नका. चोखोबा, तुमची योग्यता फार मोठी आहे. पुन्हा:पुन्हा माझ्या पायावर डोकं टेकवून मला सारखं असं लाजवू नका. चला, आपण त्या पाराच्या कट्ट्यावर बसू या, चला!'' असं म्हणत नामदेवांनी चोखाला वडाच्या पारकट्ट्याकडे नेले. तिथं माणसांची बरीच गर्दी होती. अंगाचा संकोच करून चोखा त्यातून चालत निघाला. चोखा आता बराच सावरला होता. नामदेवही बरेच निवांत दिसत होते.

''हं! बोला चोखोबा, पंढरीला कसं काय येणं केलंत? तुमच्यातही वारीची चाल आहे का?'' नामदेवांनी चोखोबांना बोलतं करायच्या इराद्यानं प्रश्न केला.

''होय देवा, आम्हीही वारकरीच. पण इतके वर्ष दूर तिकडे बुलढाण्याकडे होतो. त्यामुळे मनात असूनही पंढरपुरला येता आलं न्हायी. आता आम्ही इकडं मंगळवेढ्याला आलो आहे. मी, चोखामेळा. सुदाम येसकर आणि सावित्रीचा

मुलगा. मला विठ्ठलाची लयी भक्ती करायची हाय. माझं रोजचं कामकाज करून मी रोज विठ्ठलाचं नाव घेतो. पर माझ्या मनाला समाधान न्हायी. माझं मन कशातच नीट लागत न्हायी. त्यातच गावकीच्या कामात भट-बामनं लयीच हाडत-हुडत करत्यात. मला वाईट वाटतया. पर मी काहीच करू शकत न्हायी. देवा, तुम्ही मला मिठी मारलीत. मला जवळ घेतलंत. माझा विटाळ तुम्ही मानला न्हाईत. मला हाड-हुडं केलं न्हायी. मला लयी बरं वाटलं. तिकडं गावाकडं आमची सावलीसुदिक अंगावर पडली, तर परत अंघोळ करतात. तुमाला माझा विटाळ होणार नाही, असं तुम्ही म्हणालात. देवा, तुमी शिंपी, मी महार. मग हे असं कसं काय?''


चोखा मनातल्या सगळ्या वेदना, व्यथा, शंका सारं, सारं नामदेवांसमोर सांडत होता. त्याच्या स्वरातलं दु:ख, त्याच्या मनाची घायाळ अवस्था बघून नामदेव गहिवरले. चोखाच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनी त्याला थांबवला. म्हणाले, ''चोखोबा तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तर आहेत माझ्याकडे. नव्हे मला ती विठूरायानंच सांगितली आहेत आणि ज्ञानोबा माउलीनं माझ्याकडून ती घोटवून घेतली आहेत. तीच मी तुम्हाला सांगतो. चला, आपण जरा झाडाच्या गार सावलीला बसू या. तुम्ही चालून-थकून-दमून आला आहात. काही भाकर तुकडा खाऊन घ्या. मगच आपण बोलू. चला!'' असं म्हणून नामदेव चोखाला दुसऱ्या झाडाखाली घेऊन आले. पारकट्ट्यावर बरीच लोकं होती. ती सगळी नामदेवाशी बोलायला, त्याच्या पायावर डोकं ठेवायला धडपडत होती. तिथं निवांत बोलता येणार नव्हतं. म्हणून नामदेवांनी चोखाचा हात धरला आणि त्या वर्दळीपासून दूर थोड्या अंतरावर असलेल्या एका गर्द सावलीच्या झाडाखाली ते त्याला घेऊन आले...

चोखा सर्वांगाने थरारला. तो नामदेवांकडे एकटक बघत होता. नामदेवांना भाकरी देऊ केल्यानंतर त्याची त्यालाच भीती वाटत होती. वारकरी म्हणून त्याला मिठीत घेणारे नामदेव त्यांच्या घरची भाकरी खातील का? त्याला धास्ती वाटत होती. पण नामदेवांनी भाकरी घेतली. त्यांनी भाकरी हातात घेतल्यानंतर चोखाला हायसं वाटलं. पण त्यांनी ती भाकरी कपाळाजवळ नेली, त्याचं कारण त्याला कळलं नाही. त्यानं विचारलं, ''देवा माझ्या हातची भाकरी तुम्ही घेतलीत, पर ती कपाळाजवळ का नेलीत मला कळलं नाही?'' नामदेव हलकेच हसले, म्हणाले, ''चोखोबा, अहो ते अन्न आहे, आणि अन्न हे परब्रह्म! मग त्याचा सन्मान नको का करायला? त्या

८ वी आवृत्ती

# भुताचा जन्म

## द. मा. मिरासदार




**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

...ही भुते कुठेही असू शकतात. ती अमक्या ठिकाणी नाहीत, असे कुणालाही छातीवर हात ठेवून सांगता यायचे नाही. साधारणपणे सांगायचे म्हणजे ती कुठल्याही पडक्या वाड्यात, विहिरीत, मसणवटीत असतातच. विशेषत: विहिरीत हडळ असते आणि ती सुंदर बाईचे रूप घेऊन इकडे-तिकडे हिंडत असते. पिंपळावर तर मुंजा हटकून असतो आणि वड, पिंपरणी, लिंब असल्या झाडांवरही भुते माकडासारखी गर्दी करून बसलेली असतात.

दिवसा ती काही करीत नसली, तरी रात्रीच्या वेळी त्यांना उजाडते. त्या वेळी मात्र ती कुठेही आणि कुणाच्याही वेषात भेटतात. त्यांचे पाय उलटे असतात असे म्हणतात; पण तसे काही त्यांच्यावर बंधनच आहे असे नाही. अमावस्येच्या रात्री तर ती हमखास फिरायला निघालेली असतात. अशा वेळी त्यांच्यासंबंधी काहीही बोलणे अगर त्यांच्या दृष्टीस पडणे, हे धोक्याचे असते.

अन्नाला, त्या परब्रह्माला नमस्कार करूनच खायला सुरुवात करायची! म्हणून मी ती भाकरी कपाळाजवळ नेली.'' असं म्हणून नामदेवांनी पुन्हा भाकरी खायला सुरुवात केली. चोखानं दिलेली, एका महाराच्या घरची ती भाकरी आणि नामदेव मन लावून खात होते.

चोखा ते दृश्य डोळे भरून बघत होता. मनात साठवत होता. हृदयात उतरवत होता. ते बघत असताना त्याला स्वत:ला खाण्याचंही भान राहिलं नव्हतं. आता हे सगळं मायला जाऊन सांगायचं! तू दिलेली भाकरी नामदेवांनी खाल्ली, असं सांगितल्यावर तिचा आनंदित झालेला चेहरा त्याला आताच डोळ्यासमोर दिसायला लागला. खाताखाता नामदेवाचं त्याच्याकडं लक्ष गेलं. चोखा खात नाहीय, नुसतीच हातात भाकरी धरून बसलाय हे बघितल्यावर नामदेवांना नवल वाटलं. ''चोखोबा खाताय ना?''

त्यांच्या या प्रश्नानं चोखा भानावर आला. आपल्या हातात भाकरी तशीच आहे आणि भाकरी खाणाऱ्या नामदेवाकडे एकटक पाहताना आपण पकडले गेलो, याची जाणीव होऊन त्याला किंचित शरमल्यासारखं झालं. त्यानं खाली बघून भराभरा भाकरी खायला सुरुवात केली. हे करत असताना आपण वाजवीपेक्षा जास्त भरभर खातोय, याचंही त्याला भान नव्हतं आणि ते बघून नामदेवांना पुन्हा हसू फुटलं. ते चोखाला म्हणाले, ''चोखोबा, काय पाहताय एवढं? भाकरी खाताना कधी कुणाला पाहिलं नाही की काय?'' चोखोबा लाजला आणि म्हणाला, ''देवा, भाकरी खाताना लयी जणांना बघितलंय. पर महाराची भाकरी, एक दुसऱ्या जातीतला माणूस खाताना पहिल्यांदा बघतोय देवा! आनी खरं सांगू, तुमच्याबरोबर भाकरी खाताना आज माझी पण वेगळ्या चवीची भाकरी लागतीय. जरा जास्तच गोड लागतीय!''

चोखोबांचे हे बोलणं ऐकून नामदेव प्रसन्न हसले. मग मात्र कुणीच बोललं नाही. दोघांनीही भाकरी संपवली. हात धुतले. धोतऱ्याच्या सोग्यानं तोंड पुसत नामदेव म्हणाले, ''चोखोबा, तुमची आई मोठी सुगरण दिसते. तिनं डाळ खूप छान बनवली होती!'' ते ऐकून चोखाला धन्यता वाटली. आपण हे सगळं मायला जाऊन सांगायचंच असा पुन्हा एकदा निर्वाळा त्याच्या मनानं दिला.

चोखानं सगळं गोळा केलं. उरलेली भाकरी पुन्हा पटकुरात बांधली आणि तो नामदेवाकडे बघत बसला. त्यांच्या चेहऱ्यावरून उत्सुकता ओसंडून वाहत होती. नामदेवांना ती स्पष्ट दिसली. ''बोला चोखोबा, विचारा काय

विचारायचं आहे? काय प्रश्न आहेत तुमच्या मनात? काय खदखदतंय तुमच्या मनात? विचारा!''

नामदेवांच्या मनकवडेपणाचं चोखाला नवलं वाटलं. पण त्याला कुठं माहीती होतं, की त्याचा काळा सावळा चेहरा विलक्षण बोलका आहे ते? पण नामदेवाच्या आश्वासक स्वरांनी चोखाला धीर आला. 'विचारू की नको, विचारू की नको?' असं करताकरता त्यानं धाडकन् एकदम विचारलं, ''देवा, ह्ये भागवत धर्म-भागवत धर्म म्हणजे काय आहे हो? आनी या धर्मात जाती भेदाचं वावडं कसं नाही? शिवाशिव नाही, विटाळ-चांडाळ नाही, कुणी महार नाही की कुणी चांभार? हे असलं धर्माच्या विरोधात वागूनसुद्धा त्यानला कुणी काहीच म्हणत नाही, हे कसं काय? आणि या भागवत धर्मात माझ्यासारखा महार जातीचा माणूस आला, तर त्याला घेतील काय? आणि हा भागवत धर्म, भागवत धर्म जे काही आहे तो कुणी सांगितलाय? आणि त्यात कुणाला पण देवाची भक्ती करता येते म्हणे? हे कसं शक्य आहे? देवा, जिथं आमची सावली अंगावर पडली तरी हे भट, बामन, मराठा अंघोळ करत्यात. मग या धर्माला तसलं काही बंधन न्हायी का? देवा पंढरपुरला येतायेता मी रस्त्यानं बघत होतो. वारकरी दिसला की कुणी पण कुणालाही मिठी मारतं होतं. जात न्हायी-पात नाही, विटाळ न्हायी, चांडाळ न्हायी, हे काय म्हणायचं? विचार करूनकरून माझ्या डोक्याचा पार भुगा झालाय बघा आणि आता तुम्ही माझ्याजवळची भाकरी खाल्लीत, म्हटल्यावर तर ते फुटायचंच बाकी आहे. तेव्हा देवा, मी तुमचे पाय धरतो; पण माझ्या डोक्यातला गुंता एवढा सोडवा.'' इतकं बोलल्यावर चोखानं जरा दम घेतला.

चोखा बोलत असताना नामदेव एकटक त्याच्याकडं बघत होते. त्याच्या चेहऱ्यावरची अजिजी, डोळ्यांतली व्याकुळता आणि त्याच्या प्रत्येक स्वरातल्या सच्चेपणाची त्यांना साक्ष पटत होती. सगळं जाणून घेण्याची त्याची आस किती सखोल आहे, हेही त्यांना कळून चुकलं आणि महार जातीतला असलेला हा माणूस या ज्ञानलालसेपोटी खूप मोठा होणार आहे, याचीच खात्री त्यांना पटली. चोखोबाची संभ्रमित अवस्था त्यांच्या लक्षात आली. मनात उद्भवलेल्या प्रश्नांच्या वादळाची उत्तरे ऐकण्यासाठी त्याच्या देहाचा कणन्कण जणू उमलून आला होता. आणि ती उत्तरे मिळाली नाहीत तर जणू त्याचे धैर्य लोप पावणार होते. अवसान गळणार होते. त्याची ती घायाळ अवस्था बघितली आणि नामदेवाला ज्ञानेश्वर माउलींचे बोल आठवले,

***''संमोह विभ्रम माझे। गिळीत धैर्याची आविसे।***

***तेथ देव्हडे भोंवत वळसे। अज्ञानाचे।।''***

किती समर्पक सांगितलं होतं, ज्ञानेश्वर माउलीनं. चोखोबाची ती विभ्रमावस्था बघून नामदेवांना करुणा वाटली. त्यांनी मनोमन ठरवलं की, या सैरभैर झालेल्या, व्याकूळ झालेल्या चोखोबाला आपण या संभ्रमावास्थेतून सोडवायचे. त्यांच्या मनात निर्माण झालेला विचारांचा, प्रश्नांचा, शंकाकुशंकांचा गोंधळ निपटून टाकायचा आणि त्यांच्या मनात उद्‌भवलेला प्रश्नांचा अंधार दूर करून त्याठिकाणी ज्ञानाचा प्रकाश निर्माण करायचा आणि या व्याकुळल्या अवस्थेतून चोखोबांची सुटका करायची. हे एकदा नक्की झाल्यावर नामदेवांची मुद्रा प्रसन्न झाली. त्यांच्या डोक्यात एकप्रकारचे आश्वासन उमटले आणि हसू बनून ते चेहऱ्यावर ओघळले. समोर व्याकूळ होऊन बसलेल्या चोखोबांच्या खांद्यावर त्यांनी किंचित थोपटल्यासारखे केले. नामदेवांच्या त्या स्निग्ध आणि आश्वासक स्पर्शाने चोखोबा अंतर्बाह्य थरारला पण एकदाच. मग मात्र त्यांच्या अंगाला सुटलेली थरथर थांबली. त्यांच्या हृदयात होणारी कालवाकालव थांबली. त्यांचं उन्मळत असलेलं मन शांत झालं. सैरभैर झालेली बुद्धी एका जागी स्थिर झाली. पण त्याचे कान मात्र आसुसले. इतके की, जणू सगळ्या शरीराला कान फुटले. त्याच्या शरीरातला कणन्‌कण अंतर्बाह्य फुलून आला. नामदेवांनी चोखोबाची ही अवस्थापण ओळखली. आता जास्त थांबण्यात, जास्त ताणण्यात अर्थ नाही, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी क्षणभर डोळे मिटले. ज्ञानेश्वर माउलींचे स्मरण केले. विठूरायाला मनोमन दंडवत घातला आणि डोळे उघडून सस्मित मुद्रेनं त्यांनी बोलायला सुरवात केली.

''चोखोबा, तुमची संभ्रमावस्था, तुमची व्याकुळता मी पाहिली आणि मला तुमची ज्ञानलालसा बघून अतिशय आनंद झाला. परंपरेविरुद्ध पोहण्याचं सामर्थ्य बहुधा कुणाच्यातच नसतं. पण निदान परंपरांचा अर्थ विचारण्याचं धाडस तुम्ही केलंत याचंच मला कौतुक वाटतंय. चोखोबा, हे वारकरी जात, धर्म मानत नाहीत. शिवाशिव, विटाळ-चांडाळ मानत नाहीत, याचंच तुम्हाला नवल वाटतंय ना? अहो चोखोबा, त्यात नवल ते कसलं? ही भागवत धर्माची शिकवण आहे आणि तो भागवतधर्म ज्यांनी अंगीकारला आहे, ज्यांनी स्वीकारला आहे ते त्या धर्माची शिकवण पाळतात. म्हणून ते जाती, धर्म भेद मानत नाहीत. विटाळ-चांडाळ मानत नाहीत. शिवाशिव पाळत नाहीत!'' नामदेव काही क्षण बोलायचे थांबले. चोखाच्या एका प्रश्नाचं

उत्तर त्याला मिळालं होतं. पण त्या उत्तरानंच पुन्हा असंख्य प्रश्न निर्माण केले होते. त्याच्या मनातले हे प्रश्न त्याच्या चेहऱ्यावरही उमटले.

त्याच्या डोळ्यातही उतरले आणि मनकवड्या नामदेवांनी ते वाचलेसुद्धा. पुन्हा सस्मित मुद्रेनं नामदेवानीच विचारले, ‘‘बोला चोखोबा, आता पुढे काय विचारायचंय? विचारा! नि:संकोचपणे विचारा. अहो, एकदा गुरु आज्ञेनं तुमच्या शंकांचं निरसन करण्याची भूमिका घेतली आहे ती नीट पार नको का पाडायला? बोला चोखोबा बोला!’’

नामदेवांनीच असं सांगितल्यावर चोखाची भीड चेपली. म्हणाला, ‘‘देवा, हा भागवत धर्म म्हणजे काय? मी हिंदू धर्म, यवन धर्म असे धर्म ऐकले होते; पण हा भागवत धर्म कुठून आला? आणि तो कुणी आणला? त्याची तत्त्वं कुणी बनवली? त्या तत्त्वांचे अर्थ काय? आणि ती तत्त्व लोकांपर्यंत कुणी पोहचवली? नामदेवा, आज जिकडं तिकडं भागवत धर्म, भागवत धर्म असं ऐकायला मिळतंय. जो तो उठतोय तो भागवत धर्म म्हणतोय. देवा, धर्मामुळं माणूस माणसापासून दुरावतो, दूर जातो म्हणतात; पण हितं तर काई येगळंच दिसतंय. हा भागवत धर्म जेव्हापासून आलाय, तेव्हापासून माणसं एकमेकांच्या जवळच येत्यात. एकमेकांना मिठी मारूनच भेटतात. देवा, माझ्या डोक्यात पार गोंधळ उडलाय. प्रश्नांच नुसता गुंताच झालाय. एक प्रश्न सोडवावा तर दुसरा तयार! एकेकदा या प्रश्नामुळं देवा मला झोप लागत नाही. त्या विठूरायाचं नाव घेतलं की जरा बरं वाटतं बघा. मग तेच करतो झालं! पण देवा तुम्ही माझे गुरू व्हा, आणि मला या गुंत्यातनं सोडवा.’’ चोखोबा काकुळतीला येऊन बोलत होता. आणि त्याच्या प्रत्येक शब्दागणिक नामदेवांना त्याच्यातल्या उत्कट ज्ञानलालसेची जाणीव होत होती. महार समाजात जन्मूनही त्याची ही उत्कट ज्ञानपिपासा पाहिल्यावर, ज्ञानोबा माउलीनं भक्तीमार्ग सर्वांसाठी मोकळा केल्याचं सार्थक आता झालं, असं नामदेवांना वाटलं. ही गोष्ट ज्ञानोबा माउलीला सांगितलीच पाहिजे, असं त्यांच्या मनानं घेतलं. त्यांनी चोखोबाकडं पाहिलं. एक असीम उत्सुकता त्याच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होती. विठ्ठलाबद्दलची प्रीती तर त्यातून प्रतीत होतच होती; पण त्याला आता भक्तीचीही जोड मिळाली होती. विठ्ठलाला एक निष्ठावान भक्त मिळणार होता. वारकरी संप्रदायाला एक खंदा पाईक मिळणार होता. संतांच्या मांदियाळीत आणखी एका अप्रूपाची भर पडणार होती. महार समाजात जन्मलेला हा चोखामेळा त्याचा, त्याच्या घराचा, त्याच्या कुळाचा, त्याच्या जातीचा उद्धार करणार होता. त्यांचा उद्धारकर्ता ठरणार होता. चोखोबाच्या

डोळ्यातले ज्ञानलालसेचे भाव आणि चेहऱ्यावर उमटलेला भक्तीचा फुलोरा हेच सांगत होते. चोखोबाच्या विधिलिखितामुळे आणि गुरूआज्ञेने का होईना पण या सगळ्याला निमित्तमात्र नामदेव होणार होता. आणि नामदेवाला याचंच अप्रूप होतं. भागवत धर्माच्या प्रसारासाठी आणि प्रचारासाठी सारं आयुष्य वेचायचं, असं नामदेवानी ठरवलं होतं. त्याचा प्रचार तळागाळातल्या, समाजाच्या अगदी तळातल्या जातीजमातीपर्यंत पोहचवायचा होता. आणि महार समाजातला चोखोबा भागवत धर्माची महती आणि माहिती जाणून घेण्यासाठी आग्रही होता. नामदेवाच्या ध्येयाला मिळालेलं हे यशच होते हे नि:संशय! म्हणूनच नामदेव प्रसन्न होते आणि जितक्या आतुरतेनं चोखोबा भागवत धर्माची माहिती जाणून घेण्यास उत्सुक होता, तितक्याच उत्सुकतेनं नामदेव त्याला ती माहिती, ते ज्ञान देण्यास आतुर होते. शिष्य शिकायला उतावळा होता, तर गुरू शिकवायला उत्सुक होता. मग ज्ञान सुगंधाप्रमाणं दरवळत राहिलं, त्यात नवल ते काय?

''ऐका चोखोबा, त्या विठाई माउलीच्या कृपेने आणि ज्ञानेश्वर माउलीच्या आज्ञेनं मी तुमच्या सर्व शंकांचे निरसन करायचा प्रयत्न करतो. तो विठ्ठलच मला यात यश देईल.'' नामदेवांनी बोलायला सुरुवात केली आणि सारी चराचर सृष्टी जणू कान देऊन ऐकायला लागली. वारा वाहायचा थांबला; सूर्यानंही आपले डोळे झाकले आणि सारं तेज, सारे प्राण कानात आणून तो ऐकायला लागला. चोखोबाची अवस्थाही याहून वेगळी नव्हती. त्याच्या तर साऱ्या इंद्रियानांच जणू कान आले होते. त्याच्या सगळया, सगळया जाणिवा जणू आसुसल्या होत्या, नामदेवांच्या तोंडातून पडणाऱ्या अमृतधारा प्राशन करण्यासाठी. आज त्याच्या आयुष्याला एक नवे अस्तित्व मिळणार होते. आचाराला नवा आकार लाभणार होता. त्याच्या मनात भरलेल्या अंध:काराला प्रकाशात बदलण्याची एक नवीन किमया घडणार होती. चोखोबा या सगळ्यासगळ्या परिवर्तनासाठी तयार होऊन बसला होता.

नामदेव बोलायला लागले. ''चोखोबा, सगळ्या विठ्ठलभक्तांनी, वारकऱ्यांनी आपलासा केलेला भागवत धर्म, सर्वश्रेष्ठ भक्त असणाऱ्या पुंडलिकाने सुस्थापित केला. पुंडलिकाची विठ्ठलावर जेवढी भक्ती होती, तेवढाच त्याचा विठ्ठलावरचा अधिकारही मोठा होता. म्हणूनच आई-वडिलांच्या परमसेवेत गुंतलेल्या पुंडलिकाला भेटायला जेव्हा विठ्ठल स्वत: त्याच्या घरी गेला, तेव्हा एक वीट विठ्ठलाकडं टाकून पुंडलिकाने त्याला

त्यावर उभे रहायला सांगितले आणि विठ्ठल विटेवर उभा आहे ते आजतागायत. पुंडलिकाने भक्तांसाठी त्या विठ्ठलाला तसाच विटेवर उभा ठेवला, हे विठ्ठलभक्तांवर त्यानं केलेले मोठे उपकार तर आहेतच पण त्याचबरोबर भागवतधर्मासारखा सर्वसमावेशक धर्म संस्थापित करून पुंडलिकाने संपूर्ण मानवजातीवर जे उपकार केलेत, त्याबद्दल सारी मानवजात त्याची ऋणी राहील. त्याच्या या कार्यामुळं भागवत धर्म हा एक असा सर्वसमावेशक, सर्वव्यापक धर्म ठरला. हीच विशाल दृष्टी बाळगून ज्ञानेश्वर माउलींनी या भागवत धर्माचे पुनरूज्जीवन केले आणि चोखोबा, चंद्रभागेच्या या वाळवंटात भागवत धर्माच्या झेंड्याखाली भक्तीचा थाट असलेलं असं आध्यात्मिक लोकशाहीचं राज्य उदयाला आलं. या राज्यातल्या सगळ्या पेठा या भक्तीच्या पेठा आहेत. भक्तीच्या या पेठेत विठ्ठलनामाचे अमाप असे पीक येतं आहे. चोखोबा, पंढरी हे भूलोकीचं, या पृथ्वीतलावरचं वैकुंठ आहे तर विठूराया हा या वैकुंठीचा राणा आहे. तो भक्तीचा भुकेला आणि भक्तांचा तहानलेला आहे. तो सर्वांच्यात वसलेला आहे. अगदी सर्वांच्यात.'' नामदेवांनी काही क्षण बोलणे थांबवले.

चकित मुद्रेने, विस्फारल्या डोळ्यानं आणि आसुसल्या कानानं त्याचं बोलणं ऐकत असलेला चोखोबा त्यांच्या त्या शेवटच्या वाक्यानं दचकला. ''काय सांगता देवा?'' तो पंढरीचा विठूराया सर्वांच्यात वसलेला आहे? सर्वांच्यात? अगदी माझ्यात शुद्धा?'' चोखोबानं अविश्वासानं प्रश्न केला आणि नामदेवांना हसू आलं. आपण असं सांगितल्यावर चोखोबा अविश्वासून असा प्रश्न विचारणार याची नामदेवांनी अटकळ केलेलीच होती. ती अटकळ खरी ठरली म्हणून त्यांना हसू आलं आणि आपण वेड्यासारखा प्रश्न केला, म्हणून नामदेव हसले असं वाटून, चोखोबाला लाज वाटली. तो संकोचून गेला. तो संकोच त्याच्या चेहऱ्यावर उमटला. नामदेवांनी तो वाचला आणि म्हणाले, ''नाही चोखोबा, संकोच करू नका. अहो तुम्हाला हा प्रश्न पडला, त्यात काहीच नवल नाही. पण तो विठूराया सगळ्याच्यात अगदी सगळ्यांच्यात, तुमच्यात, माझ्यात या आसपासच्या माणसांच्यात, अगदी या झाडात, त्या गाय-बैलांतही वसलेला आहे आणि हेच भागवत धर्म सांगतो. हे तर भागवत धर्माचं तत्त्व आहे.''

वारकरी एकमेकांना भेटले की, ते शिवाशिव, विटाळ-चांडाळ जातीभेद का मानत नाहीत, याचा चोखोबांला उलगडा झाला. पण मग ते एकमेकांना उराउरी का भेटत असतील? चोखोबांच्या मनात त्या उत्तरातून पुन्हा नवा प्रश्न निर्माण झाला.

''त्याचं असं आहे चोखोबा, एकदा तुमच्या माझ्या हृदयात तो विठ्ठल आहे हे मान्य केल्यावर आपण सगळी एकाच पातळीवर येतो. सगळी सारखीच ठरतो आणि मग एकाच्या हृदयात वसलेला तो परमेश्वर, दुसऱ्याच्या हृदयात वसलेल्या परमेश्वराला भेटण्यासाठी मग कुठूनकुठून आलेले वारकरी उराउरी भेटतात आणि मग एकमेकांच्या पायावर डोकं टेकवत त्या हृदयातल्या परमेश्वराला नमस्कार करतात. त्याक्षणी त्यांची एकच जात असते, वारकरी. त्यांचा एकच धर्म असतो, भागवत धर्म. चोखोबाची जणू समाधी लागली होती. त्याची ती भावावस्था पाहण्यासाठी नामदेव क्षणभर थांबले. चोखोबांने डोळे उघडले. अंधारातून चाचपडत, ठेचकळत जावं आणि अचानक लख्ख प्रकाशांत वाट उजळून निघावी, तसं चोखोबांला झालं. मनातल्या बहुतेक सगळ्या शंकांचं निरसनं झालं होतं. तरीही भागवत धर्माबद्दल अजून माहीती जाणून घ्यायची इच्छाही होती.

''नामया, तुमचं बोलणं ऐकलं आणि प्रत्यक्ष त्या विठूरायाशी बोलतोय, असा मला भास झाला. देवा, आणखी कोणकोणती तत्त्व आहेत या भागवत धर्मात?'' चोखोबानं पुन्हा उत्सुकतेनं विचारलं.

**''चोखोबा! भागवत धर्माची - वारकरी संप्रदायाची एक वेगळीच परंपरा आहे. वेद प्रामाण्य, भक्ती प्रामाण्य असा हा भागवत धर्म. यात विठ्ठलभक्तीची मिरासदारी आहे. नामाचा महिमा हे त्याचे मूलतत्त्व आहे. आत्मा हाच ईश्वर आणि ईश्वर म्हणजेच आत्मा असं सांगणारा अद्वैतवाद हा याचं प्रमाण आहे आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे धर्म-जाती निरपेक्ष अध्यात्मदृष्टी ही याची मूळ संकल्पना आहे. सामाजिक समतेची ग्वाही हे या संप्रदायाचं वचन आहे. या वारकऱ्यांचा विठ्ठल हा जसा देव आहे, तसाच तो त्यांचा सखाही आहे. ती त्यांची माउली आहे, तो त्यांचा पिता आहे. विठ्ठलाची ही पंढरी हे या वारकऱ्याचं माहेरघर आहे, चोखोबा. आणि 'रामकृष्ण हरी' हा मंत्र या संप्रदायाचा महामंत्र आहे, उद्घोष आहे. म्हणूनच चोखोबा,**

***''अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ। त्याच्या गळा माळ असो नसो।''* अशा कुणालाही सामावून घेण्याची विशालता या भागवत धर्मात आहे.**

चोखोबा, तुम्हीही वारकरी आहात, विठ्ठलाचे भक्त आहात. आजपासून अगदी आतापासून तुम्ही आमचे झालात. भागवत धर्माचे झालात. आणि भागवत धर्म तुमचा झाला. चोखोबा तुमच्या माझ्या हृदयात असणारा परमेश्वर

एकच आहे. म्हणून आपण एकच आहोत. ती विठ्ठल माउली आपल्या सर्वांची आई आहे. चोखोबा आपण महार आहोत. जातीहीन आहोत, समाजाकडून उपेक्षिले गेलेले आहोत. असं कधीही वाटलं ना चोखोबा की या चंद्रभागेच्या वाळवंटात या! या वाळवंटात तुम्हाला भक्तीचा झरा सापडेल, जाती धर्माच्या पलीकडं असलेला निर्मळ झरा सापडेल. त्यातल्या पाण्यानं आपली तहान भागवा. त्या विठ्ठलाचं नामस्मरण करा आणि जा पुन्हा आपल्या गावाला.'' नामदेवांनी असं आमंत्रण दिले, अशी ग्वाही दिली की, चोखोबा गहिवरलाच. त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. भावविवश होऊन त्यांनी नामदेवांच्या पायावर डोकं टेकवलं. नामदेवांनी उचलून त्याला छातीशी धरलं. कितीतरी वेळ चोखोबा नामदेवाच्या मिठीत होता, पण आता त्याच्या शरीराला कंप सुटला नव्हता. आईच्या कुशीत ज्या विश्वासानं बाळ विसावतं त्याच विश्वासानं चोखोबा नामदेवांच्या कुशीत विसावला होता.

काही क्षण तसेच गेले. नामदेवांनी चोखोबाच्या पाठीवर थोपटलं. चोखोबा सावध झाला. मोठ्या प्रयासानं त्यानं स्वत:ला आवरलं. नामदेवांनी चोखोबाच्या खांद्याला धरून त्याला सामोरं केलं. चोखोबाच्या डोळ्यातून अविरत अश्रूधारा वाहत होत्या. पण आता त्याचे डोळे शांतवले होते. सद्‍गदित होऊन चोखोबानी नामदेवांचे हात धरले. काही क्षण त्या हाताकडे तो एकटक पाहत राहिला. त्याला आवेग आवरेना. त्याच्या डोळ्यात अपार उत्सुकता दाटली.

आणि अचानक त्यांनी आनंदल्या स्वरांत नामदेवांना प्रश्न केला, ''नामदेवा, मी-मी भागवत संप्रदायात आलो तर - तर मला विठ्ठलाचं दर्शन घेता येईल? मला-मला त्या पांडुरंगाच्या मंदिरात जाता येईल?'' गदगदल्या स्वरात चोखोबांनी प्रश्न केला. त्याचा सगळा जीव जणू त्याच्या डोळ्यांत साठला होता. आसुसलेले ते डोळे नामदेवाच्या उत्तराची वाट बघत होते.

एक क्षण - एकच क्षण नामदेवांचा चेहरा काहीसा उतरला. त्यावर एक विलक्षण खंत, एक विलक्षण घायाळ भाव उमटला. दुसऱ्या क्षणाला त्यांनी स्वत:ला सावरले. म्हणाले, ''चोखोबा, तुम्ही ना लहान मुलांसारखे आहात बघा!! त्याला कसं समजूत पटावी, म्हणून एखादी गोष्ट दिली, की लगेच पुढची गोष्ट ते मागत तसं तुमचं आहे. अहो, चंद्रभागेच्या या वाळवंटात त्या विठाई माउलीचा गजर दुमदुमत असताना आणि त्या गजरात देहभान हरपून नाचणाऱ्या वारकऱ्यात प्रत्यक्ष विठ्ठल असताना तुम्हाला ती दगडाची मूर्ती पाहायची काय आस लागून राहिली आहे? हजारो, लाखो सजीव मूर्ती विठ्ठलाच्या नामस्मरणांत तल्लीन

होऊन तिथं नाचत असताना त्यातली तल्लीनता आपल्यात उतरून आपणही त्यातलीच एक सजीव मूर्ती बनावं, असं वाटायचं सोडून त्या काळया दगडाच्या निर्जीव मूर्तीचं काय तुम्हाला दर्शन घ्यायचंय? चोखोबा, तुम्ही मगाशी कळसाला नमस्कार करत असताना मला तुमच्या नजरेत विठ्ठल, प्रत्यक्ष पांडुरंग दिसला. मग तो तुमच्या जवळच असताना तुम्हाला त्याचं वेगळं आणिक दर्शन कशापायी हवंय चोखोबा? तुम्ही भागवत धर्मात येणारं आहात ना? या भक्तीच्या झेंड्याखाली येणार आहात ना? मग 'आत्मा' हाच ईश्वर आणि ईश्वर हाच आत्मा, असं अद्वैत सांगणारं भागवत धर्माचं तत्त्व असताना तुम्हाला हे द्वैत कशापायी हवंय? चोखोबा, देव भावाचा भुकेला आहे. भक्तीचा तहानलेला आहे. तो दर्शन घेणाऱ्यांना तर पावतोच, पण ज्यांच्या हृदयात, मनात तो आहे त्यांना जास्त पावतो. बोला चोखोबा, मग आता तुम्ही काय विचार केलात?'' नामदेवांची सुस्पष्ट वाणी, खणखणीत आवाज, स्वरातली तीव्रता, चोखोबांना समजावण्याची उत्कट भावना सारं सारं ऐकलं, पाहिलं आणि पावसाची मोठी सर येऊन जावी आणि मग आभाळं कसं निरभ्र व्हावं तसं चोखोबाचं मन निरभ्र झालं. नामदेवांच्या वाणीच्या वर्षावात तर ते न्हाऊन निघालंच, पण पाणी पिऊन तृप्त झालेल्या धरणीप्रमाणे ते शांतवलंशुद्धा.

चोखोबाच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आपण किती आणि कसे वेडे होतो, हेच जणू त्याला कळालं. त्याला लागलेली विठ्ठलाची ओढशांतवली, त्याच्या दर्शनाची आस थंडावली. नामदेवांनी ते त्याच्या शांत झालेल्या चेहऱ्यांवरून ओळखलं. त्याच्या खांद्यावर पुन्हा एकदा त्यांनी थोपटलं. त्यांच्या त्या उबदार स्पर्शानं तर चोखा अवघा शांत झाला. त्याला भान आलं, जाण आली. त्यानं नामदेवांना पुन्हा नमस्कार केला. त्यांना मंगळवेढ्याला येण्याचं अगत्यानं आमंत्रण दिलं. नव्हे, ते त्यांच्याकडून कबूलही करून घेतलं. चोखोबाला तसं वचन देऊन नामदेवांनी त्याचा निरोप घेतला. चटपटीतपणे पावलं टाकत जाणारी नामदेवांची पाठमोरी मूर्ती चोखोबा कितीतरी वेळ न्याहाळत होता. अगदी ते दिसेनासे होईपर्यंत. त्यानंही आता परतायचं ठरवलं. पण पंढरपुरला आलेला चोखा आणि पंढरपुरातून जाणारा चोखा यात प्रचंड फरक होता. गोंधळलेल्या मनानं, धास्तावलेल्या गोंधळलेल्या मनानं, धास्तावलेल्या हृदयानं, प्रश्नांच्या गुंत्यामुळे भांबावलेल्या डोळ्यानं, चाचपडत पावलं टाकत पंढरपुरला

आलेला चोखा परत जाताना मात्र स्वच्छ विचारानं, भारलेल्या हृदयानं, भरलेल्या मनानं आणि ठाम विचारानं, निश्चयी आणि दमदार पावलं टाकत परतीच्या रस्त्याला लागला. त्याच्या डोक्यातला विचारांचा गोंधळ पुसला जाऊन, तिथं एक सुस्पष्ट चित्र उमटलं होतं. प्रश्नांचा गुंता संपून विचारांना एक निश्चित दिशा मिळाली होती. फक्त घडलेली सगळी घटना कधी एकदा आई-बाबांना जाऊन सांगतोय असं त्याला झालं होतं आणि याच उत्साहात आतुरतेनं त्याची पावलं भराभरा पडत होती. त्याच्या पावलांना गती होती पण विस्कळीतपणा नव्हता. आतुरता होती पण बालिशपणा नव्हता. आत्मविश्वास होता, पण गोंधळ नव्हता. मंगळवेढ्यापासनं पंढरपुरला आलेला चोखा एक वेगळाच चोखा बनून परत मंगळवेढ्याला चालला होता. एक वेगळाच चोखा बनून.

चोखोबाची आणि नामदेवाची झालेली ही भेट कर कटेवर ठेवून विटेवर उभा असलेला तो पांडुरंग पाहत होता आणि पाहतापाहता त्याचे एवढे भान हरपले की, तो क्षणभर त्या दोघांच्या तिथं, ती दोघं बसलेल्या झाडाखाली जाऊन पोहचला. नामदेवांची वाणी ऐकताना चोखोबाची लागलेली समाधी, त्याच्या डोक्यातला कमीकमी होत जाणारा विचारांचा गोंधळ आणि प्रफुल्लित होत जाणारा चोखोबाचा चेहरा. हे सगळं प्रत्यक्ष याची देही याची डोळा पाहताना तो विठूरायाशुद्धा काही क्षण आपण कोण आहोत हे विसरला आणि अचानक भानावर येऊन मूर्तीत परतला. तेवढ्या क्षणभरातही त्यानं पाहिलेली चोखोबाची उन्मनी अवस्था त्याच्या डोळ्यासमोरून हलत नव्हती. चोखोबा स्वत:चं अस्तित्व विसरून भक्ताच्या भूमिकेत शिरत असल्याचे ते लक्षण होते. आणि पंढरपुरातून परत जाणारा चोखोबा कुणी वेगळाच होता. भक्तांच्या मांदियाळीत जाऊन बसण्याचा त्याचा निश्चय आणि त्या निश्चयाचा ठामपणा, हे त्याच्या प्रत्येक हालचालीतून प्रतीत होत होतं. विठ्ठलाच्या चेहऱ्यावरचे आनंदी भाव निरखणारी रुक्मिणी मात्र हा घटकाभरात कुठं जाऊन आला, या कोड्यात पडली होती.

**– मंजुश्री गोखले**

(‘जोहार मायबाप जोहार’ या पुस्तकातून)

❖

# वाघाच्या मागावर...

*वाघाचं नाव उच्चारलं की डोळ्यांसमोर त्याची रुबाबदार छबी उभी राहते...मग तो बिबट्या असेल किंवा ढाण्या वाघ असेल. माणसाच्या वस्त्यांमध्ये बिबट्याचं येणं आता नवीन राहिलेलं नाही. एका वाघिणीने सिंहगड परिसरातील काही वाड्या-वस्त्यांवर धुमाकूळ घातलेला असतो. बकऱ्या-मेंढ्यांची शिकार ती करत असते. त्यामुळे या वाड्या-वस्त्यांवरील लोक धास्तावलेले असतात. या वाघिणीच्या शिकारीसाठी व्यंकटेश माडगूळकर सिंहगडाच्या परिसरात जातात. त्या शिकारीचं साद्यंत वर्णन 'वाघाच्या मागावर' या पुस्तकात व्यंकटेश माडगूळकरांनी त्यांच्या खास शैलीत केलं आहे; मात्र त्या वाघिणीबरोबर दोन तरण्याबांड वाघांचीही शिकार केली जाते. वाघांच्या शिकारी थांबल्या पाहिजेत आणि मानवानं जंगलांवर आक्रमण करणं सोडलं पाहिजे. या दोन गोष्टी थांबतील तेव्हाच खऱ्या अर्थाने व्याघ्रदिन साजरा करता येईल. 'वाघाच्या मागावर' या पुस्तकातील हा अंश वाघांविषयी संवेद्यतेने विचार करायला लावणारा...*

बांड्या बोकडाच्या त्या करुण अंतानंतर दुसरे बोकड घेऊन ते आम्ही पप्यापाशी दिले होते आणि 'वाघाची चाहूल लागताच ते बांध आणि खाल्ल्यानंतर लगेच सांगावा पाठव' असे सांगितले होते. त्याप्रमाणे चार-सहा दिवसांतच त्याने बकरे बांधून पाहिले, पण काही उपयोग झाला नाही. वाघीण आता ओरडायची थांबली होती आणि इकडे आम्हीही चौघे चार उद्योगांत गढून गेलो होतो.

अधूनमधून टिळक मला म्हणत होते, ''तयार राहा. आता केव्हाही

बातमी येईल.'' मी तयार होतोच. केव्हा बातमी येते, त्याची वाटच पाहत होतो. महिना-पंधरा दिवस उलटले आणि एके दिवशी मारुती येऊन सांगून गेला.

''बकरं वाघानं मारलं ना साहेब! बाबू सांगून गेला. टिळक साहेबांनी सांगितलंय, तीन वाजता जायचं म्हणून.''

''ठीक आहे. आणखी कोण आहे सोबत?''

''संभाजीराव येनार हायेत. ह्या खेपेला बराबर वाघ मिळणार बघा! अगदी बराबर!''

तीन-साडेतीनला पुण्याहून निघून आम्ही वेळेवर गडावर पोहोचलो. बांडे बकरे जिथे मारले होते, तिथेच हेही बकरे मारले होते. अद्याप पुष्कळ भाग शिल्लक होता. वाघ नक्की येणार, याबद्दल संशय नव्हता. अंधार पडायच्या आत आम्ही देवळात जाऊन बसलो.

आठाच्या सुमारास वाघीण आली. रात्र अंधारीच होती, पण बकरे खाऊ लागताच आवाज आला. एकमेकाला इशारा करून जयंतरावांनी दिवा लावला.

दोन हिरवेगार डोळे चमकले. पुरी उभी राहून वाघीण आमच्याकडे पाहू लागली. तिच्या छातीचा पांढरा भाग स्पष्ट दिसत होता. आणि कडाडकन बार झाले. ऑफ करून वाघीण ओरडली आणि खसपसत निघून गेली!

हलक्या आवाजात टिळकांनी विचारले, ''बार मारला का तुम्ही?''

''होय, मी नीट धरून मारला आहे.''

''मीही 'स्लग'ने – एका गोळीनं मारला आहे.''

''मग आता?''

''बघू काही आवाज येतो का?''

पंधरा एक मिनिटे गेली आणि लांब धारजाईकडून आवाज आला.

म्हणजे आमचे बार चुकले होते. बाबू शेजारी होता, तो हलकेच म्हणाला, ''सायेब, घोटाळा झालेला दिसतुया काईतरी. वाग मेला न्हाई.''

''अरे, मग बार होताच ओरडला कसा? फक्त बार लागल्यावरच वाघ ओरडतो ना, आता ओरडला तसा?''

''व्हय, हीही गोष्ट खरी हाय, मग ह्यो ओरडतुया कसा? गप्प बसा, ऐका.''

आवाज दुरून येण्याऐवजी जवळ आला. येता येता अगदी जवळ आला आणि गुरगुराट झाला. हा आवाज आमच्या डाव्या बाजूला वीसएक यार्डांवरून आला. वाघीण आता एका जागी थांबली होती आणि तिच्या हिरव्या डोळ्यांना काहीतरी दिसले होते, असे त्या गुरगुराटावरून वाटत होते. मध्ये थोडे थोडे अंतर ठेवून ही गुरगुर दोनदा आली आणि तत्काळ दुसरा एक आवाज उठला! 'गुर्रर्र!

हाफ फू गुर्रर!' असे वेगवेगळे दोन आवाज ऐकू येऊ लागले!

चार-सहा मिनिटे काय प्रकार आहे, हे ध्यानात येईना. बंदुका सुधारून आम्ही गपचीप बसलो आणि गर्जना ऐकत राहिलो. मग एकाएकी कल्पना आली की, वाघ दोन होते आणि ते एकमेकांना युद्धाचे आव्हान देत आहेत.

मध्येच पप्याच्या बंद झोपडीतून म्हातारी बोलू लागली, ओरडून सांगू लागली, ''काय भ्याचं कारण नाही. आज शिकार होतीया, थोडा धीर धरा. वाघाची कळवंड चाललीया. पर भ्याचं न्हाई, हत्यार घेऊन पुढं व्हायचं!''

मारुती हलक्या आवाजात म्हणाला, ''पप्याच्या म्हातारीच्या अंगातला देव बोलायला लागलाय!''

ध्यान देऊन वाघांचे भांडण आम्ही पंधरावीस मिनिटे ऐकत होतो. दरम्यान झोपडीतील सर्व माणसे आणि जनावरे जागी झाली होती. इतका वेळ आवाज ऐकल्यानंतर बाबू म्हणाला, ''सायेब, पहिला वाघ मार लागून घायाळ हून पडलाय, दुसरा समोरून आलाय. दोघं भांडायला लागलीत!''

जवळजवळ अर्धा तास आम्ही ऐकत होतो आणि मग टिळक म्हणाले, ''बाहेर होऊन मारू या का?''

ही कल्पना ऐकताच माझ्या अंगावरचे केस पिंजारलेल्या मोरपिसासारखे तरारून उठले. आणि आम्ही चौघेही बंदुका सुधारून झोपडीबाहेर आलो. जाळीभोवती अर्धवर्तुळ केले आणि भराभर दिवे पेटवले.

पण त्या भांडणाऱ्या वाघांचा पत्ता लागेना. अनपेक्षित असा हा प्रकाश पाहून ते भांडण विसरले होते आणि गप्प झाले होते; दबले होते.

बंद दाराआडून तो पायमोडका म्हातारा आणि पप्या ओरडून सांगत होते, ''म्होरं व्हा, वाटंच्या वरल्या बाजूला हायेत. हाना भडव्यासनी. बरे घावलेत.''

पत्करू नये एवढा धोका पत्करून आम्ही जाळीच्या जवळजवळ गेलो. वाकून-वाकून प्रकाशझोत टाकले, पण वाघ दिसले नाहीत. त्यांचा मागमूसही लागेना. संभाजी फार पुढे जाऊ लागला, तेव्हा मी ओरडून म्हटले, ''संभाजी, मागं फिर.''

पण आम्ही सगळेच दुबळी माणसे होतो. धुंदीतली ती विलक्षण उंची गाठण्याअगोदरच आमचा विवेक जागा झाला.

फिरून परत येऊन आम्ही झोपडीत बसलो आणि पुन्हा भांडणांचे आवाज ऐकू आले. दोन ढग एकमेकांवर आदळावेत, असे ते दोघे जण त्वेषाने एकमेकांच्या अंगावर जात होते आणि गुरगुरत होते. जाळी वाजत


**७ वी आवृत्ती**

**जीवनातील विविध पैलूंवर प्रश्नोत्तरांसह ओशोंनी दिलेल्या पाच प्रवचनांचे संकलन**

# हसत-खेळत ध्यानधारणा

**ओशो**

अनुवाद
**मीना टाकळकर**




**किंमत : ११०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

ध्यान कशाला म्हणतात – ते करण्याची पद्धती कोणती?
निर्विचार चेतना म्हणजे ध्यान! निर्विचार होण्यासाठी आधी विचारांशी जागृत असणं महत्त्वाचं. विचारांचा सततचा प्रवाह म्हणजे मन! या प्रवाहाबाबत सतत बेहोशीत असणं, सतत अजागृत असणं ही आमची नेहमीची अवस्था असते. याच बेहोशीतून निर्माण होते तादात्म्य! मनाला 'मी'ची ओळख पटायला लागते. 'जाग' आल्यानंतर पाहिलंत तर कळतं की, आपण काठावर उभे राहून इतरांना प्रवास करताना पाहतोय. या 'जाग' येण्यानंच क्रांती घडते. विचारांबरोबर स्वत:चं रमणं तुटून जातं. आपण स्वत:शीच त्रयस्थ होतो. या तादात्म्य तुटण्याच्या अंतिम किनाऱ्यापाशीच निर्विचार चेतनेचा जन्म होतो. आकाशाकडे ढग जाऊन आकाश स्वच्छ दिसावं अगदी त्याचप्रमाणे...
'विचारांशिवाय' रिकामं चित्ताकाश (निर्विचार मन) -हीच एक मौल्यवान स्थिती आहे.

होती. शेवटी एकच आवाज मोठमोठ्याने येत राहिला. दुसऱ्या वाघाला आता घरघर लागली होती. देवाच्या जंगलात जाण्याच्या तयारीला पहिला वाघ लागला होता. त्याचे कण्हणे स्पष्ट कळत होते. काही वेळाने तो आवाज अजिबात बंद झाला.

बाबू म्हणाला, ''एक वाघ मेला सायेब!''

काहीही हालचाल ऐकू न येता काही मिनिटे गेली आणि मग एकाएकी आमच्यासमोरचे ते बकरे फरकन ओढल्याचा आवाज आला. पुन्हा बॅटऱ्या पेटल्या, पुन्हा बार पेटले. काळजाचे पाणी करणारी वाघाची आरोळी कानावर आली आणि बारासरशी त्याने देवळाकडे झेप घेतली. थेट आमच्या अंगावर. दुसरा बार झाला आणि माझ्यापुढे उंच धोंड्यावर टिळक धाडकन माझ्या अंगावर कोसळले. देवळाच्या डाव्या हाताला खाली जाणाऱ्या वाटेकडची कारवी वाजली. खसपसाट करीत वाघ निघून गेला.

टिळक सावरून बसले आणि म्हणाले, ''पहिल्या झेपेतेच तो माझ्या पुढ्यात दोन फुटांवर आला. बार घातला म्हणून वळला.''

संभाजी म्हणाला, ''मी तर छपरावरच केव्हा येऊन पडतो, याचीच बंदूक वर करून वाट पाहत होतो.'' तापलेले वातावरण हळूहळू निवळले. एक वाघ तर मेलाच होता, हा दुसराही धावत जाऊन रस्त्याकडच्या कड्यावरून कोसळला असण्याची शक्यता होती.

सकाळी माग पाहण्याचे ठरवून आम्ही अंथरुणावर अंगे टाकली. तास-दीड तास झाला आणि आश्चर्य म्हणजे उजव्या बाजूला पार दऱ्यात जवळजवळ एक मैलावरून आणखी गुरकणे ऐकू आले!

म्हणजे एकूण तीन वाघ गडावर वावरत होते!

सकाळी पहिला वाघ मेट्यापासून शंभर-सव्वाशे यार्ड खाली असलेल्या रस्त्याच्या डाव्या अंगाच्या दरीत कोसळून मेलेला आढळला. हा नर होता. दुसरा मेट्यापासून तीस यार्डांवरच्या फेरीच्या वाटेवरच ओघळीत पालथा पडला होता आणि हाही नरच होता. दोन्ही वाघ चांगले तयार होते. तरुण होते. सकाळच्या उन्हात त्यांची सोनेरी अंगे झळाळत होती. रात्री झालेल्या झोंबीत एकमेकांनी ओचकारलेल्या खुणा दोघांच्याही अंगावर होत्या.

शेजारशेजारी हिरवळीवर पडलेल्या त्या दोन उमद्या जनावरांकडे पाहता पाहता शिकार साधल्याचा आनंद ओसरला आणि माझे मन जड झाले. जंगलचे हे उमदे वैभव अचेतन झाले, याबद्दल विषाद वाटला!

तसे पाहिले, तर शिकारीत सुरुवातीपासून शेवटपर्यंत शिकारीचे नियम

पाळले गेले नव्हते. शिकाऱ्याची म्हणून अशी एक नीती आहे. खरा शिकारी ती
पाळले गेले नव्हते. शिकाऱ्याची म्हणून अशी एक नीती आहे. खरा शिकारी ती
नेहमीच पाळतो. अद्याप ओरडत फिरणारी ती वाघीण मारली असती, तर माझ्यापाशी काही उत्तर होते. रानावनातले आपले नैसर्गिक भक्ष्य सोडून ती गुरे-शेरडे मारू लागली होती. बापड्या मेटकऱ्यांचे नुकसान होत होते. ती तशीच राहिली असती, तर उपद्रव वाढणार होता. त्यामुळे पाळीव जनावरांना मारायला सोकलेली ती वाघीण मारणे चुकीचे झाले नसते; पण समोर पडलेल्या त्या दोघांनी काय बरे अपराध केला होता? दिवसरात्र गडावर फिरणाऱ्या वाघिणीच्या हाका ऐकून ते इथे आले होते, ही घटना अगदी नैसर्गिक आणि स्वाभाविक होती. या रानात पाऊल टाकण्यापलीकडे त्यांच्या हातून काही अपराध झाला नव्हता. मग? रात्रभर आम्ही त्यांना वेदनांनी का तडफडू दिले? बरे वाघाचे एक राहू द्या, परंतु वाघिणीला फसविण्यासाठी त्या बिचाऱ्या अजा-पुत्राचा बळी का दिला! आता नव्या कायद्याने असे बकरे बांधण्यास त्यास बंदी घातली आहे ते वेगळे! तसेच हातात बंदुका असून ते तरस धोंड्यांनी का मारू दिले?

बचाव करण्याजोगी एकच ढाल माझ्यापाशी होती आणि ती म्हणजे अज्ञान! मी नवशिका होतो आणि नवशिक्या खेळाडूंनी मोडलेले नियम माफ केले जावेत; पण त्याबरोबर हेही खरे की, ही ढाल मी इथून पुढे वापरणार नव्हतो!

त्या दोन वाघांपैकी एका वाघाचे सुरेख कातडे माझ्या बसायच्या खोलीत आहे. माझ्या लहान घराला त्याने भव्यता दिली आहे. माझ्या घरी पहिल्यानेच येणारा प्रत्येक चौकस माणूस निसर्गाने विणलेल्या या सुरेख गालिच्यावरून हात फिरवतो आणि जनावर कुठे मिळाले, म्हणून चौकशी करतो. मग सिगारेट पेटवून आणि कोचात रेलून नवशिक्या शिकाऱ्याच्या ह्या शिकारीची हकिगत मी सांगू लागतो. गोष्टी सांगणे हा जन्माचा धंदा असूनही ही गोष्ट सांगण्याचा मी कधीच कंटाळा करत नाही.

ती हुशार वाघीण कातडे काढून घेतलेल्या त्या दोन्ही प्रियकरांभोवती दोन-तीन दिवस होती आणि ओरडत होती, ही गोष्ट मेटकऱ्यांनी त्यानंतर काही दिवसांनी आम्हाला सांगितली.

तिचे पुढे काय झाले? या दोन प्रियकरांपाठोपाठ तीही आमच्या बंदुकीला बळी पडली का?

– पण ती गोष्ट वेगळी आहे; मी सांगत होतो ती गोष्ट इथे संपली.

**– व्यंकटेश माडगूळकर**

(‘वाघाच्या मागावर’ या पुस्तकातून )

❖

# उद्योगाचा महामेरू

*जे.आर.डी.टाटा हे भारताच्या उद्योग जगतातील एक अग्रगण्य नाव. टाटा उद्योग समूहाची धुरा त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली आणि टाटा उद्योग समूहाचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास केला. जे.आर.डी. यांचं हे अफाट कर्तृत्व आणि त्यांचं कुशल नेतृत्व यावर प्रकाश टाकणारं हे प्रकरण...*

''सर नौरोजी सकलातवाला यांच्या अकस्मात, अवेळी झालेल्या मृत्यूनंतर सर्व संचालकांनी मनाच्या बधिरलेल्या अवस्थेत मला त्यांच्या खुर्चीत बसवले.'' असे जेआरडी डोळे मिचकावत म्हणत असत. लहानपणी सर्वसामान्य मुलांप्रमाणे त्यांना मोटार ड्रायव्हर, पोलो वा टेनिस खेळाडू व्हायचे होते; पण १९२६मध्ये वडिलांनी शिक्षण सोडून धंद्यात यायला सांगितले आणि त्यांनी टाटा सन्समध्ये काम करायला सुरुवात केली. विमान उडवण्याचा छंद जोपासत त्यांनी एकेका कंपनीच्या कामकाजात तडफेने भाग घेतला. खुल्या मनाने, प्रयोगशील वृत्तीने ते व्यवसायातील खुब्या शिकत राहिले. पहिल्या बारा वर्षांत एकेक जबाबदाऱ्या पेलत झोकून देऊन काम करताना आपल्या व्यवहारात, तारुण्यातील ताजेपणा, नवे प्रयोग करून पाहायची त्यांची वृत्ती इतरांच्या लक्षात आली. त्यामुळेच सर नौरोजींचे निधन झाले तेव्हा संचालक मंडळावर अनेक ज्येष्ठ मंडळी असताना एकमताने त्यांना चेअरमन पदावर नियुक्त करण्यात आले. ते आरडी टाटांचे ज्येष्ठ पुत्र आहेत त्यामुळे तहहयात संचालकपदी राहाणार हे उघडच होते; पण नात्यागोत्यापेक्षा लायक माणूस त्या पदावर नेमायचा संस्थापक श्री.

जमशेदजी टाटा यांनी पाडलेला पायंडा सर्व संचालकांनी पाळला. श्री. अर्देशीर दलाल हे एकच संचालक त्यांच्या अननुभवीपणाबद्दल प्रथम साशंक होते; पण वर्षभराच्या त्यांच्या कामकाजाचे निरीक्षण केल्यावर त्यांनीही हा निर्णय योग्य असल्याची नि:संदिग्ध शब्दात ग्वाही दिली.

प्रथम जेआरडींना आपल्याला वडिलांनी इंजिनियरिंग पदवीचे शिक्षण घ्यायची इच्छा पूर्ण करू दिली नाही असा सल डाचत असे. आपला मृत्यू कळल्यासारखे फक्त आठ महिने आधी त्यांनी आपल्याला कामाला लावले याबद्दल ते नाराज होते. पुढे आपण तंत्रज्ञानातील औपचारिक पदवी घेतलेली नाही याबद्दल अनेकदा ते गमतीने तर कधी खेदपूर्वक उल्लेख करत; पण त्यावेळी वडिलांची आज्ञा प्रमाण मानून त्यांनी वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी टाटा सन्समध्ये कामाला सुरुवात केली. श्री. जमशेदजींनी, स्वत: श्री. आरडी यांनी तंत्रज्ञानातील औपचारिक पदव्या न घेता कंपनी सांभाळली, विस्तार केला, नवेनवे उद्योग कार्यक्षमतेने उभारले तेव्हा त्याची गरज नाही, असा त्यांच्या वडिलांचा त्या काळाला सुसंगत असा दृष्टिकोन होता. लवकरच जेआरडींना माणसे कशी हाताळावीत, याचे उपजत असलेले ज्ञान अनुभवाची झिलई चढून धारदार होत गेले. प्रत्येक बुद्धिमान माणसाची कामाची पद्धत स्वतंत्र असते. त्यामध्ये बाधा न आणता त्यांना काम करू द्यावे. फक्त चुकते आहे असे खात्रीने, स्पष्ट दिसते तेव्हाच हस्तक्षेप करून त्यांना चूक पटवून द्यावी म्हणजे त्यांच्यातील उत्तम गुण विकसित होत जातात आणि त्याचा फायदा कंपनी अधिक कार्यक्षमतेने चालण्यात, फायद्याची रेषा उंचावत नेण्यात होतो. या ठाम विचाराने जेआरडी माणसे हेरून त्यांना घडवत गेले. त्यांचे हे योगदान टाटा उद्योगसमूह कधीही विसरू शकणार नाही.

तंत्रज्ञानाची पदवी न घेतल्याची उणीव जेआरडींनी उत्तमोत्तम पुस्तके वाचून भरून काढली. आपले ज्ञान अद्ययावत अन् अचूक ठेवण्याबद्दल ते काटेकोर होतेच; पण जेव्हा जेव्हा गरज पडली तेव्हा त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला ते अधिक महत्त्वाचा मानत. 'आपण सैनिकापासून अधिकारी न होता एकदम जनरलपदी पोचलो आहे,' अशी हसत टिप्पणी करून ते चर्चा घडवून आणत आणि त्यातून योग्य ते निवडत. आपल्या समस्या कोणताही अभिनिवेश न घेता मोकळेपणाने मांडणे आणि चर्चा करून, सल्लामसलत करत योग्य त्या उपायापर्यंत पोचणे अशी त्यांची कार्यपद्धती होती. त्यामुळे संचालक मंडळाच्या सभेत ते कधी एकाकी पडले नाहीत. परिस्थितीचे, समस्यांचे योग्य विश्लेषण

करणे हा त्यांचा उपजत गुण होता. सगळी कागदपत्रे समोर ठेवून नीट पाहिली तर योग्य आकलन होते आणि नेमके उपाय सुचतात. माणसे अप्रामाणिक नसतात यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे मुद्दाम कुणी वाकडे वागलेले स्पष्ट लक्षात येईपर्यंत ते माणसांवर विश्वास टाकत आणि त्यांचा विश्वास फारसा चुकीचा ठरला नाही. एका मोठ्या उद्योगसमूहाचा नेता म्हणून आपण घेतलेला एखादा चुकीचा निर्णय हजारो लोकांच्या आयुष्यावर परिणाम करू शकतो याचे त्यांना सतत भान होते. निर्मिती करायला वर्षानुवर्षे लागतात; पण विध्वंस व्हायला फार थोडा काळ पुरतो हेही ते कधी विसरले नाहीत. म्हणून संचालक मंडळ आणि संबंधित तज्ज्ञमंडळी यांच्या सहमतीने निर्णय घेऊन अंमल करणे अशी त्यांच्या कामाची पद्धत होती; पण मतभेद झाले तर शेवटचा निर्णय घेण्याचा हुकमी एक्का ते नेहमी स्वत:कडे ठेवत. तपशील अगदी चोख हवा याबाबत ते फार काटेकोर होते. कधी कधी इतरांना त्याचा त्रास होई; पण परिणाम उत्कृष्ट हवा असेल तर बारीकसारीक बाबीही परिपूर्ण हव्यात यावर त्यांचा विश्वास होता. 'परफेक्शन इज इन डिटेल्स' हे वाक्य त्यांनी अनेकांना अनेकवेळा हसत ऐकवले आहे. विशेषत: आकडेवारी सांगताना 'अंदाजे' हा शब्द त्यांना आवडत नसे. ते स्वत:जवळ इंजिनियर आकडेमोड करण्यासाठी वापरतात ती स्लाईड रूल पट्टी ठेवत आणि चटकन नेमका आकडा काढून समोरच्याच्या हातात ठेवत.

दरवर्षी भागधारकांच्या सर्वसाधारण सभेत त्यांना चेअरमन म्हणून अध्यक्षपद स्वीकारावे लागे. त्यावेळी ते संपूर्ण तयारीनिशी जात आणि आपल्या भाषणात कंपन्यांच्या खऱ्याखुऱ्या आर्थिक स्थितीचे चित्र पारदर्शक पद्धतीने मांडत. विचारलेल्या प्रश्नांना हजरजबाबी वृत्तीने उत्तरे देऊन वातावरण खेळीमेळीचे ठेवत. टाटांच्या संचालक मंडळात वरिष्ठ, अत्यंत बुद्धिमान, कार्यक्षम पण बहुविध वृत्तीची माणसे होती. त्यात आपण निवडलेली वेचक माणसे नेमून जेआरडींनी निर्णयप्रक्रिया परिपूर्णतेकडे नेण्याचे प्रयत्न तर केलेच; पण आपला वचक ठेवून, सौहार्दपूर्ण वागणे, मैत्रीचा हात सतत पुढे करणे आणि प्रत्येकाला आपापला पैसा देणे या अलौकिक गुणामुळे हे संचालक मंडळ एक कुटुंब बनले. ही कुटुंब असल्याची भावना पुढे खोलवर झिरपत जाऊन त्यांच्या सर्व उद्योगांत पसरली आणि टाटा उद्योगसमूहाचे पुढील पन्नास वर्षे वैशिष्ट्य म्हणून ठरली.

जेआरडींच्या आधी चेअरमनपदी असलेले सर नौरोजी यांची कार्यपद्धती

**४ थी आवृत्ती**

(तीन अंकी नाटक)

# हे बंध रेशमाचे

## रणजित देसाई




**किंमत : ८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

शराब, सत्ता आणि पैसा यांची नशा चढली, तर केव्हा-ना-केव्हा ती उतरते; पण ही धर्माची नशा. तिच्यासारखी बुरी चीज नाही. तिची परीक्षा घेऊ नये, श्री...

धर्म का वाईट?

कोण म्हणतो? धर्म निष्पाप, अजाण असतो. माणुसकीचं बोट धरून धर्म चालतो, तेव्हा पृथ्वीवर स्वर्ग अवतरल्याचा भास होतो. पण नुसत्या धर्माचं बोट धरून माणूस जेव्हा चालायला लागतो, तेव्हा स्वर्गाचा नरक बनायला फारसा वेळ लागत नाही. पाठीशी घेतलेली चीजवस्तूच नव्हे, पण बरोबरची माणसंसुद्धा कडेपर्यंत सुखरूप पोहोचत नाहीत...

फाळणीच्या पार्श्वभूमीवर दोन मित्रांच्या अतूट मैत्रीवर साकारलेलं नाटक!

वेगळी होती. जेव्हा जेव्हा समूहाला एखाद्या विशिष्ट समस्येसाठी तज्ज्ञाची गरज भासे, तेव्हा पैसे देऊन तेवढ्यापुरते बोलावून घेतले जाई. त्यावेळी इंग्लंड, अमेरिकेत आणि भारतातही सर्व उद्योग हीच पद्धत अवलंबत असत. जेआरडींनी आपल्याला सर्वसामान्यपणे जे तज्ज्ञ नेहमी लागतात, ते उपलब्ध असावेत म्हणजे कालहरण होणार नाही, त्यामुळे जो फायदा होईल तो त्यांच्या फीपेक्षा कितीतरी अधिक असेल, असा विचार केला आणि अशा तज्ज्ञांना टाटांच्या सेवेत सामावून घेतले. कंपनीच्या कामकाजात त्यांनी केलेला हा पहिला महत्त्वाचा बदल होता. अर्थतज्ज्ञ श्री. दिनशॉ, वकील आणि सॉलीसिटर श्री. जे.डी. चोक्सी, नंतरच्या काळात श्री. नानी पालखीवाला असे अनेक तज्ज्ञ टाटांच्या पगारपत्रकावर आले. श्री. पालखीवाला यांनी तर स्वतंत्र वकिली करून भारतीय व्यवसायक्षेत्रात आपली खास मुद्रा उठवली. अनेक वर्षे भारताचे न-निर्वाचित अर्थमंत्री असा लौकिक आपल्या भाषणांनी, कर्तृत्वाने मिळवला आणि तीस वर्षे टाटा समूहाच्या महत्त्वाच्या कायदेशीर जबाबदाऱ्याही सांभाळल्या. श्री. होमी मोदी, धाकटी बहीण रोडाबेह हिचे पती कर्नल सहानी, श्री. दलाल, श्री. रूसी मोदी, श्री. किश नौरोजी, डॉ. जॉन मथाय, श्री. ए.डी. श्रॉफ, श्री. मेहता, श्री. सुमंत मुळगावकर, श्री. तळावलीकर, श्री. अजित केरकर, श्री. पेंडसे, श्री. दरबारी सेठ अशा अनेकांना जेआरडींनी निमंत्रण देऊन टाटांच्या सेवेत सामावून घेतले. जसजशी वर्षे गेली, टाटा समूहाचा विस्तार झाला आणि त्या सर्वाला या वेगवेगळ्या माणसांनी हातभार लावला. पुढे जो समूहाचा नव्यानव्या क्षेत्रात प्रवेश होऊन, त्यात पाय रोवून अनेक कंपन्या टाटांच्या छत्राखाली आल्या, त्यामध्ये अशा माणसांनी आपली कार्यक्षमता पूर्ण पणाला लावली. ते सर्वजण जेआरडींचे वैयक्तिक स्नेही होते. आपापल्या क्षेत्रात त्यांनी उत्तुंग कर्तृत्व बजावले. त्यांना एकत्रित सांभाळणे म्हणजे तारेवरची कसरतच होती; पण हे कर्मकठीण कार्य जेआरडींनी कौशल्याने पार पाडले. टाटांच्या उद्योगसमूहाचा विस्तार म्हणजे फक्त वैयक्तिक उत्कर्षच नव्हे तर ते कामाचे समाधान देणारे कार्य आहे, देशाच्या हिताचे कार्य आहे आणि देश उभारणीत त्यांचा हातभार लागणार आहे, ही भावना त्या सर्वांपर्यंत पोचवण्यात जेआरडी यशस्वी झाले. ही सर्व माणसे जेआरडींनी टाकलेल्या विश्वासाला जपत राहिली आणि आपला जवळ जवळ सर्व कार्यक्षम काल त्यांनी टाटा उद्योगसमूहासाठी वेचला. जेआरडी चेअरमनपदी असेपर्यंत त्यांनी क्वचितच

कुणाला काढले किंवा कुणी त्यांना सोडून गेले. आजची 'करियर ग्राफ' ही संकल्पना त्यांपैकी कुणाच्या मनाला शिवली नाही. कंपन्या बदलत राहून वैयक्तिक उत्कर्ष अधिक महत्त्वाचा वाटणे असे त्यावेळच्या टाटासमूहातील अधिकाऱ्यांना तरी वाटत नव्हते, त्याचे प्रमुख कारण म्हणजे जेआरडींचा वैयक्तिक स्नेहही या सर्वांना भरपूर मिळाला.

चेअरमनपद स्वीकारल्यावर अचूकता हा कामाचा निकष मानणाऱ्या जेआरडींनी आणखी एक सकारात्मक बदल केला. कोणतीही समस्या वा प्रकल्प उभा करताना त्याचे सर्वांगीण चित्र समोर उभे हवे. त्यासाठी आकडेवारी महत्त्वाची ठरते असे लक्षात येताच जेआरडींनी टाटामध्ये स्वतंत्र 'स्टॅटिस्टिकल' विभाग सुरू केला. प्रकल्पाची उभारणी, विस्तार, उत्पादन, विक्री, गरजा या संदर्भातील सर्व आकडेवारी हवी तेव्हा उपलब्ध व्हावी म्हणजे आर्थिक गणित फायद्यात राहील असे नियोजन करता येते. १९४०साली हा विभाग उघडून त्यांनी त्यावेळी मुंबई सरकारच्या सेवेत असलेले श्री. वाय. एस. पंडित यांना बोलावून त्यांच्यावर या विभागाची जबाबदारी सोपवली. पुढील अठ्ठावीस वर्षे त्यांनी हा विभाग कार्यक्षमतेने सांभाळला. त्यामुळे इतर उद्योगसमूहाच्या पुढे चार पावले राहणे टाटा उद्योगाला शक्य झाले. तोपर्यंत फक्त सरकारी खाती, गरजेपुरती आकडेवारी गोळा करत असत आणि लागेल तेव्हा उद्योगसमूह तीच वापरून आपला कार्यभाग साधत. टाटांनी हा विभाग सुरू केल्यावर विविध प्रकारची आकडेवारी सरकारी कारभारापेक्षा कित्येक पटींनी कार्यक्षमतेने गोळा करून व्यवस्थित क्रमवार लावून ठेवली गेली. जेआरडी  पूर्वसूचना न देता कोणती आकडेवारी कधी मागवतील याचा नेम नसे. पुढे पुढे अनेक उद्योगसमूहच नव्हे तर सरकारसुद्धा 'बॉम्बेहाऊस' या टाटांच्या मुख्य कचेरीतून आकडेवारी मागवून घेऊन त्याचा उपयोग करू लागले. पुढे याच विभागाला अर्थविभाग जोडून घेऊन या माहितीचा पाया आणखी रुंद करण्यात आला. कोणताही नवा प्रकल्प हाती घेताना ही आकडेवारी महत्त्वाची ठरू लागली. तसे जेआरडींच्या दूरदृष्टीचे मोल सर्वांना कळून चुकले. माणसानी फक्त आपले काम कार्यक्षमतेने करणे एवढ्यावरच संतुष्ट असू नये हा विचार त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांत रुजवला. आपापल्या विभागात नवे काय करता येईल, प्रयोगशील कसे राहता येईल, यावर विचार करायला ते त्यांना उद्युक्त करत. त्यांनी केलेल्या सूचना शांतपणे ऐकून घेत, चर्चा करत आणि पटल्यावर अमलात आणण्यासाठी त्यांना पूर्ण पाठिंबा देत. अशा वृत्तीमुळे कंपनीची भरभराट तर होईच; पण आपण फक्त नोकर नसून निर्णयप्रक्रियेत आपला सहभाग आहे, ही

भावना इतरांना आणखी समर्पित भावनेने काम करायला उद्युक्त करत असे. निवडतानाच ही सर्वजण बुद्धिमान, उत्तम करियरची असल्याने टाटासमूहात सतत नवा विचार येत राहिला. यातील अनेकांना जेआरडींनी पुढे संचालक मंडळावर नेमले आणि संचालक मंडळ नंतर अधिक विस्तृत पायावर काम करू लागले. बुद्धिमान, कार्यक्षम, स्वतंत्र वृत्तीच्या माणसांना एकत्र सांभाळण्यासाठी जेआरडींचा वैयक्तिक स्नेह हा मजबूत धागा होता. कधी कणखर, कधी मृदू, कधी विनोदी, हजरजबाबी टिप्पण्या करून जेआरडी बैठकीतील ताण नाहीसा करून सुसंवाद साधण्यात यशस्वी होत. प्रसंगी आपला निर्णय कटुता न येऊ देता लादत. ही टीम एकत्र राखणे कंपनीच्या, भागधारकांच्या, आपल्या सर्वांच्या आणि देशाच्या हिताचे आहे हा त्यांचा विचार पक्का होता.

त्यावेळी देशात टाटांच्या जवळपास पोचू शकणारा दुसरा उद्योगसमूह म्हणजे बिर्ला यांचा होता. त्याचे प्रमुख श्री. घनश्यामदास बिर्ला हे महात्मा गांधींच्या संपर्कात आले आणि स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी उघड सहभाग घेतला. आपणही स्वातंत्र्यासाठी चाललेल्या महासंग्रामात प्रत्यक्ष उडी घ्यावी असे विचार जेआरडींच्याही मनात आले. त्या काळातील दोन-तीन पिढ्या घरदार त्यागून या संग्रामात झोकून देऊन उतरल्या होत्या आणि एक प्रकारचे समर्पणाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यापासून स्वत:ला दूर राखणे कुणाही संवेदनशील माणसाला शक्य होणारे नव्हते; पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचा विकास करणे हाही देशसेवेचा अप्रत्यक्ष मार्ग आहे आणि तोच स्वीकारण्यात आपले आणि देशाचे हित आहे हा विचार अधिक प्रबळ ठरला. त्यासाठी पूर्वतयारीची आवश्यकता होती आणि त्यामध्ये जेआरडींनी स्वत:ची कार्यक्षमता वापरणे इष्ट ठरेल असा व्यापक विचार केला. युद्धकाळात सरकारच्या गरजा ओळखून त्यांनी युद्धविषयक उत्पादने निर्माण केली, तसेच त्यांची विमानसेवा सरकारच्या मदतीला उभी राहिली. त्यांचे अनेक अधिकारी तसेच पैसा उपलब्ध करून दिला आणि स्वातंत्र्य चळवळीला एका वेगळ्या दिशेने आपले योगदान दिले.

दुसऱ्या महायुद्धानंतर स्वातंत्र्य अगदी जवळ आले आहे हे उमजले तसे जेआरडींनी समूहाच्या विस्ताराच्या धडाकेबाज योजना आखल्या. नवे प्रकल्प चालवण्यासाठी बुद्धिमान युवक आकर्षित करावे या हेतूने 'सुपिरियर स्टाफ रिक्रूटिंग' समिती नेमली. स्वत: मुलाखती घेऊन उत्तम शैक्षणिक गुणवत्तेचे

तीन तरुण निवडले. त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपवायच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण दिले. दोनच वर्षांत ते टाटांना सोडून अधिक उत्पन्न वा अधिकार देणाऱ्या कंपनीत गेले. पुढे या तिघांनीही उत्तम करियर केली तरी जेआरडींचा हेतू विफल झाला. संचालक मंडळातील अनेकांनी जेआरडींच्या या उपक्रमावर विनोद केले आणि जेआरडींनी ते खिलाडूपणे स्वीकारले. आपल्या सेवेकडे बुद्धिमान, महत्त्वाकांक्षी तरुण आकर्षित करणे योग्यच आहे, ही आपली मूळ कल्पना बरोबर आहे, फक्त ते करण्याचे आपले मार्ग चुकले असा त्यांचा ठाम विश्वास होता. आपल्या उद्योगाचे विस्तारीकरण, नवे प्रकल्प उभारणे, त्यांचे कार्यक्षम व्यवस्थापन या साऱ्यासाठी तरुण हवेत तर स्वत:चे व्यवस्थापन प्रशिक्षण देणारे केंद्र हवे, असा या विचाराचा प्रवास झाला. त्यावेळी 'व्यवस्थापनशास्त्र' हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय मानला जात नव्हता. त्यामुळे होतकरू तरुणांची व्यवस्थापनकौशल्ये तपासण्याचे मापदंडही नव्हते. स्वत: जेआरडींना व्यवस्थापनाचे धडे श्री. जॉन पिटर्सन यांनी दिले होते; पण ते वैयक्तिक अनुभवांवर आधारित, काम करता करता शिकवलेले कौशल्य होते. जेआरडींनी आपला विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी 'टाटा ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसेस' या स्वतंत्र कंपनीची स्थापना केली. टाटांच्या अनेक उद्योगांत नव्याने प्रवेश करणाऱ्या तरुणांना इथे प्रशिक्षणात्मक अनुभव देऊन मगच सामावून घेतले जाई. लंडन स्कूल इकॉनॉमिक्समधून पदवी घेतलेले डॉ. मेहता हे या संस्थेत आलेले पहिले तरुण होते. पुढे देशात अन् परदेशात नामवंत अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी ख्याती मिळवली. त्यांनी पुढील तीस वर्षे टाटांच्या विविध कंपन्यांत काम केले. जेआरडींनी आपल्याला घडवले असे ते सांगतात.

माणसाने व्यवहार संभाळताना भावनांवर काबू ठेवायला हवा असे जेआरडी म्हणत. त्यामुळे हाताखालच्या अधिकाऱ्यांनी भावनेच्या भरात चुका केल्या तर ते स्पष्ट शब्दांत सांगत असत. बहुसंख्य उद्योगांत हाताखालची माणसे प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधून लोकांसमोर येऊ लागली अन् आपल्यापेक्षा मोठी होऊ लागली की, अधिकारी वर्ग त्यांचे पंख छाटण्याचे मार्ग शोधून, आपल्या अधिकाराचा वापर करून ते अमलात आणतात. जेआरडी याबाबत उदारवृत्तीचे होते. माणसे मोठी झाली तर ते उद्योगसमूहाच्या अंतिम फायद्याचे आहे, याचे पक्के भान त्यांना होते. कित्येकदा त्यांनी आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांच्या वागणुकीची, व्यक्तिमत्त्वाची विरोधी चिकित्सा केली. त्यांना प्रत्यक्ष वा पत्रातून समज दिली; पण कधीही विरोधात कृती केली नाही. उद्योग व्यवसायातील साठ

वर्षांच्या कारकिर्दीत एकदोघे सोडले तर त्यांनी कुणालाही कामावरून काढले नाही. एखाद्याचा दोष कंपनीला नुकसानकारक ठरणार आहे असे त्यांना वाटले तर ते त्याचा विभाग बदलून टाकत आणि बहुतेकवेळा त्याच्या व्यक्तिमत्त्वाला पोषक होईल असे काम देण्याची दक्षता घेत. मुळात पहिल्यांदा घेतानाच उत्तम माणसे निवडलेली असल्याने त्यांना सोडणे वा काढून टाकणे त्यांना रुचत नसे. आपल्या सर्व अधिकाऱ्यांनी उपलब्ध माहिती आणि ज्ञान मिळवूनच कामाला भिडावे असा त्यांचा प्रयत्न असे. स्टॅटिस्टिक्स आणि इकॉनॉमिक्स  विभाग स्थापून अशी माहिती पुरवण्याची सोय करणारे ते देशातील पहिले उद्योगपती होते. तसेच आपल्या समूहात जनसंपर्क विभाग सुरू करून तो मिनू मसानी यांच्यासारख्या कार्यक्षम, बुद्धिवादी माणसाच्या ताब्यात देऊन सर्व कंपन्यांत सौहार्दाचे वातावरण राहील याची खबरदारी घेणारा हा देशातील पहिला उद्योग असावा.

'टाटा ॲडमिन सर्व्हिसेस' या उपविभागातील व्यवस्थापक हे एकाच उद्योगात न ठेवता जेआरडींच्या सूचनेवरून फिरते ठेवले जात. वेगवेगळ्या कंपन्या आपापल्या समस्यांसाठी त्यांना बोलावून घेत आणि तिथे जाऊन हे व्यवस्थापकीय अधिकारी काम करत. त्यांचे तिथे नीट जमले नाही, मतभेद उत्पन्न झाले तर त्यांनाही बदली मागायचा अधिकार देऊन हे धोरण जेआरडींनी लवचिक ठेवलेले होते. अशा वेळी त्यांना मिळणारा पगार, इतर सोयीसवलती, वरिष्ठता आदी बाबी राखून ठेवण्यात येत असत. अशा व्यवस्थेमुळे हे अधिकारी एका विशिष्ट उद्योगाच्या विकासाऐवजी संपूर्ण उद्योगसमूहाच्या विकासाचा विचार करत आणि तशा पद्धतीचे काम त्यांच्या हातून घडून येई. उद्योगसमूहात त्यामुळे एकी राहत असे. आजसुद्धा आय.आय.एम वा आय.आय. टी.तील तरुण पदवीधर टाटांच्या सेवेत येण्यासाठी उत्सुक असतात; कारण तिथले वातावरण नियमावलीत करकचून बांधलेले नसल्याने तारुण्यातील प्रयोगशील विचारांना तिथे संधी मिळते असे त्यांना वाटते. अलीकडे एखाद्या कंपनीत स्थिरावलेले असे तरुण जाऊ देणे उच्च अधिकाऱ्यांना आवडत नाही. ते विरोध करतात, म्हणून अशा बदल्या कमी झाल्या आहेत; पण अजूनही एखाद्या ठिकाणी गरज असेल तर दुसऱ्या विभागातून माणसे पाठवणे टाटामध्ये पाळले जाते. काळानुसार या संस्कृतीमध्ये बराच बदल घडलेला आहे. टाटा उद्योगसमूहाचे आजचे अवाढव्य रूप पाहिले तर हे बदल अपेक्षितच आहेत; पण अजूनही इतर

कंपन्यांशी तुलना केली तर जेआरडींनी टाटामध्ये रुजवलेली कुटुंबसंस्कृती टिकून आहे असे म्हणता येते. जेआरडींच्या शेवटच्या वर्षात त्यांना या बदलाचा वेग थांबवता आला नाही; पण आपण केलेले बदल जसे हिताचे ठरले तसे नव्या पिढीने केलेले बदलही उद्योगसमूहाच्या अंतिम हिताचे ठरतील असा त्यांना विश्वास वाटत होता. भविष्यात 'टाटा ॲडमिन सर्व्हिसेस' हा विभाग समूहाच्या सर्व कंपन्यांना एकत्र ठेवणारा मजबूत धागा बनेल असा विश्वास त्यांनी जाहीरपणे व्यक्त केला. १९८८मध्ये या विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर बोलताना त्यांनी व्यवस्थापनशास्त्रातील बदलत्या प्रवाहाबद्दल, नव्या पिढीच्या स्वकेंद्रित विकासाच्या कल्पनांबद्दल आपली टिप्पणी केली. त्यांनी म्हटले, की हे सर्व बदल स्वीकारूनही तुम्ही निष्ठा, प्रामाणिकता या गुणांचा विकास करू शकता. निष्ठा ही फक्त विशिष्ट उद्योगाशी वा कंपनीशी असावी असे नव्हे तर आपल्या जीवनाच्या हेतूशी निष्ठा असावी. आपल्या नीतिमूल्यांशी, विचारांशी असावी आणि महत्त्वाचे म्हणजे आपल्या देशाशी असावी. संधीचा जास्तीतजास्त उपयोग करून उत्तम सेवा देणे, त्यासाठी प्रयत्न करणे हा विचार कधीही सुटता कामा नये.

टाटा ॲडमिन सर्व्हिसेसमधून नव्याने भरती होणाऱ्या तरुणांना प्रशिक्षण देणे यशस्वीपणे राबवले जात होते. तेव्हाच जेआरडींच्या मनात मध्यम वयाच्या काही वर्षे सेवा केलेल्या अधिकाऱ्यांनाही बदलत्या विचारप्रवाहाशी परिचित करावे अशी कल्पना घोळू लागली. १९६१मध्ये अहमदाबादला हार्वर्ड विद्यापीठाच्या सहयोगाने पहिली आय.आय.एम. संस्था सुरू होण्यापूर्वी जेआरडींनी आपल्या सेवेत दहा-बारा वर्षे पूर्ण केलेल्या अधिकाऱ्यांना नव्याने प्रशिक्षण द्यावे, असा विचार केला हे महत्त्वाचे आहे. त्यांनी पुण्यातील टर्फ क्लब एक महिन्यासाठी भाड्याने घेतला अन् टाटांच्या वरिष्ठ, मध्यम आणि तरुण वयाच्या अधिकाऱ्यांना एकत्र आणून संवाद साधायची संधी दिली. श्री. जॉन मथाय सारख्या अधिकाऱ्यांना या तरुणांनी, मध्यम वयाच्या व्यवस्थापकांनी आपल्या समस्या सांगून मार्गदर्शन घेतले. नव्या विचाराने, उत्साहाने भारलेले हे व्यवस्थापक आपापल्या आस्थापनात परतले तेव्हा अधिक जोमाने, प्रेरणेने कामाला भिडले. हा अनुभव इतका समृद्ध होता, की पुढे १९६४ मध्ये पुण्यात कायमस्वरूपी केंद्र स्थापन करण्यात आले. या टाटा मॅनेजमेंट ट्रेनिंग सेंटरमध्ये ठराविक कालानंतर प्रशिक्षण घेणे हा पुढे रिवाज बनला. इथे फक्त टाटांनीच नव्हे तर पुढे इतर कंपन्यानींही आपले अधिकारी पाठवून व्यवस्थापन क्षेत्रातील नव्या कल्पना समजून घेण्यासाठी पुढाकार घेतला. १९८७मध्ये पंतप्रधान राजीव गांधींनीं

केंद्रातील अन् राज्यातील मुख्य सचिव पदासारख्या उच्च सरकारी अधिकाऱ्यांनाही इथे प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवले. सरकारने घेतलेला एक स्वागतार्ह निर्णय असे या घटनेचे प्रसारमाध्यमांनी स्वागत केले. जेआरडींचे द्रष्टेपण यातून दिसून येते. अलीकडे सर्वच उद्योग, आस्थापनांना अशा 'रिफ्रेशर कोर्सचे' महत्त्व कळलेले आहे. कोणत्याही काळात कितीही प्रवीण, तज्ज्ञ असला, तरी कालानुसार जुने विचार बदलतात, नवे वारे येतात. त्यांचे स्वागत करण्याची प्रयोगशील वृत्ती अशा कोर्सेसमधून साध्य होते. त्यामुळे ठराविक कालाने पुन्हा प्रशिक्षण देणे हा विचार सर्वमान्य झाला आहे. काळाच्या पुढे चार पावले राहाणारे जेआरडींचे विचार हे टाटा समूहाच्या सर्व दिशेने झालेल्या भरभराटीचे महत्त्वाचे कारण आहे. त्यांच्या वयाच्या एकसष्टाव्या वर्षी कोलकत्याच्या एका शिक्षणतज्ज्ञाने त्यांना आपल्या यशाचे मर्म विचारले तेव्हा ते म्हणाले, की काही बाबी मी अत्यंत महत्त्वाच्या आणि सार्वकालीन आहेत असे मानतो. पहिली म्हणजे सखोल विचार अन् कठोर परिश्रमाशिवाय कोणतेही यश संभवत नाही. कोणत्याही चमकदार कल्पना वा घोषणा यांच्या आहारी न जाता स्वत: विचार करून पारखून घेणे महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने आज वरवरच्या मुलाम्याला सहजपणे भुलून चुकीचे निर्णय घेण्याची प्रवृत्ती वाढत चाललेली आहे. सतत सुधारणा करणे आणि तपशिलाबाबत काटेकोर रहाणे अंतिम हिताचे असते. माणसाने परिपूर्णतेचा हव्यास ही आपली सहजवृत्ती होणे महत्त्वाचे मानायला हवे. कोणत्याही बाबतीत दुय्यम स्तरावर समाधान मानू नये. देशातील जनतेच्या भल्याचा, गरजांचा विचार न करता मिळवलेले कोणतेही यश समाधान देणार नाही. तसेच आपली नीतिमूल्ये गुंडाळून ठेवून मिळालेले यश फार काळ टिकणार नाही. लोकांशी उत्तम नातेसंबंध ठेवणे महत्त्वाचे आहे. यामुळे फक्त वैयक्तिकच नव्हे तर उद्योगसमूहाचीही भरभराट होते. चल, अचल संपत्तीपेक्षा कोणत्याही उद्योगसमूहाचे खरे वैभव माणसे आहेत. तीच संपत्ती निर्माण करतात आणि तिचा योग्य विनियोगही करतात. वयाच्या अवघ्या चौतिसाव्या वर्षी इतक्या मोठ्या उद्योगसमूहाचे चेअरमनपद त्यांना देण्यामध्ये आणखी एक नवी कल्पना प्रत्यक्षात आली. त्याकाळात अनुभव हा सर्वांत मोठा गुण मानला जात असे. अनेक वर्षांच्या सहभागामुळे कामकाज कसे चालते, याची समज येते असा पक्का ग्रह झाला होता. त्यामुळे संचालक

५ वी आवृत्ती

# नोबेल ललना

## भाग १
## ( सन १९०१ - २००० )




**मीरा सिरसमकर**

**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

आपल्या अंतर्मनात लागलेल्या
प्रकाशाच्या शोधाने उजळणाऱ्या
या सर्व स्वप्रकाशरूपा.
प्रत्येकीचे कार्यक्षेत्र वेगळे.
प्रत्येकीचे कर्तृत्व वेगळे;
परंतु कर्म हीच तृप्ती
हा समाधानाचा मंत्र जपल्यामुळे
आंतरिक शांती, आत्मविश्वास आणि आनंद
त्यांतील प्रत्येकीलाच लाभलेला.
जगातील सर्वोच्च समजला जाणारा
नोबेल पुरस्कार त्यांना मिळाला खरा;
पण त्यांनी पाहिलेल्या स्वप्नांकडे आणि
ध्येयाकडे वाटचाल करणारा
त्यांचा प्रवास कोणत्याही पुरस्काराच्या
क्षितिजापार होता.

मंडळातील ज्येष्ठतम व्यक्ती चेअरमनपदी निवडली जात असे. जेआरडींच्या नेमणुकीमुळे सर्वच उद्योगसमूहांत पाळला जाणारा हा पायंडा मोडण्यात आला. तरुण वयातील धाडस, प्रयोगशीलता आणि जेआरडींच्या सर्वांना घेऊन, चर्चा करत पुढे जाण्याच्या गुणामुळे नव्या-जुन्याचा योग्य समतोल साधला गेला आणि पुढील कित्येक वर्षे टाटा देशातील सर्वांत अग्रगण्य उद्योगसमूह ठरला. जेआरडींची कार्यपद्धती सर्व संचालकांना पसंत पडली आणि अनेक नव्या क्षेत्रांत या समूहाने आपापल्या आस्थापना सुरू केल्या. देशाला भविष्यात कोणकोणत्या वस्तूंची गरज लागेल, कोणत्या क्षेत्रात इथे माल बनवून देशाला स्वयंसिद्ध करता येईल, त्याचबरोबर भरपूर नफा मिळवून भागधारकांना त्यांच्या पैशाचे मोल मिळू शकेल, अशा अनेक पैलूंवर विचार करत, चर्चा-पाहण्या करत हे नवे उद्योग उभारले गेले. स्वतंत्र झाल्यावर समाजवादी लोकशाही अशी संमिश्र अर्थव्यवस्था देशाने स्वीकारली आणि उद्योगधंदा सचोटीने करून, भरपूर नफा कमावणे हा जणू गुन्हा असावा, गोरगरिबांची पिळवणूक करूनच पैसा मिळवता येतो, अशा वेडगळ कल्पना उराशी धरून औद्योगिक धोरणे आखण्यात आली. परवाने, निर्बंध, कामगार कायदे आदी अनेक अडथळे उभे करून नोकरशाहीच्या हातात अंकुश दिला. मोठे उद्योग सरकारने आपल्या अखत्यारीत घेतले आणि सरकारी खाक्याने चालवायचा प्रयत्न केला. अमेरिकेचे उदार आर्थिक धोरण आणि कम्युनिस्ट देशाचे सर्वत्र सरकारीकरण यांतील मध्यममार्ग स्वीकारायचे ठरवले. ही कल्पना आकर्षक, आदर्शवादी नक्कीच होती; पण व्यवहारात ती यशस्वी होणार नाही हे जेआरडींनी जाणले होते. पंडित नेहरूंपासूनच्या काळात 'फायदा मिळवणे हे पाप नव्हे' या विचाराचा जेआरडींनी जाहीरपणे पाठपुरावा केला. वेळोवेळी सरकारला प्रशासन, व्यवस्थापन चांगले हवे, नाहीतर उद्योग तोट्यात जातील, त्यापेक्षा ते खाजगी संचालकांमार्फत चालवा असे इशारेही दिले; पण लोकानुनय करण्याच्या फंदात पडलेल्या राजकीय नेतृत्वाने त्याकडे दुर्लक्ष केले आणि पुढे अर्थात भरपूर किंमत चुकती केल्यावर हे धोरण राजीव गांधींच्या कारकिर्दीत बदलण्यास सुरुवात झाली तेव्हा गमतीने जेआरडी उद्गारले, ''आता तुम्ही मुक्तपणे व्यवहार करायला परवानगी दिली; पण माझे वय झाले आहे.''

जेआरडींच्या काळात मात्र सरकारी कायदे, निर्बंध, नियम बरेच जाचक होते. त्यातून वाट काढतच उद्योग उभे करून ते फायद्यात ठेवायचे कठीण

काम जेआरडींना पार पाडावे लागले. उद्योगाची धुरा खांद्यावर घेतल्यावर रेल्वेखात्याचा प्रचंड विस्तार होणार हे ओळखून १९४५ साली रेल्वेइंजिन, बॉयलर आणि त्याला लागणारे सुटे भाग, ते निर्माण करणारी यंत्रे असा एक सर्वंकष इंजिनियरिंग उद्योग टाटातर्फे प्रथम जमशेदपूरला उभारला गेला. टेल्कोची सुरुवात अशी देशाची गरज ओळखून झाली. पुढे त्यात रोडरोलर पासून शेतीचे ट्रॅक्टर, बुलडोझर, डिझेल इंजिन अशी अनेक अवजड वाहने बनवता येतील आणि स्वातंत्र्यानंतर ही सामग्री आयात करण्याऐवजी देशातच उपलब्ध होईल हा विचार त्यामागे होता. त्यावेळी टाटांसह इतर चार सिमेंट उत्पादन करणाऱ्या कंपन्यांची मिळून एक असोसिएट सिमेंट कंपनी (एसीसी) कार्यरत होती आणि तिचा कारभार श्री. सुमंत मुळगावकर सांभाळत होते. त्यांना बोलावून घेऊन जेआरडींनी या नव्या उद्योगाची धुरा त्यांच्यावर सोपवली. बॉयलर, रेल्वेइंजिन, वाघिणी बनवणाऱ्या या उद्योगाचा पुढे अनेक अंगाने विस्तार झाला. फाळणीच्या काळात हिंदू-मुस्लिम दंगलीमुळे या कारखान्यातील बहुसंख्य कामगार पठाण होते; ते आपापल्या गावी एका दिवसात परतले. नवी माणसे भरती करून त्यांना शिकवण्यात सहा महिने गेले; पण मुळगावकरांसारखा खंदा सेनापती लाभल्यामुळे लवकरच कारखान्याची गाडी रुळावर आली. १९५४ मध्ये डेमलर बेंझ या जर्मन कंपनीच्या सहकार्याने टाटा-बेंझ ट्रकची निर्मिती सुरू झाली. सरकारी परवाने मिळण्यासाठी तेव्हा अनेक कटकटींना सामोरे जावे लागे आणि कालहरण होई; पण सुदैवाने त्यावेळी श्री. टी.टी. कृष्णम्माचारी हे तडफदार गृहस्थ मंत्रिपदी होते. म्हणून भराभरा चक्रे हलली आणि टाटांच्या ट्रक्स भारतीय रस्त्यांवरून भरधाव दौडू लागल्या.

पुढे संशोधन विभाग सुरू झाला आणि टेल्को जमशेदपूरहून पुण्याला हलवण्यात आली. हा निर्णय फार दूरगामी परिणाम करणारा ठरला. भविष्याचा विचार करून टेल्कोची बांधणी करण्यात आली तेव्हा या योजना फार खर्चिक अन उद्दिष्टांपासून दूर आहेत असे इतर संचालकांना वाटत होते; मात्र जेआरडींनी मुळगावकरांना पूर्ण पाठिंबा दिला. आज टेल्कोसंकुल ही देशातील अव्वल दर्जाची इंजिनियरिंग कंपनी आहे व त्याचे श्रेय या दूरदृष्टीला आणि जेआरडी - मुळगावकरांनी घातलेल्या मजबूत पायाला आहे. १९६०पासून चारचाकी प्रवासी गाड्या तयार करायचे प्रयत्न सुरू झाले. छोट्या ट्रक, अवजड डिझेलवर चालणाऱ्या टाटा मोबाईलसारख्या गाड्या, अशी नवनवी उत्पादने देशांतर्गत अन् आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत धडाक्याने खपू लागली. १९८८पर्यंत म्हणजे जेआरडी

उद्योगसमूहाचे चेअरमन असेपर्यंत श्री. मुळगावकर या कंपनीचे प्रमुख राहिले आणि वयाची ऐंशी वर्षे ओलांडल्यावर त्यांनी हे पद सोडले.

१९४८ साली एअर इंडियाची आंतरराष्ट्रीय सेवा सुरू झाली आणि त्यानंतरचा मोठा प्रकल्प 'टाटा केमिकल्स' हा हाती घेण्यात जेआरडींची हीच दूरदृष्टी दिसून आली. देशात जेव्हा नवेनवे उद्योग उभे राहतील, तेव्हा शक्यतो आयात करावी लागू नये, सर्व प्रकारच्या उद्योगाला लागणारी यंत्रे, रसायने, कच्चा माल इथेच तयार व्हावा, म्हणजे रोजगार वाढेल, संपत्ती वाढेल अन् देश संपन्न होण्यासाठी ते महत्त्वाचे पाऊल ठरेल या विचाराने गुजरातेतील ओखामंडल या सौराष्ट्र म्हटल्या जाणाऱ्या भागात टाटा केमिकल्स उभे राहिले. पुढे त्यापासून जवळ मिठापूर हे समुद्र किनाऱ्याजवळील गाव निवडून तिथे रसायन निर्मितीचे प्रचंड मोठे संकुल उभे राहिले. इथे पाण्याचा तुटवडा होता. म्हणून 'या जागी रसायननिर्मिती शक्य नाही' असा तज्ज्ञांनी अहवाल दिला. कित्येक वर्षे हा प्रकल्प तोट्यात होता. पुढे श्री. दरबारी सेठ या तरुण, तडफदार इंजिनियरने हे आव्हान स्वीकारले आणि अशक्य ते जिद्द, परिश्रम यांच्या बळावर शक्य करून दाखवले.

इतर छोटे-मोठे पूरक उद्योग सतत उभे राहत होते. १९६०मध्ये टाटा एक्सपोर्ट्स हा विभाग सुरू होऊन टाटांची अनेक उत्पादने परदेशी निर्यात होऊ लागली. उत्पादनाची गुणवत्ता जागतिक पातळीवर राखण्यात टाटांनी पहिल्यापासून दक्षता घेतली होती. त्यामुळे याही विभागाचा झपाट्याने विकास होत गेला. आधी सुरू असलेल्या अनेक उद्योगांचे विकसनही वेगाने चालू होते. हे सर्व करताना कायद्याची मर्यादा ओलांडायची नाही, लाच देऊन, अधिकारी विकत घेऊन परवाने मिळवायचे नाहीत, श्री. जमशेदजी टाटा यांनी घालून दिलेली औद्योगिक नीतीची चौकट सोडायची नाही इत्यादी अनेक निर्बंध पाळत टाटा उद्योगाचा विस्तार धीम्या गतीने होत होता. आता काळ बदलत चालला होता. फायद्याची रेषा वरवर चढवत नेणे हा एकमेव हेतू डोळ्यांपुढे ठेवून अनेक उद्योगसमूह कायदे वाकवून, लाच देऊन, नोकरशाही विकत घेऊन आपापला विस्तार करत होते. भ्रष्टाचार वाढत होता आणि सरकारीकरणाचे तोटे सार्वजनिक उद्योगांना हळूहळू गिळंकृत करत होते. सतत होणाऱ्या निवडणुका, त्यासाठी लागणारा अमाप पैसा, लोकानुनयासाठी केलेल्या सवंग घोषणा यामुळे राजकारणही दूषित होत चालले होते. जेआरडींनी घट्ट धरून ठेवलेली मूल्यांची चौकट खिळखिळी

होताना दिसत होती; पण आपले मार्ग बदलणे त्यांना मंजूर नव्हते. तरीही कमीतकमी संघर्ष होत उद्योगसमूहात संगणकक्षेत्र, बांधकाम, चहा उद्योग असे नवे वा विस्तारीकरण होऊन आस्थापनांची संख्या वाढती राहिली. १९८५मध्ये राजीव गांधी यांनी परवाना राज उठवून आर्थिक उदारीकरणाचे धोरण आखले आणि उद्योग जगतात नवे वारे वाहू लागले. आपल्या कुटुंबापैकी एक असलेले जेआरडींचे सहकारी श्री. नवल टाटा यांनी त्यांना सर्वकाळ मोलाची साथ दिली होती. त्यांचे पुत्र श्री. रतन टाटा उद्योगसमूहाचे महत्त्वाचे निर्णय घेऊ लागले होते. जेआरडींनंतर ते उद्योगसमूहाचे प्रमुख होणार अशी लक्षणे दिसत होती. उदारीकरण आले आणि १९८५ ते १९८९ या अल्पकालात टाटा समूहातर्फे चौदा नवे प्रकल्प उभे राहिले. नव्या पिढीला नव्या दमाने, नव्या विचाराने काम करता यावे म्हणून जेआरडींनी श्री. रतन टाटांना त्या जागी नियुक्त केले आणि त्यांच्या कोणत्याही कामात, निर्णयात आडकाठी न आणता आपण निवृत्ती पत्करली. जेआरडींनी आपल्या हाती सूत्रे घेतली, तेव्हा एकूण टाटा समूहात चौदा कंपन्या होत्या आणि एकूण व्यवहार सतरा कोटी रुपयांच्या आसपास होता. १९९० साली त्यांनी चेअरमनपद सोडले तेव्हा एकूण कंपन्यांची संख्या ९५ होती आणि व्यवहाराने दहा हजार कोटींचा आकडा ओलांडला होता. रुपयांच्या कमी झालेल्या किमती जमेत धरूनही, कडक परवाना, कायदे, नीतिमत्ता सांभाळत यशापयशाची चव चाखत केलेली ही वाटचाल भारतीय उद्योगविश्वात 'एकमेव' अशी आहे. त्यांच्या या सेवेचे मोल देशाने त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन केले. हा सन्मान मिळवणारे ते पहिले आणि एकमेव उद्योगपती आहेत. देशभरात त्यांना हा सन्मान मिळाल्यावर त्या सन्मानाचाच मान राखला, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. त्यातच या उद्योगाच्या महामेरूचे मोल जाणले गेले असे म्हणता येते.

**– माधुरी शानभाग**

('जेआरडी : एक चतुरस्र माणूस' या पुस्तकातून)

❖

# अब्दुल कलाम

*मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम म्हणजे विज्ञान आणि अध्यात्म यांचा अलौकिक समन्वय. 'त्रिशूल', 'पृथ्वी', 'अग्नी', 'नाग' आणि 'आकाश' या पाच क्षेपणास्त्रांची निर्मिती अब्दुल कलामांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोखरण येथील दुसऱ्या अणुबॉम्ब चाचणीचे नियोजनही कलामांनीच केले होते. कलामांच्या कार्यकर्तृत्वाचं आणि प्रतिभेचं हे एक अपूर्व दर्शन...*

'हाती घ्याल ते तडीस न्या...' या निष्ठेने अब्दुल कलाम कोणत्याही कामाला हात घालत. आपल्याला संरक्षण विषयक संशोधन आणि विकसन प्रयोगशाळेत (DRDL)मध्ये काम करायचे आहे याची कल्पना येताच त्यांनी एप्रिल १९८२मध्ये, प्रत्यक्ष कामावर रुजू होण्यापूर्वी हैदराबाद येथे कार्यरत असलेल्या त्या संस्थेला भेट देऊन तेथील वरिष्ठ संशोधक आणि संपूर्ण परिसर यांचा परिचय करून घेतला. त्या वेळी तेथे पाच मोठ्या आणि सोळा मध्यम प्रकल्पांवर काम चालू होते. त्याशिवाय भविष्यात संपूर्ण स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्यासाठी लागणारी वैज्ञानिक उपकरणेही विकसित करण्यावर लक्ष केन्द्रित केले जात होते.

क्षेपणास्त्राचे उत्पादन अब्दुल कलामना नवीन नव्हते. या आधी गुंडाळून ठेवल्या गेलेल्या 'डेव्हिल'च्या प्राथमिक जुळणीत तज्ज्ञ म्हणून त्यांनी आपले योगदान दिलेलेच होते. कळीचे फुलात रूपांतर होण्यापूर्वीच ती खुडली गेली तर ते दुःख मोठे असते. बालक जन्माला येण्यापूर्वीच मृत आढळले तर मातेला होणाऱ्या वेदना असह्य असतात. केवळ हितसंबंधी राजकारणाच्या सोयीसाठी संशोधकांच्या परिश्रमांवर पाणी फिरवण्यात आले तर होणाऱ्या जखमांच्या कळा, व्रण सहजासहजी निपटता येत नाहीत. खुद्द डॉ.

कलामनीही ती दारुण मन:स्थिती अनुभवलेली होती. तो अनुभव पाठीशी घेऊन पहिल्या काही महिन्यांत डॉ. कलामनी आपल्या सहकाऱ्यांचे मनोबल वाढवण्याचा प्रामाणिक प्रयास केला. त्यांना कार्यप्रवृत्त केले, 'सांगेन गोष्टी युक्तीच्या चार ...' म्हणून धीर दिला. आपली उद्दिष्टे, आपण स्वत: व आपले काम यांचा अन्योन्य संबंध समजावून सांगितला. अशाच एका बैठकीत त्यांनी रोनाल्ड फिशर यांनी व्यक्त केलेल्या विधानाचा पुनरुच्चार केला. वाचकांनाही तो मार्गदर्शक ठरावा — फिशर म्हणतात, ''आपण साखर जेव्हा जिभेवर ठेवतो तेव्हा ती 'गोड' आहे असे म्हणतो. गोडपणा हा साखरेचा किंवा जिभेचा गुणधर्म नाही. साखर व जीभ या दोहोंमध्ये होणाऱ्या संकराचा तो परिणाम आहे!' अगदी सोप्या शब्दांत किती गाढआशय भरला आहे पहा.

इस्त्रोमध्ये काम करताना मधमाशीच्या वृत्तीने गोळा केलेले ज्ञान, कान टवकारून अंत:करणाच्या तळापर्यंत पोचवलेले आपल्या स्फूर्तिदात्या बुजुर्गांचे बोल, त्यांची शिकवण अब्दुल कलामांच्या कामी उत्तम आली. डी. आर. डी. एल.ने नवे बाळसे धरले, तिच्या नसानसांतून नवे रक्त वाहू लागले. तेथील वातावरण पार बदलून गेले. संशोधनकार्याला दिशा मिळून वेग आला. वर्षानुवर्षांची मरगळ झटकून टाकत लहान-मोठे, वरिष्ठ-कनिष्ठ संशोधक नव्या जोमाने पुढे सरसावले. स्व. डॉ. साराभाई, प्रा. धवन, प्रा. ब्रह्म प्रकाश यांच्या पुण्याईवर आपल्या आयुष्याच्या वाटचालीला आकार दिलेल्या अब्दुल कलामांनी केलेली किमया फळास येण्याची लक्षणे दिसू लागली. आपल्या स्वभावातील पारदर्शकतेला त्यांनी प्राधान्य दिले. सगळ्या ज्येष्ठ संशोधकांना जवळ करून त्यांची एक समिती नेमली - मिसाईल टेक्नॉलॉजी कमिटी! प्रशासन, व्यवस्थापन, निर्माण या सर्व पातळ्यांवर काम करणाऱ्या संशोधकांना व अभियंत्यांना सहभागी करून घेतले. सांगोपांग विचारविनिमय, प्रदीर्घ चर्चा, खुल्लमखुल्ला वादविवाद यांची दिलखुलास उधळण व घुसळण करून एक लांब पल्ल्याचा 'गाईडेड मिसाइल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' (लक्ष्यवेधी क्षेपणास्त्र विकसन कार्यक्रम) निश्चित केला. भारत सरकारकडून त्यास मंजुरी घेण्यासाठी एक विस्तृत अहवाल तयार केला. तो संरक्षण दलांच्या तिन्ही प्रमुखांकडे त्यांचे अभिप्राय व सल्ला घेण्यासाठी पाठवला. त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा केल्या. इतक्या सोपस्कारानंतर त्याचा मसुदा पक्का झाला. त्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावरचा संभाव्य खर्च ३९० कोटींच्या आसपास आणि त्याच्या पूर्ततेसाठीचा कालावधी बारा वर्षांचा असेल, अशी अपेक्षा ठेवण्यात आली. त्या विभागाचा संचालक या

नात्याने अब्दुल कलामनी प्रथम हे क्लिष्ट व किचकट काम कागदोपत्री पूर्ण केले. याला म्हणतात सिद्धता! भविष्याचा अचूक वेध! सामूहिक जबाबदारी व आत्मविश्वास यांचा प्रत्यय!

डॉ. कलाम व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेला तो प्रकल्प-अहवाल भारताचे त्या वेळचे संरक्षणमंत्री आर. व्यंकटरमण यांना सहर्ष सादर केला. त्यांच्या समवेत डी. आर. डी. ओ.चे प्रमुख डॉ. अरुणाचलमही होते. शिवाय, सरकारच्या बाजूने तिन्ही सेनादल - प्रमुख, केन्द्रीय मंत्रिमंडळ, संरक्षण - अर्थ खाते यांचे सचिवही हजर होते. प्रश्न मंजुरीचा असल्यामुळे त्यातील प्रत्येकाने प्रकल्पाचा तपशील बारकाईने समजावून घेतला. आपापल्या शंकांचे निरसन करून घेतले. अर्थात, त्यांची सर्व उत्तरे डॉ. कलाम यांनीच दिली. ती योजना नि:संशय महत्त्वाकांक्षी आणि अस्सल स्वदेशी होती. त्यामुळे तसा तपशीलवार ऊहापोह झाला नसता तरच नवल. शिवाय, आणखीही एक महत्त्वाचा प्रश्न होता. खर्चाची तरतूद करण्याचा; पण म्हणतात ना 'ज्याचा शेवट सुखद असतो ते सगळे उत्तमच असते...' तसे झाले.

डॉ. कलामनी मागितला होता एक डोळा, त्यांना मिळाले सहस्त्र डोळे. संरक्षणमंत्र्यांनी त्यांना संध्याकाळी पुन्हा एकदा बोलावून घेतले आणि त्यांच्यावर बॉम्बच टाकला. ते म्हणाले 'मि. कलाम, आम्हाला तुमची टप्प्याटप्प्यांनी, पायरीपायरीवर पुढे जाणारी योजना नको आहे. आम्हाला हवी आहे एक सर्वंकष, सर्वांगानी परिपूर्ण असलेली ठोस योजना! कराल का तशी सादर?' ... संरक्षणमंत्र्यांचा तो प्रस्ताव कानावर पडताच डॉ. अरुणाचलम आणि अब्दुल कलाम अक्षरश: जाग्यावरून उडालेच! त्यांच्या स्वप्नपक्ष्याने थेट आकाश गाठले. त्यांच्या वैज्ञानिक प्रज्ञेने त्या आव्हानाचा स्वीकार करायचे ठरवले. रात्र जागवत त्यांनी त्या दृष्टीने आपल्या कामाचा आराखडा बदलून टाकला, त्यात सुधारणा केल्या आणि काय आश्चर्य! कसलेही आढेवेढे, कोणतेही आक्षेप न घेता मंत्रिमहोदयांनी ती योजना मंजूर केली. डॉ. अब्दुल कलामांच्या कर्तृत्वाला नवी संधी प्राप्त झाली. मंत्रिमहोदयांचा निरोप घेताना त्यांचे मन मोहरून गेले. त्याला बहर आणला संरक्षण मंत्र्यांच्या उद्‌गारांनी - 'डॉ. कलाम, तुम्हाला आमच्याकडे बोलावून घेण्यामागचा उद्देशच हा होता. तुमच्याकडून आम्हाला काहीतरी ठाशीव, भक्कम, भरवसा निर्धोक ठेवावा असेच काहीतरी मिळावे अशी आमची इच्छा

होती. आज तुम्ही तिची पूर्ती अवश्य केलीत. मी खूप समाधानात आहे. चीअर्स! बेस्ट ऑफ लक! थँक्स! या...' डॉ. कलाम पार गहिवरून गेले. अतिशय तृप्त मनाने तेथून बाहेर पडले.

पुढे, संरक्षणमंत्र्यांनी त्या सुधारित योजनेला मंत्रिमंडळाची रीतसर मंजुरी घेतली. विशेष म्हणजे तिच्यासाठी आर्थिक तरतूद करताना सरकारने आपला हात बिलकुल आखडता घेतला नाही. पुरे ३८८ कोटी रुपये खर्ची टाकण्याचा निर्णय झाला. आता ती योजना 'इंटिग्रेटेड गाइडेड मिसाइल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम तथा संक्षिप्तात IGMDP म्हणजे 'एकात्मिक लक्ष्यवेधी क्षेपणास्त्र विकसन योजना' या नावाने कार्यान्वित झाली.

अशा प्रकारे, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कीर्तिपर्वाचे आणखी एक सोनेरी पान लिहिले गेले. एकामागून एक अशा अनेकांची त्यात भर पडत गेली. यशाचा आलेख चढतच गेला. त्या कर्तृत्वाचा वेल गगनावरी कधी गेला कळलेच नाही. त्या विविधांगी क्षेपणास्त्र विकसन योजनांचे लालनपालन करून त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्यापूर्वी त्या प्रत्येकाचे विधिवत बारसे करून त्यांचे नामकरण करणे भारतीय परंपरांना धरून होते. त्याप्रमाणे त्या क्षेपणास्त्र-बालकांसाठी निवडण्यात आलेली नावेही समर्थक व अर्थपूर्ण होती. प्रत्येक नाव पूर्ण विचारांती निश्चित करण्यात आले.

पहिले होते 'पृथ्वी'! दुसरे, 'त्रिशूल'! तिसरे 'आकाश'! चौथे 'नाग'! शेवटचे पाचवे 'अग्नी'!

जमिनीवरून जमिनीवरच्या लक्ष्याचा वेध घेणार होते 'पृथ्वी'! लष्करी डावपेचांचा गाभा म्हणता येईल असे क्षेपणास्त्र म्हणजे 'त्रिशूल'! अवकाशातून जमिनीवरची लक्ष्ये टिपणार होते 'आकाश'! शत्रूचे रणगाडे उद्ध्वस्त करणार होते 'नाग'! डॉ. कलामांचे लाडके अपत्य होते बॉम्बसदृश 'अग्नी'! या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे रीतसर उद्‌घाटन २७ जुलै १९८३ रोजी प्रमुख संचालक डॉ. अरुणाचलम यांनी केले. भारतीय अवकाश संशोधनकार्याशी निगडित असलेल्या देशातील अनेकजणांच्या साक्षीने ते पार पडले. एका नव्या ऐतिहासिक महान पर्वाचा शुभारंभ झाला.

हातात घेतलेले काम अतिशय प्रचंड होते. अगदी शून्यातून सुरुवात करायची होती. नियोजित पाच प्रकल्पांसाठी प्रमुख व पात्र अधिकारी डोळ्यात तेल घालून निवडावे लागणार होते. त्यांची पारख करणे एक दिव्यच होते. त्यांची जडणघडण करण्याची जबाबदारी पार पाडण्याची गरज होती. इतर बारीकसारीक गोष्टींकडे

काळजीपूर्वक लक्ष द्यावे लागणार होते. माणसांबरोबरच इमारती, यंत्रसामुग्री या गोष्टी आल्याच. डॉ. कलामांच्या चतुरस्र, दीर्घोद्योगी, कल्पक बुद्धिमत्तेने ती सर्व आव्हाने लीलया स्वीकारून एकेक उद्दिष्ट पार करत आणले.

१९८५मध्ये, इमारत कांचात क्षेपणास्त्र तंत्रज्ञान संशोधन केन्द्र उभे राहिले. लगेच ऑगस्ट महिन्यात रिसर्च सेन्टर इमारतीची कोनशिला बसली. जवळपास ३०० तरुण अभियंत्यांना डॉ. कलामनी कामाला जुंपले. त्यांचा बहुतांश भर तरुणाईला उत्तेजन देण्यावर होता. जाणकार व नवशिके यांची उत्तम सांगड त्यांनी घातली. डी. आर. डी. एल.मध्ये जवळ जवळ ७०० संशोधक काम करत होते. ती संस्था एक शासकीय संस्था असल्यामुळे तिला सरकारी कायदेकानू, सेवाशर्ती, नियम यांचे पालन करणे अपरिहार्य ठरत होते. एक प्रमुख या नात्याने डॉ. कलाम यांच्यावर त्या प्रकारची कार्यालयीन जबाबदारीही होती. त्या जबाबदारीलाही त्यांनी योग्य न्याय दिला. संस्थाप्रमुखाचे कर्तव्य नि:पक्षपातीपणाने पार पाडले. हाताखालच्या लोकांना सन्मानाने वागवले. त्यांच्या गरजांची जपणूक तत्परतेने केली. त्यांच्या कार्यक्षमतेला पुरेपूर चालना दिली. त्यांची जागरूकता आपल्याकडून भंग होऊ दिली नाही. काम समाधानकारक होत आहे दिसताच त्यांना शाबासकी देऊन त्यांचे योग्य कौतुकही केले. सारांश, डॉ. ए. पी. जे. कलाम केवळ एक कर्तव्यनिष्ठ शास्त्रज्ञच नाहीत तर एक समंजस व्यवस्थापकही आहेत याची जाणीव त्यांनी सर्वांना करून दिली.

अशा प्रकारे, जाणीवपूर्वक जोपासलेल्या डी. आर. डी. ओ.ने अल्पावधीतच देशाची संरक्षण व्यवस्था बलशाली करण्याच्या प्रयत्नांतील आपले अभूतपूर्व योगदान देऊन संपूर्ण जगाची वाहवा मिळवली. त्याची मूळ शक्ती व प्रेरणास्रोत डॉ. ए. पी. जे अब्दुल कलामच होते. म्हणूनच आपण त्यांना ‘योद्धा शास्त्रज्ञ’ ही बिरुदावली लावत आहोत.

भारताला संरक्षणदृष्ट्या समर्थ बनवण्यात हातभार लावणाऱ्या त्या पाच अत्याधुनिक क्षेपणास्त्रांचे निर्माण हा एक साहसी प्रकल्प होता. १९८२ ते १९९२ या अवघ्या दहा वर्षांच्या आत तो पूर्ण व्हावा यासारखी अद्भुत गोष्टच नाही. त्या क्षेपणास्त्रांच्या बनावटीच्या शास्त्रीय, तांत्रिक तपशिलात न शिरता आपण केवळ त्याच्या अवतरणांची नोंद घेण्यात समाधान मानू या.

१८ सप्टेंबर १९८५ला ‘त्रिशूल’, २५ फेब्रुवारी १९८ला ‘पृथ्वी’,

२२ मे १९८९ला 'अग्नी', १० फेब्रुवारी १९९०ला 'नाग' आणि १५ ऑगस्ट १९९०ला 'आकाश'! त्या पंचास्त्रांचा एकापाठोपाठ एक असा अवतार झाला. समस्त भारतीयांचा आनंद गगनाच्या सीमा ओलांडून गेला. भारताच्या या अलौकिक संशोधनात्मक कार्यपूर्तीकडे पाहताना अवघे जग थक्क झाले. एका क्षणात भारत 'बहुविकसित राष्ट्रां'च्या मांडीला मांडी लावून बसण्यास पात्र ठरला. 'सामर्थ्य सामर्थ्याचा आदर करते...' या सूत्राचा धागा पकडून भारताने युद्धशास्त्रात पारंगत व्हावे असे डॉ. कलाम सतत सांगतात. त्या बाबतीत अल्पसंतुष्ट राहून चालणार नाही, असा त्यांचा आग्रह आहे. ही सर्व क्षेपणास्त्रे जगातील त्यांच्या धर्तीच्या यंत्रणांना तोडीस तोड आहेत. विशेषत: 'अग्नी'ची शक्ती अपूर्व आहे. त्यामुळेच तर जागतिक महासत्तांना विकसनशील भारताचा हेवा वाटतो.

भारताने आपला पहिला अणुस्फोट घडवून आणला तेव्हा त्याला सहावा क्रमांक मिळाला. त्याने एस. एल. व्ही - ३ अंतराळात धाडला तेव्हा त्याला पाचवा क्रमांक मिळाला. याचा अर्थ भारताकडे ती क्षमता अवश्य आहे. डॉ. भाभा, डॉ. साराभाई, डॉ. धवन, डॉ. ब्रह्मप्रकाश, डॉ. राजा रामण्णा आदी एकापेक्षा एक राष्ट्रनिष्ठ वैज्ञानिकांनी भारताची ध्वजा फडकत ठेवलेली आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे त्याच मालिकेतील एक रत्न आहे.

११ मे १९९८ रोजी भारताने राजस्थानातील पोखरण येथे दुसरी अणुबॉम्ब-चाचणी घेतली. त्याचे नियोजन डॉ. कलाम यांनीच केले होते.

इस्रोच्या निमित्ताने थुंबा, डी. आर. डी. ओ.च्या निमित्ताने हैदराबाद आणि संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार या निमित्ताने राजधानी दिल्ली असा ३७ वर्षांचा व्यावसायिक प्रवास पूर्ण करून १९९५ला डॉ. अब्दुल कलाम शासकीय सेवेतून निवृत्त झाले. देशातील तीन बलाढ्य संशोधन केन्द्रांत त्यांनी समरसून संशोधन केले. सामर्थ्यवान संरक्षणव्यवस्था आणि साधन सामग्रीत स्वयंपूर्णता या दोन उदात्त ध्येयांचा आयुष्यभर पाठपुरावा केला. त्यांच्या पूर्तीसाठी जीव तोडून परिश्रम केले. त्या काळात पुढ्यात आलेल्या संधींचे सोने केले. मिळालेले यश, मानसन्मान, प्रसिद्धी, कीर्ती यांचा अलिप्त राहून स्वीकार केला. त्यांचा कैफ, धुंदी आपल्या मानसिकतेवर बिलकुल चढू दिली नाही. अंतरी सतत ईशचिंतन करून साक्षित्वाचा विवेक ढळू दिला नाही, लौकिकाची मात दूर ठेवली. आपले चिंतनशील मन व ज्ञान आपल्या विशिष्ट ध्येयास समर्पित करून ध्येयरूप होण्याचा एकच ध्यास घेतला. केवळ त्यामुळेच त्यांच्या हातून लोकोत्तर कार्य

होऊन त्याचा लाभ देशाला झाला. या झपाटलेल्या योद्धा-शास्त्रज्ञाचे संरक्षण क्षेत्रातील संशोधनविषयक योगदान अभूतपूर्व ठरले. भारताच्या सौभाग्याचा डिमडिम सर्वत्र गाजला. भारत बलसागर होऊन विश्वात शोभून राहण्याच्या दिशेने आगेकूच करू लागला.


**– माधव मोर्डेकर**

('योद्धा शास्त्रज्ञ राष्ट्रपती
ए. पी. जे. अब्दुल कलाम' या पुस्तकातून)

❖

**२ री आवृत्ती**

# पपेट ऑन ए चेन




**मूळ लेखक** – ॲलिस्टर मॅक्लीन

**अनुवाद** – माधव कर्वे

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

पॉलवर हॉलंडमध्ये जाऊन ॲमस्टरडॅममधल्या संशयास्पद अमली द्रव्यांच्या व्यवहाराचा शोध घेण्याची कामगिरी सोपवली जाते. पॉल ॲमस्टरडॅममध्ये उतरताक्षणीच त्याच्या एका सहकाऱ्याची हत्या होते आणि त्यानंतर सुरू होते संकटांची मालिका... वाक्यावाक्याला खिळवून ठेवणारी पॉलच्या आक्रमक कामगिरीची ही थरारकथा काळजाचा ठोकाच चुकवते. हीच तर मॅक्लीनच्या लेखणीची खासीयत!

**४ थी आवृत्ती**

# नॉट गॉन विथ द विंड

## विश्वास पाटील




**किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

वाऱ्यासोबत न वाहून गेलेली आणि
वाऱ्यावर स्वार झालेली जगातील अव्वल
चित्रशिल्पे आणि शब्दशिल्पे!
हॉलीवूड-बॉलीवूडच्या अंतर्बाह्य दृष्टीक्षेपासह
इटालियन, फ्रेंच, ब्रिटिश अशा अनेक
अभिनव चाकोऱ्यांचा, विश्वास पाटील यांनी
घेतलेला अभ्यासपूर्ण ललित धांडोळा.
शेक्सपिअर, टॉलस्टॉय, जॉन फोर्ड, दोस्तायव्हस्की,
गार्बो, सोफिया लॉरेन, थॉमस हार्डी, शरत्‌चंद्र,
डेव्हिड लीन, मार्लन ब्रँडो, स्टॅन्ले क्युब्रिक,
रोमन पोलन्स्की, चार्ली चॅप्लीन, स्टीव्हन स्पीलबर्ग,
मेहबूब खान, कोपोला, मधुबाला, के. असिफ,
इनग्रिड बर्गमन, व्ही. शांताराम असे अवघ्या विश्वाचे
अनेक सगेसोयरे या शब्दांगणात तुमच्याशी
हृद्‌गत करतील!

# श्रावणात घननिळा बरसला...

पावसाचं आगमन झालेलं, श्रावणाची चाहूल लागलेली, निसर्ग हिरवाईने नटलेला... अशा प्रसन्न वातावरणात मंगेश पाडगावकरांची आठवण झाली नाही, असं कसं होईल! पाडगावकरांनी प्रसन्न अशा भावगीतांची लयलूट केली, ज्यामध्ये निसर्गातल्या प्रतिमा होत्या, त्या प्रतिमांमधून त्यांच्या विविध भावावस्था प्रकट होत होत्या, जिथे प्रतिमा नव्हत्या तिथे उत्कट शब्दांच्या गारुडातून भावपूर्णता सांडत होती. 'शब्द शब्द जपून ठेव...' हे या सदराचं नाव पाडगावकरांच्या भावगीतातून सुचलेलं आणि या सदरासाठी समर्पक वाटलेलं.

त्यांचं 'शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुलापरी...' हे भावगीत विश्वनाथ मोरे यांनी स्वरबद्ध केलेलं आणि सुमन कल्याणपूर यांनी गायलेलं. एका प्रेयसीची समर्पित भावना या गीतातून पाडगावकरांनी व्यक्त केली आहे. एकमेकांपासून दूर होण्याच्या अटळ वळणावर ही प्रेयसी प्रियकराला तिचा प्रत्येक शब्द बकुळीच्या फुलासारखा जपून ठेवायला सांगते आहे. बकुळीचं फूल हे चिरंतन सुवासाचं प्रतीक. आपल्या प्रीतीचा सुवास चिरंतन जपून ठेव, असंच ती त्याला सांगते आहे.

पाडगावकरांची भावगीतंही रसिकांनी बकुळीच्या फुलासारखी जपली आहेत. 'शब्द शब्द जपून ठेव...' हे पाडगावकरांचं आवाहन प्रत्येक भावगीतकारासाठी सार्थ ठरावं.

श्रावण महिन्यात वारंवार कानावर पडणारं भावगीत म्हणजे 'श्रावणात घननिळा बरसला...'. श्रावणातील निसर्गाचं उत्फुल्ल रूप आणि त्या निसर्गामुळे मनात दाटलेल्या प्रसन्न भावनांचं दर्शन पाडगावकरांनी या गीतातून घडवलंय. या गीताचं शब्दलावण्य रसिकांना वर्षानुवर्षं मोहवत

आलंय. हे गीत पाडगावकरांना मुंबईच्या लोकलमध्ये सुचलं असलं तरी त्या वेळी त्यांची भावावस्था एका निसर्गवेड्याची असणार. त्यांची ही भावावस्था श्रीनिवास खळ्यांच्या संगीतरचनेतून, अनिल मोहिले यांच्या संगीत संयोजनातून आणि लतादीदींच्या भावपूर्ण स्वरातून रसिकांच्या अंत:करणाला अधिक उत्कटतेने भिडते. पाडगावकर लिहितात-

पाचूच्या हिरव्या माहेरी ऊन हळदीचे आले
माझ्या भाळावर थेंबाचे फुलपाखरू झाले
मातीच्या गंधाने भरला गगनाचा गाभारा

तर निसर्गातील या अशा मनाला प्रफुल्लित करणाऱ्या प्रतिमांनी नटलेली पाडगावकरांची शब्दकळा मनाला टवटवी आणते.

निसर्गवेडेपण हा पाडगावकरांचा स्थायी भाव होता. त्यामुळे त्यांच्या कोणत्याही प्रकारच्या भावगीतात निसर्ग डोकावतोच. देवधर्माचं अवडंबर माजवणाऱ्या किंवा साधुत्वाच्या नावाखाली दांभिकपणा करणाऱ्या लोकांच्या डोळ्यांत अंजन घालणाऱ्या 'कुठे शोधिसी रामेश्वर अन् कुठे शोधिसी काशी...' या गीतातही देवाच्या अस्तित्वाची जाणीव देताना पाडगावकर लिहितात-

झाड फुलांनी आले बहरून
तू न पाहिले डोळे उघडून
वर्षाकाळी पाऊसधारा
तुला न दिसला त्यात इशारा
काय तुला उपयोग आंधळ्या
दीप असून उशाशी

निसर्ग आणि ऋतुचक्रातूनही परमेश्वराचं दर्शन घडतं, हे पाडगावकरांनी किती सहजतेनं सांगितलंय. खरं तर हे संपूर्ण गीत परमेश्वराच्या अस्तित्वाचं एक प्रसन्न आणि डोळस दर्शन आहे.

ईश्वराचं तारकत्व आणि त्याला असणारी भक्तीची आस याचं भावपूर्ण दर्शन पाडगावकरांनी घडवलंय 'भावभोळ्या भक्तीची ही एकतारी...' या गीतातून. ते लिहितात -

भावडी दासी जनी गाताच गाणी
दाटूनि आले तुझ्या डोळ्यांत पाणी

भक्तीचा वेडा असा तू चक्रधारी

तर एका भक्ताचा शरणागत भाव या गीतातून व्यक्त होतो.

आणि परमेश्वराचा मग असाही साक्षात्कार होतो, ज्यामुळे भक्त आणखी वरच्या पायरीवर गेलेला असतो. त्याच्या अंतरंगात त्याला परमेश्वराचं दर्शन व्हायला लागतं आणि दिव्यत्वाची प्रचिती त्याला येते. 'आज अंतर्यामी भेटे कान्हो वनमाळी...' या गीतात पाडगावकर या प्रचितीचं वर्णन करतात. ते लिहितात-

काही न बोलता आता सांगता ये सारे
आतली प्रकाशाची दारे उघडली हो...

नि:शब्दतेची अनुभूती पाडगावकरांच्या या गीतातून येते.

भक्ती सगुण असो की निर्गुण, त्यातून मिळणारा अलौकिक आनंद भक्ताला ईश्वराच्या अधिकाधिक जवळ नेत असतो आणि मग त्या परमेशवरासाठी गीत आळवावं असं या भक्ताला वाटायला लागतं. तो भक्त परमेश्वराला म्हणतो-

तिन्ही लोक आनंदाने भरून गाऊ दे रे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे रे...
एक एक नक्षत्राचा दिवा लागताना
आणि फुले होण्यासाठी कळ्या जागताना
पौर्णिमा स्वरांची माझ्या तुला वाहू दे रे...

निसर्गातल्या प्रतिमांनी सजलेलं हे पाडगावकरांचं गीत आनंदाची उधळण करणारं आहे. निसर्ग आणि गीत ही आनंदाची निधानं परमेश्वराच्या या आळवणीला प्रसन्न रूप देतात.

निसर्गवेड, परमेश्वराचं अस्तित्व, त्याची भक्ती आणि त्याची अनुभूती अशा भावावस्था पाडगावकरांच्या या गीतांमधून प्रत्ययाला येतात. शब्दलाघव, भावसौंदर्य, अर्थसौंदर्य आणि आशय यामुळे ही गीतं एक उच्च दर्जाचा आनंद देतात.

पाडगावकरांच्या अशाच उच्च दर्जाचा आनंद देणाऱ्या आणखी काही गीतांचा आस्वाद आपण पुढच्या लेखातून घेणार आहोत.


**– अंजली पटवर्धन**

❖

**५ वी आवृत्ती**

तरल, संवेदनक्षम स्त्री मनाचा वेध घेणाऱ्या
रवीन्द्रनाथांच्या अपूर्व प्रतिभेतून
साकारलेल्या कथा!

# पोस्टमास्तर
## आणि
## इतर कथा




मूळ लेखक - **रवीन्द्रनाथ टागोर**

अनुवाद - **मृणालिनी गडकरी**

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

माणूस आहे म्हणूनच या जगात
भावनांचा सुंदर गोफ विणला जातो,
आणि त्याला साथ असते निसर्गाची.
रवीन्द्रनाथांच्या जीवनात
‘माणूस’ आणि ‘निसर्ग’
यांना असाधारण स्थान आहे. त्यांच्या कथेत
निसर्ग हा फक्त वर्णनाकरिता येत नाही,
तर भावभावनांच्या खेळात महत्त्वाची
भूमिका बजावतो. निसर्गाची बदलणारी रूपं
माणसाच्या बदलणाऱ्या भावनांच्या प्रतिमा असतात.
निसर्ग आणि माणूस यांच्या संयोगातून फुललेली
विश्वकवीची कथा तो महामानव होता
हे नकळत सांगून जाते.

# संध्या-छाया सुखविती हृदया...

दुपारची वेळ. शरदराव विश्रांती घेत होते. शरीर पलंगावर विसावलं होतं; पण मन...नीनाताईंची हसरी, शांत मूर्ती डोळ्यांसमोर तरळत होती. आता नीनाचा आवाज कानावर येईल, 'अहो उठा, चहा घेताय ना?' असं त्यांना वाटत होतं. त्यांनी डोळे उघडले आणि समोरच्या भिंतीवर नीनाताईंचा हार घातलेला फोटो त्यांना दिसला. ते उठून बसले. त्यांच्या डोळ्यांत पाणी तरळलं होतं. 'दोन महिने झाले नीनाला जाऊन, तरी मला तिच्या नसण्याची सवय का होत नाही?' ते मनाशी पुटपुटले. उठून चहा करावा, असा विचार ते करत होते इतक्यात वंदनाचा आवाज त्यांच्या कानावर आला, ''ए, स्वत:ला फार शहाणी समजू नकोस. बाबांची जबाबदारी घ्यायला सांगतेस काय आम्हाला? तुझी मुलं आई आणि ते सांभाळत होते; माझ्या मुलाला पाळणाघरात ठेवलंय मी. आमचा काही संबंध नाही त्यांना सांभाळायचा!'' वंदना आणि नीताचं भांडण रोजचंच होतं.

स्वत: प्लॉट घेऊन पै पै जोडून शरदरावांनी घर बांधलं होतं. दोन्ही मुलांचं लग्न झाल्यावर त्यांना वरती दोन मजले चढवून स्वतंत्र फ्लॅट बांधून दिले होते. दोन्ही मुलं-सुना उच्चशिक्षित, भरपूर पगाराच्या नोकऱ्या-व्यवसाय असणारे. तिसरा मुलगा महेश पदवीधर; मात्र नोकरी बेताची. त्याच्यावरून त्यांचा मोठा मुलगा प्रकाश आणि त्याची बायको वंदना, दोन नंबरचा मुलगा नीरज आणि त्याची बायको नीता महेशला सारखे टोचत आणि राबवून घेत. वेगवगळ्या कारणांवरून दोन्ही मुलं आणि सुनांची रोज खडाजंगी चाले. नीनाताई गेल्यानंतर हे सगळं शरदरावांना असह्य व्हायला लागलं. नीनाताईंच्या जाण्याने हळवं झालेलं त्यांचं मन सारखा हाच विचार करत असे, ''या मुलांच्या आणि सुनांच्या भांडणांमुळे नीनाला सुख लाभलं

नाही. तिच्या सोशिक स्वभावामुळे ती सगळं सोसत राहिली. आपणही मुलांच्या बाबतीत कठोर भूमिका घेतली नाही. त्यांना राहायला स्वतंत्र घरं बांधून दिली. दोघांकडे पैशाला काही कमी नाही. माझी पेन्शन मला आहे. महेशला पगार कमी असला तरी तो भावांकडे काही मागत नाही. उलट तेच त्याला राबवून घेतात. नीना गेल्यापासून नीता माझा आणि महेशचा स्वयंपाक करते. आम्हाला जेवायला घालते; पण त्याच्या बदल्यात महेशला राबवून घेते. वंदना तर कशातच नाही. हेवादावा, मत्सर, भांडणं याशिवाय दुसरी कोणतीच गोष्ट तिला जमत नाही. आई गेल्यापासून प्रकाशला वाटतं, माझ्यासाठी काही करावं; पण वंदनासमोर त्याचं काही चालत नाही.''

ते पलंगावरून हळूच उतरले. त्यांच्या मानसिक स्थितीचा आता त्यांच्या शरीरावर परिणाम व्हायला लागला होता. झोपेतून उठून उभं राहिलं की थोड्या वेळ पाय थरथरायचे. कोणतंही काम करताना वेळ लागायचा. आताही पलंगावरून उतरून ते पाच मिनिटं थांबले. चहा करायला स्वयंपाकघराकडे वळणार इतक्यात दारावरची बेल वाजली. सावकाश चालत जाऊन त्यांनी दार उघडलं. दारात दुर्गाताई उभ्या होत्या. शरदरावांच्या चेहऱ्यावर थोडं हसू उमटलं. ''ये ताई,'' ते म्हणाले. दुर्गाताई स्थानापन्न झाल्या. ''वेळेत आलीस. आत्ता चहाच करणार होतो मी! ये स्वयंपाकघरात. चहा करतो.'' ''तू कशाला? मी करते ना. नीनाच्या हातचा आयता चहा वर्षानुवर्षं प्यायले. आता तुला तरी आयता चहा करून देते,'' असं म्हणून पाय धुऊन दुर्गाताई स्वयंपाकघरात ओट्यापाशी गेल्यासुद्धा. त्यांनी एका गॅसवर दूध तापायला ठेवलं. एका गॅसवर चहाचं आधण ठेवलं.


चहा घेतल्यानंतर त्या म्हणाल्या, ''शरद, दोन महिन्यांत काय अवस्था करून घेतली आहेस ही? नीना साठीतच गेली. तू पासष्टीचा; पण किती थकल्यासारखा दिसतोस! अरे, परदेशात तर साठी-पासष्टीच्या माणसांना म्हातारं म्हणतच नाहीत. त्याही वयात खूप कार्यरत असतात माणसं.'' ''मान्य आहे ताई मला; पण घरातलं वातावरण बघतेस ना तू! काय वागतात मुलं आणि सुना. त्यात महेशची काळजी. खूप त्रास होतो ग मनाला!'' ''हे बघ, घरात बसशील तर आणखी त्रास होईल.'' ''मग काय करू म्हणतेस?'' ''अरे, इंजियिरिंगमध्ये डॉक्टरेट मिळविलेला माणूस तू. इंजिनियरिंगच्या क्लासमध्ये शिकवायला जात होतास ना. मग जा ना आता परत. बोलावताहेत ना ते तुला?'' ''ताई, माझं मन लागत नाही कशात. सारखी नीनाची आठवण येते. या मुलांमुळे तिला सुख मिळालं नाही, हे सारखं मनाला डाचतं. आता महेशलाही किती त्रास देतात ते.'' ''म्हणून तर म्हणते शरद, यातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे तू खंबीर होणं. नीनाच्या पाठीशी नाही उभा राहू

शकलास. आता महेशच्या पाठीशी ठामपणे उभा राहा. प्रकाश आणि नीरजच्या बाबतीत तुला आता कठोर होऊन निर्णय घ्यावा लागेल. जी मुलं आणि सुना बायको गेल्यानंतर तुला आधार देण्याऐवजी मन:स्ताप देतात, त्यांना तू घरं बांधून दिलीस तरी त्याबद्दल कृतज्ञता न बाळगता तुला वाट्टेल तसं बोलतात, त्यांना दिलेली घरं काढून घे त्यांच्याकडून. नाहीतरी ते फ्लॅट्सही तुझ्याच नावावर आहेत. तू हे करू शकतोस.'' ''पण ताई...'' ''आता काही बोलू नकोस. आता येताना मी त्या इंजिनियरिंगच्या क्लासमध्ये जाऊन आले. ते तुझी वाट पाहताहेत. अगदी उद्यापासून गेलास तरी चालणार आहे त्यांना. ज्ञानदानासारखं पुण्य नाही दुसरं. शिवाय तुझं मनही गुंतलेलं राहील.''

दुर्गाताई निघून गेल्या; पण शरदरावांना एक नवी दिशा त्यांनी दाखवली होती. शरदरावांनी क्लासमध्ये फोन लावला. ते उद्यापासून येत आहेत, असं सांगितलं. आता शरदरावांचं रूटिन व्यवस्थित सुरू झालं. सकाळी चार तास क्लासमध्ये. दुपारी घरी येऊन जेवायचं. त्यांच्या आणि महेशच्या स्वयंपाकासाठी त्यांनी आता बाई ठेवल्या होत्या. थोडी विश्रांती घ्यायची. परत चार तास क्लासमध्ये जायचं. दरम्यान, प्रकाश आणि नीरजला त्यांनी फ्लॅट सोडायला सांगितले होते. त्यावर त्या दोघांनी खूप अकांडतांडव केलं; पण शरदराव बधले नाहीत. एक बाप म्हणून हा निर्णय घेताना त्यांच्या मनाला अनंत यातना झाल्या होत्या; पण प्रकाश आणि नीरजनी त्यांच्यासमोर दुसरा पर्यायच ठेवला नव्हता. त्या दोघांनी घर सोडल्यानंतर शरदराव शांती अनुभवू लागले. इंजिनियरिंगच्या क्लासमध्ये येणारे काही विद्यार्थी बाहेरगावचे होते. ते जिथे राहात ते भाडं त्यांना परवडण्यासारखं नव्हतं. अशा विद्यार्थ्यांना शरदरावांनी प्रकाश आणि सूरजचा फ्लॅट कमी भाड्यात दिला. आता बिल्डिंगमध्ये त्यांना सोबतही झाली.

कुशाग्र बुद्धीमुळे इंजिनियरिंगच्या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान शरदराव आत्मसात करत होते. प्रकाश आणि नीरजचा फ्लॅट आता त्यांनी महेशच्या नावावर करून दिला. हे नीरज आणि प्रकाशला समजलं. ते सारखे फोन करून महेशला वाट्टेल तसं बोलायला लागले. धमक्या द्यायला लागले. बाबांना त्रास होईल म्हणून महेशने त्यांना काही सांगितलं नाही; पण त्याची मानसिक स्थिती बिघडली. एके दिवशी त्याच्या मालकांनी शरदरावांना फोन केला, ''तुमच्या घरी काही प्रॉब्लेम्स आहेत का? महेशचं हल्ली कामात लक्षच नसतं. सारखे कुणाचे तरी फोन येतात आणि मग तो अस्वस्थ होतो.'' शरदरावांनी त्याविषयी महेशला विचारलं तेव्हा त्याने खरं काय ते सांगितलं.

**४ थी आवृत्ती**



# द काइट रनर

**मूळ लेखक** – खालिद हुसैनी

**अनुवाद** – वैजयंती पेंडसे

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

आपल्या वडिलांच्या नजरेत भरण्याजोगं, त्यांचं कौतुक मिळवण्याजोगं काहीतरी करण्यासाठी आसुसलेला बारा वर्षांचा आमिर पतंगांची स्थानिक दंगल जिंकण्याचा निर्धार करतो. त्याचा इमानी दोस्त हसन त्याला मदत करण्याचं वचन देतो.

पतंगांच्या दंगलीच्या दिवशी संध्याकाळी घडलेल्या, एका घटनेमुळं दोघांचं भावविश्व उद्ध्वस्त होऊन जातं...

१९७०च्या दशकात रशियन फौजांनी अफगाणिस्तानवर कब्जा केल्यानंतर आमिरच्या कुटुंबाला अमेरिकेत परागंदा व्हावं लागतं. पण अमेरिकेत गेल्यानंतरही आमिरच्या मनात एक जाणीव सतत जागृत असते ती म्हणजे एक ना एक दिवस, कधीतरी त्याला जरूर परतावं लागणार आहे. नव्या जगातलं त्याचं समृद्ध आयुष्यही त्याला कधीच देऊ शकणार नाही, अशा गोष्टीसाठी - ती म्हणजे प्रायश्चित्त!

त्याच्या हातून घडलेल्या अक्षम्य गुन्ह्याचं प्रायश्चित्त!

शरदराव म्हणाले, ‘‘अरे, तुला उत्तर देता येत नाही का? ही सगळी मिळकत स्वकष्टार्जित आहे. ती कुणाला द्यायची, हा माझा वैयक्तिक प्रश्न आहे.’’ त्यानंतर त्यांनी प्रकाश आणि नीरजला चांगलीच समज दिली.


यथावकाश महेशचं लग्न झालं. सून अगदी शरदरावांच्या मनासारखी होती. सुनेच्या रूपात त्यांना लेक मिळाली. महेशला समजून घेणारी अर्धांगिनी मिळाली. शरदराव आता खूप आनंदात होते. आता ते मनाशी म्हणत होते, ‘संध्या-छाया सुखविती हृदया...’

**– रचना**

❖


**२ री आवृत्ती**

# टॉक्सिन




**मूळ लेखक** – रॉबिन कुक


**अनुवाद** – प्रमोद जोगळेकर

**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

नुकताच घटस्फेट घेतलेला डॉ. किम रेग्गीस आपल्या एकुलत्या एका मुलीला बेकीला घेऊन एका संध्याकाळी फास्ट-फूड रेस्टॉरंटमध्ये गेला. तिथे बर्गर आणि फ्रेंच फ्राईज खाताना ह्या शोकांतिकेची सुरवात झाली. ‘इ. कोलाय’ जीवाणूच्या विषामुळे-टॉक्सिनमुळे बेकीचा भीषण अंत झाला. आपले हितसंबंध जपण्यासाठी कुठल्याही थराला जाणारे, बीफ उद्योगातले प्रचंड ताकद असणारे बेबंद भांडवलदार आणि त्यांची नफा कमावण्यासाठी काहीही करायला मागेपुढे न पाहण्याची हिडीसवृत्ती.

३ री आवृत्ती

# द नेमसेक



**मूळ लेखक –** झुंपा लाहिरी

**अनुवाद –** उल्का राऊत

**किंमत : २७०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

...तसं पाहायला गेलं तर त्याचा सारा जीवनप्रवास अपघातांच्या मालिकेनंच भरलेला. सुरुवात झाली बाबांच्या गाडीला अपघात झाला त्या घटनेपासून. ...गोगोल हे नावही अपघातानंच त्याला मिळालं. त्याच्या पणजीनं निवडलेलं नाव त्यांना अखेरपर्यंत समजलं नाही. कलकत्ता ते केंब्रिज ह्या प्रवासात तिचं पत्र कायमचंच गहाळ झालं. ह्या एका अपघाताचे परिणाम गोगोलला अनेक वर्षं भोगायला लागले. नाव देताना आयत्या वेळी बाबांना त्यांचा अपघात आठवला, ज्याच्या पुस्तकामुळं ते जीवानिशी वाचले त्या गोगोलच्या नावानं त्याचं नामकरण झालं. या विचित्र नावानं त्याला खूप छळलं. मोठा झाल्यावर त्यानं ती चूक दुरुस्त केली; तरीही 'गोगोल' नावानं त्याचा पिच्छा कधीच सोडला नाही... ...भविष्यात काय घडणार हे कधीच माहीत नसतं. सारं काही अचानक सामोरं येतं. त्यासाठी कोणत्याही प्रकारची तयारी करता येणं शक्य नसतं; परंतु तेच अनुभव गाठीशी बांधून त्यामागील कार्यकारणभाव शोधायला पुढचं सारं आयुष्य पडलेलं असतं आणि मग ध्यानात येतं की कधी घडायलाच नको होत्या अशा वा कोणतंही प्रत्यक्ष कारण दिसत नसताना घडलेल्या घटनांनीच आयुष्य भरलेलं आहे.

# श्रद्धांजली



**✻ सुधा गोखले**

सुधा गोखले यांचे नुकतेच निधन झाले. त्या ७६ वर्षाच्या होत्या.

त्यांनी सातत्याने ‘लोकसत्ता’, ‘महाराष्ट्र टाइम्स’ व ‘लोकमत’ या वृत्तपत्रांतून विविध स्वरूपाचे लेखन केले.

२००७ साली त्या एका काश्मिरी मुसलमान कुटुंबात राहिल्या होत्या. माणूस दहशतवादाकडे का वळतो, या कुतूहलापायी त्यांनी जिवावर उदार होऊन काही दहशतवाद्यांची भेट घेतली.

वेगवेगळ्या वयाच्या बलात्कारपीडित स्त्रियाही त्यांना भेटल्या. या सर्वांची दु:खे व अनुभव सांगणारे लेख ‘मोहतरम्मा ते अम्मा’ या नावाने मेहता पब्लिशिंग हाऊसने पुस्तकरूपात लोकांसमोर आणले. तेच लेख ‘जन्मभूमी प्रवासी’ या गुजराथी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले आणि तिथेही ते गाजले.

सुधा गोखले यांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे आणि मेहता बुक सेलर्सतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!



## ✳ डॉ. राजशेखर हिरेमठ

डॉ. राजशेखर हिरेमठ यांचे अलीकडेच निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते.

'समग्र शिरवाडकर' हा हिरेमठ यांचा पीएच.डी.चा विषय होता. त्यांनी संगमेश्वर महाविद्यालयात दीर्घ काळ प्राध्यापक म्हणून काम केले. त्यांनी पीएच.डी.साठी मार्गदर्शनही केले.

'मराठी व्याकरण परिचय', 'भाषाशास्त्र परिचय' आणि 'मराठी गझल : रंग आणि गंध' ही तीन पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांपैकी 'मराठी व्याकरण परिचय', 'भाषाशास्त्र परिचय' ही पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहेत. तसेच साहित्य, राजकारण, धर्म, शिक्षण यासंबंधी वृत्तपत्रातून त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत.

'मराठी व्याकरण परिचय' या पुस्तकातून व्याकरणाचे स्वरूप त्यांनी सुबोधपणे विद्यार्थ्यांना समजावून दिले आहे. या पुस्तकाच्या पाच आवृत्त्या निघाल्या. अलीकडे स्पर्धा परीक्षेच्या मुलांमध्ये हे पुस्तक फार लोकप्रिय होते. अनेक प्रादेशिक विभागांत या पुस्तकाचे अनुकरण करून काही आवृत्त्याही निघाल्या.

'भाषाशास्त्र परिचय' या पुस्तकात भाषाशास्त्रविषयक अनेक अभ्यसनीय मते डॉ. हिरेमठ यांनी मांडली आहेत.


ते शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य होते. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे संस्थेचे ते आजीव सभासद होते. त्यांनी अनेक सामाजिक संस्था तसेच साहित्यिक चळवळींत सहभाग घेतला होता.

डॉ. हिरेमठ यांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे आणि मेहता बुक सेलर्सतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

❖

स्मरण

# कवी अनिल



अर्वाचीन मराठी कवितेमध्ये, आपल्या कवितेमधून मुक्तछंदाचे स्वतंत्र आणि मुख्य म्हणजे अत्यंत महत्त्वपूर्ण असे स्थान मिळविणारे कवी अनिल, अर्थातच आत्माराम रावजी देशपांडे हे एक महत्त्वाचे कवीनाम आहे. केशवसुत संप्रदायाचा उदय साधारण १८८५च्या दरम्यान झाला आणि त्या पार्श्वभूमीवर कवी अनिलांनी १९२०-२२ च्या दरम्यान आपल्या कविता लेखनाला सुरुवात केली. 'रविकिरण मंडळ' ऐन बहरात येत असताना, केशवसुतांच्या प्रभावळीतला हा एक स्वतंत्र तारा अभिजात कवितेच्या विश्वात प्रगट झाला. विचारगर्भ भावकवितेचे दर्शन कवी अनिलांच्या एकूणच कवितेने त्याच वेळी अगदी सहजपणे घडविले. मराठी काव्यविश्वाला अंतर्मुख करण्यात कवी अनिलांचा वाटा फार मोठा आहे. मुक्तछंदाचे प्रवर्तक म्हणून कवी अनिल प्रसिद्ध झाले. अनिलांनी मुक्तछंदात्मक रचनेचा प्रयत्न आपल्या 'प्रतिभा' या प्रदीर्घ परंतु अपूर्ण काव्यात प्रथमच केला होता. या संदर्भात कवी अनिल म्हणतात , '१९१९ ते १९२३ या काळात, फर्ग्युसन कॉलेजमध्ये मी शिकत असताना, आणि काही थोड्या 'मुक्तक गीत' अशा कविता लिहित असताना मनात एक जाणवत राहायचे की, अतिशय सघन अशा आशयाला मुक्तक किंवा गीतातून अभिव्यक्त करता येतं; पण आशय जर विस्तृत असला तर? तो अभिप्रेत आशय अशा काव्यप्रकारातून व्यक्त होऊ शकत नाही... त्यावेळी मनात एक कल्पना चमकून गेली की, असे काही अभिव्यक्तीचे वाहन मिळाल्याशिवाय मनातला साराच आशय रिता होऊ शकत नाही. त्या दृष्टीने माझा प्रयत्न सुरू झाला.' कवी अनिलांनी 'एका पिढीचे आत्मकथन' या लेखातून मुक्तछंदाचे बीज मनात कसे उगवून आले, ते प्रकट केले होते. त्या काळात अनिलांनी मराठी

काव्यविश्वात रुजवलेल्या या मुक्तछंदाबद्दल अनेक मान्यवरांनी चर्चा करून कवी अनिलांना मुक्तछंदाचे प्रवर्तक म्हणून मान्यता दिली होती. सत्यच सांगायचे झाले तर, अनिलांनी केशवसुत संप्रदायातील अनेक कवींचे संस्कार, जाणिवा, अर्वाचीन कवितेचे भान काही प्रमाणात स्वीकारत आणि समकालीन कवींच्या कवितांचे अत्यंत रसिकतेने वाचन करीत, आपली नवी वाट, आपल्या कवितांमधून प्रगट केली. कवितेतला आशय, त्या काव्यातली अभिव्यक्ती जाणून घेत, विविध प्रयोगसुद्धा केले आणि आपल्या कवितेला जाणीवपूर्वक टवटवीत ठेवले. आत्मनिष्ठ कविता लिहिणाऱ्या अनिलांनी जणू स्वत:ची 'दशपदी' जोपासली. आपले रसिक व्यक्तिमत्त्व, आयुष्यातले संदर्भ त्यांच्या एकूणच कवितेतून अनेक वेळेला प्रगट केले. ऐन तारुण्यात असताना त्यांनी प्रेमकविता लिहिल्या. 'फुलवात' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. रोमारोमात रसिकत्व भिनलेल्या अनिलांच्या व्यक्तिमत्त्वात प्रेमाची अखंड वात आयुष्यभर तेवत होती. भारतीय संस्कृती, पावित्र्य, मांगल्य अनिलांनी प्रत्येक क्षणी जोपासत चिरंतन मूल्यांचा स्वीकार केला. पेशाने वकील असणाऱ्या आणि काही काळ न्यायाधीश म्हणून काम केलेल्या अनिलांनी चोख न्यायदान केले; परंतु अंत:करणातील प्रेमभावना मात्र आयुष्यभर फुलातल्या गंधासारखी जोपासली.

कवी अनिलांनी 'निर्वासित चिनी मुलास' आणि 'भग्नमूर्ती' ही दोन दीर्घकाव्ये लिहून आपल्या ठायी वसत असलेले सामाजिक भान, मानवी संस्कृती आणि वैश्विक मानवतावाद सहज आणि प्रभावी शैलीत प्रगट केला. 'भग्नमूर्ती' या दीर्घकाव्यात भ्रामक मायावादात गुंतणाऱ्या, चुकीच्या देवसंकल्पनेत रमणाऱ्या समाजाला उद्देशून कविश्रेष्ठ अनिल म्हणतात की,

देवावर जरी विश्वास आहे
श्रद्धा आणि निष्ठा
तितकीच ठेवा आपुल्यातही
कारण देवांचे कार्य
तुमच्या हातेच होणार आहे

तुमच्या रक्षणी त्याचे रक्षण...

माणूस हे कधीच लक्षात घेत नाही. केशवसुतांनी 'तुतारी' कवितेत म्हटले होते की,

धर्माचे माजवूनि डम्बर,
नीतीला आणिती अडथळे,
विसरुनियां हे जातात खुळे–
नीतीचें पद जेथें न ढळे–
धर्म होतसे तेथेंच स्थिर...

कवी अनिलांनी तोच धागा पकडीत 'भग्नमूर्ति' मध्ये अधिक विस्तारित केला. 'फूलवात', 'पेर्तेव्हा', 'भग्नमूर्ति', 'चिरयौवन', 'सांगाती', 'दशपदी' हे अनिलांचे महत्त्वाचे कवितासंग्रह. त्यातल्या 'दशपदी'ला तर १९७७चा 'साहित्य अकादमी' हा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार लाभला होता. कवी अनिल म्हणूनच या काव्यविश्वात 'दशपदी'कार' म्हणूनच सर्वज्ञात झाले होते. 'आणीबाणी' ह्या अप्रितम अशा कवितेतून आपले जणू मनोगतच प्रगट करताना, या 'दशपदी'तून कवी अनिल म्हणतात,

अशा काही रात्री गेल्या, ज्यात काळवंडलो असतो
अशा काही वेळा आल्या, होतो तसे उरलो नसतो...
वादळ असे भरून आले, तारू भडकणार होते
लाटा अशा घेरत होत्या, काही सावरणार नव्हते...
हरपून जावे भलतीकडेच, इतके उरले नव्हते भान
करपून गेलो असतो, इतके पेटून आले होते रान...
डाव असे पडत होते की, सारा खेळ उधळून द्यावा
विरस असे झाले होते, जीव पुरा विटून जावा...
कसे निभावून गेलो, कळत नाही, कळत नव्हते
तसे काही जवळ नव्हते, नुसते हात हाती होते...

कवी अनिल यांचा जन्म वऱ्हाडातला. ११ सप्टेंबर १९०१ हा त्यांचा जन्मदिवस. अकोला जिल्ह्यातल्या मूर्तिजापूर ह्या गावी त्यांचा जन्म झाला. जन्मतःच तीक्ष्ण बुद्धीच्या आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ कवी अनिल अलाहाबाद विद्यापीठातून मॅट्रिकची परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण

झाले. पुढे ते पुण्यातल्या प्रसिद्ध फर्ग्युसन महाविद्यालयातून तत्त्वज्ञान हा विषय घेऊन बी. ए. झाले. आश्चर्य म्हणजे भारतीय अभिजात चित्रकलेचा अभ्यास करण्यासाठी ते श्रेष्ठ चित्रकार अवनींद्रनाथ टागोर यांच्याकडे कलकत्त्याला आले १९२४ मध्ये आणि त्यांनी त्यांच्याकडे, तसेच श्रेष्ठ चित्रकार नंदलाल बोस यांच्याकडे चित्रकलेचे शिक्षण घेतले.

१९२५मध्ये कवी अनिल एलएल. बी.ची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि १९२५-२६च्या दरम्यान अमरावती येथे कोर्टात वकिली सुरू केली. १९२९मध्ये वयाच्या अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी ते हुशंगाबाद कोर्टामध्ये सब जज्ज म्हणून रुजू झाले. पुण्यामध्ये फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांची अत्यंत बुद्धिमान म्हणून ज्ञात असणाऱ्या कुसुमावती जयवंत यांच्याशी २ जुलै १९२१ रोजी प्रथम दृष्टभेट झाली. दोघांचे प्रीतीचे स्वर जुळून आले आणि त्याची परिणती पुढे १९२९मध्ये विवाहामध्ये झाली. कुसुमावती जयवंत, कुसुमावती देशपांडे झाल्या. या प्रेमाच्या विलक्षण बहरात कवी अनिलांच्या प्रेमकवितासुद्धा बहरू लागल्या. त्या दोघांमधला प्रेमपत्रांमधून जुळून आलेला प्रेमसंवाद नंतर 'कुसुमानिल' या पुस्तकातून प्रगट झाला. वास्तविक हा आंतरजातीय विवाह होता. त्या काळात आंतरजातीय विवाहाला समाजाकडून विशेष मान्यता नव्हती. मनातले प्रेम प्रगट करण्याची ताकद त्या वेळच्या तरुण पिढीत अजिबात नव्हती. वासनाविरहित प्रेम, ज्याला इंग्रजीमध्ये 'प्लेटोनिक लव्ह' म्हणतात, त्या दिशेने दोघांचा प्रेमसंबंध जुळून आला होता. मराठी साहित्यातील त्या काळातील ती एक विलक्षण अशी घटना होती. २३ मार्च १९२२ रोजी कवी अनिलांनी 'प्रेमाचे ममत्व' नावाची एक कविता लिहिली होती. त्याचा शेवट करताना ते म्हणतात,

तुम्ही सारे मोठे किति जरि गुणे युक्त असला
तुम्ही सारे रुपे जरि मदनमूर्तीच असला
कृपादृष्टी तुम्हावरि जरि किती लक्ष्मी करिते
अभावी सर्वांच्या मज मम सखीप्रेम वरिते...

मराठी साहित्य संमलेनांच्या इतिहासातील सर्वांत आश्चर्याची आणि अत्यंत अभिमानाची घटना म्हणजे या दांपत्याने साहित्य संमलेनाचे अध्यक्षपद भूषविले. १९५८मध्ये मालवण येथे संपन्न झालेल्या

चाळिसाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमलेनाचे कवी अनिल अध्यक्ष झाले आणि १९६१मध्ये ग्वाल्हेर येथे संपन्न झालेल्या त्रेचाळिसाव्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा कुसुमावतीबाई देशपांडे झाल्या. हा एक विलक्षण योगायोग मराठी साहित्यात घडला. हे एक साहित्यरत जोडपे होते. १७ नोव्हेंबर १९६१ रोजी कुसुमावती ह्यांचे दु:खद निधन झाले, जेव्हा त्या अध्यक्ष होत्या.

नागपूर मुक्कामी कवी अनिल यांचे ८ मे १९८२ रोजी दु:खद निधन झाले.

**– वामन देशपांडे**

**७ वी आवृत्ती**

# यज्ञकुंड





**वि. स. खांडेकर**

**किंमत : १३०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

‘यज्ञकुंड’ हा मराठी साहित्यातील श्रेष्ठ लेखक कै. वि. स. खांडेकर यांचा कुमारांसाठीचा कथासंग्रह. अतिशय सहज, अकृत्रिम शैलीतील या कथा कुमारांनाच नव्हे, तर प्रौढांनाही अंतर्मुख करतात.

‘जीवनासाठी कला’ असे मानणारे वि. स. खांडेकर आपल्या कथांतून, जीवनातील उच्च नैतिक मूल्यांचा उद्‌घोष करत हे प्रश्न उपस्थित करतात.

**७ वी आवृत्ती**




# मंदाकिनी

## वि. स. खांडेकर

**किंमत : १३०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

कीर्ती, संपत्ती, संस्कृती इत्यादिकांच्या मागे धावून मिळणारी सुखे ही गाण्यातल्या लांबलचक तानांसारखी असतात. ती बुद्धीला झुलवितात, पण हृदयाला हलवू शकत नाहीत. उलट दररोजच्या साध्यासुध्या आयुष्यक्रमातील इवलीइवली सुखे ही गायनातल्या लहान लहान मुरक्यांप्रमाणे वाटतात. त्यांच्यामुळेच जीवनसंगीताला अवीट गोडी प्राप्त होते, असे मला तरी वाटते. आपला एखादा मित्र आजारी असला, तर त्याच्याकरता आपण काही मुंबईहून विमानाने बडे बडे डॉक्टर आणू शकत नाही; पण त्याला भेटायला जाताना एखादे टपोरे गुलाबाचे फूल घेऊन जाणे तरी आपल्या स्वाधीन आहे की नाही? आपला मित्र कवी नसला किंवा कुठल्याही वस्तूवर एखादे प्रतीक लादून गूढगुंजन करणाऱ्या कादंबऱ्यांचा त्याला कंटाळा येत असला,तरीही त्या गुलाबाच्या फुलाकडे पाहून त्याच्या मुद्रेवर स्मितरेषा चमकल्याशिवाय राहणार नाही. जणूकाही ते फूल त्याला मूकसंदेश देत असते – हास, जरा हास. काल आणि उद्या हे भास आहेत. जगात सत्य एकच आहे. आज – हा दिवस – ही घटका – हा क्षण!

# बाजिंद : एक वाचकप्रिय कलाकृती

सध्याच्या धावपळीच्या व धकाधकीच्या काळामध्ये विज्ञानप्रगतीमुळे समाजजीवन कमालीच्या वेगाने बदलत व गतिमान होत चालले आहे. सद्य जीवनशैलीमध्ये सुख मानण्याच्या संकल्पनाच बदलू लागल्या आहेत, त्यामुळे मनुष्याला जीवनात खऱ्या अर्थाने विरंगुळा, सुख व शांती प्राप्त करून देणाऱ्या बाबीकडे लक्ष द्यायला वेळच नाही. या बाबी कोणत्या? तर निसर्गात रमणे, ध्यानमग्नता, चिंतन व कलेचा मनसोक्त आस्वाद! म्हणजेच उत्तम संगीत ऐकणे, शिल्प, चित्रकलेत रमून जाणे अथवा साहित्य वाचणे व त्यात भान विसरणे या होत; मात्र त्यासाठी वेळच नसल्याने वाचनप्रिय नवीन पिढी निर्माण होताना दिसत नाही व अशा परिस्थितीमध्ये एखादे साहित्य निर्माण करणे, ते प्रकाशित करणे हे एक दिव्यच आहे असे मला वाटते.


अगदी सकस, वैचारिक, सामाजिक भान जागृत करणाऱ्या लेखनास सध्या वाचक प्रतिसाद किती मिळेल याची साशंकता आहेच. या परिस्थितीत आपली ‘बाजिंद’ कादंबरी मात्र या सर्व बाबींचा विचार करता सर्वसामान्य वाचकासाठीही वाचकप्रिय कलाकृती ठरेल अशी आशा आहे; कारण सर्व रसांचा परिपोष या कलाकृतीमध्ये आहे असे जाणवते, ज्यामध्ये प्रामुख्याने वीर, अद्‌भुत, शृंगार, शांत व बीभत्स रसानुकूल प्रसंग वाचताना वाचक गुंग होऊन, रमून जाईल असे मला वाटते.

या कादंबरीमधील छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या थोर युगपुरुषाच्या ऐतिहासिक कालखंडाच्या संदर्भाने उभी केलेली पात्रे – खंडोजी, बहिर्जी नाईक, शिर्के, मोगली सरदार इत्यादी व्यक्तिरेखा खूपच वेगळ्या पद्धतीने चित्रित झालेल्या जाणवतात. यातील कथानकात साऊ-खंडोजी या पात्रांच्या माध्यमातून वीर-शृंगार व प्रेमभाव प्रभावीपणे, उत्कटतेने तरीही कोणत्याही मर्यादा न उल्लंघता व्यक्त झाला आहे. बहिर्जी नाईक, उस्ताद या पात्रांच्या वर्णनातून साहस, रहस्य व गूढता प्रभावीपणे व्यक्त होताना दिसते, तर 'बाजिंद' या व्यक्तिरेखेच्या चित्रणातून अद्‌भुतता, कल्पनारम्यता (फॅन्टसी) प्रत्ययाला येते.

शेवटी वाचनीयता हा सर्व साहित्याचा आवश्यक गुण असतो. तो यामध्ये छान जमला आहे. प्रत्येक क्षणी उत्कंठा वाढवत-वाढवत कथा पुढे पुढे जात राहिल्याने वाचक कथेशी समरस होतो व भान विसरतो, याची प्रचिती येते; मात्र काही व्यक्तिरेखा अजून प्रभावी व ठळकपणे मांडण्यास वाव होता असे मला वाटते. असो. एक छान कलाकृती वाचून काही क्षण जगरहाटी विसरायला झाले, ही माझ्या दृष्टीने खूप मोठी गोष्ट आहे. आपल्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा! धन्यवाद!

**'बाजिंद'**
लेखक : पै. गणेश मानुगडे
पृष्ठसंख्या : १५८
किंमत : १८०
मेहता पब्लिशिंग हाऊस

*७ मार्च, २०१७*
*वाचक*




# 'क्रांतियोगिनी'ची प्रेरक जीवनगाथा

इतिहास एखाद्या विशिष्ट कालखंडात असं काही वळण घेतो, की अभ्यासकांना पुन:पुन्हा तो काळ खुणावत राहतो. प्रत्येक वेळी काहीतरी नवीन गवसल्याची जाणीव होते. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाचा संधिकाल हे त्याचं एक उदाहरण. वेगवेगळ्या वैचारिक प्रवाहांची घुसळण सुरू झाली ती याच काळात. स्वामी विवेकानंदांनी सुरू केलेलं राष्ट्रीय-सांस्कृतिक-धार्मिक पुनर्जागरण हाही त्यातला एक ठळक प्रवाह होता. त्यांच्या कार्यात सहभागी झालेल्या एक पाश्चात्त्य विदुषीची ओघवत्या शैलीत कथन केलेली ही जीवनकहाणी. या विदुषीचं नाव मार्गारेट नोबल अर्थात भगिनी निवेदिता.

उत्तर आयर्लंडमध्ये जन्मलेल्या मार्गारेटला घरातूनच देशभक्तीचं बाळकडू मिळालं होतं. आयरिश स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेलं हे घराणं होतं. मार्गारेटच्या बालपणीची विस्तृत माहिती देऊन पुढं ती भारतीय राष्ट्रीय जाणिवांशी आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांशी समरस होण्याची बीजं या वातावरणात कशी होती, याचं सूचन लेखिका करते. मार्गारेटला अध्यात्माचं आकर्षण होतं; परंतु प्रत्येक गोष्ट बुद्धीच्या निकषावर तावून सुलाखून घेतल्याशिवाय स्वीकारत नसे. स्वामी विवेकानंदांचं अनुयायित्व स्वीकारतानादेखील अनेक विषयांवर त्यांच्याशी तिच्या चर्चा झडल्या. शंकांचं निराकरण होईपर्यंत ती स्वस्थ बसत नसे आणि एखादी गोष्ट पटली, की मात्र त्यात सर्वस्व झोकून देऊन काम करत असे. हे चरित्र वाचताना तिच्या या वैशिष्ट्याचा ठसा वाचकाच्या मनावर उमटतो. विवेकानंदांनीदेखील आपली मतं लादण्याचा प्रयत्न न करता मार्गारेटच्या वैचारिक प्रवासात मार्गदर्शकाची भूमिका कशी निभावली, हे लेखिकेनं दाखवून दिलं आहे. गुरू-शिष्यातल्या नात्याचे हे वेगवेगळे पैलू पुस्तकातून समोर येतात.

विज्ञानानं माणसाच्या आयुष्यात जे क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणलं होतं, त्याचा परिचय भारतात ब्रिटिश राजवटीमुळं झाला. आधुनिक शिक्षण मिळालेल्या पहिल्या पिढीचे लोक त्यानं प्रभावित झाले नसते तरच नवल.

त्यांचे डोळे दिपून गेले; पण याचा एक परिणाम असाही झाला की, भारतातल्या हजारो वर्षांच्या परंपरेविषयी काहींच्या मनात सरसकट तिटकारा निर्माण झाला. तिच्याकडं पाठ फिरवल्याशिवाय आधुनिकतेच्या प्रकाशाला सामोरं जाता येणार नाही, असं त्यांना वाटू लागलं. स्वामी विवेकानंदांना हे अजिबात मान्य नव्हतं. त्यांना या समाजाचा आत्मविश्वास पुन:स्थापित करायचा होता. भारतीय सांस्कृतिक परंपरेच्या नितळ-निखळ रूपाला उजाळा देत या समाजाची पुनर्रचना व्हायला हवी, असा त्यांचा प्रयत्न होता. तिथपर्यंत पोचण्यासाठी वाटेतील अंधश्रद्धांचा बुजबुजाट, मुरलेल्या हितसंबंधांचं शेवाळ हटवायला हवं, हे तर उघडच होतं. भारतीयांचं मनोबल खच्ची करू पाहणाऱ्या साम्राज्यवाद्यांशीही त्यांचा झगडा होता. एका पाश्चात्त्य विदुषीनं या कार्याचं, त्यामागच्या भूमिकेचं मर्म ओळखणं, एवढंच नव्हे तर या कार्याला आजन्म वाहून घेणं, ही घटना एकमेवाद्वितीय म्हणावी लागेल. ते सारं अनोखेपण या चरित्राच्या रूपानं प्रभावीपणे मांडलं गेलं असल्यानं हे केवळ चरित्र न राहता त्या मंतरलेल्या काळाची एक झलकही त्यातून प्रतीत होते. भारतीय स्त्रियांच्या शिक्षणासाठी निवेदितांनी खूप परिश्रम घेतले. हे करताना त्यांना अनेक आव्हानांना आणि संकटांना सामोरं जावं लागलं. दुसऱ्या बाजूला वैचारिक आघाडीवरही त्यांना संघर्ष करावा लागला. त्याचं तपशीलवार वर्णन मृणालिनी गडकरी यांनी केलं आहे. त्यासाठी बंगालीसह विविध भाषांतील संदर्भस्रोत त्यांनी मिळवले. आठवणी, तत्कालीन कागदपत्रं, पत्रव्यवहार अशा अनेक साधनांचा वापर करून त्यांनी ही चरितकहाणी सिद्ध केल्यानं तिचं मोल वाढलं आहे.




**'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता'**
लेखक : मृणालिनी गडकरी
पृष्ठसंख्या : ४०८
किंमत : ४५०
मेहता पब्लिशिंग हाऊस
*सकाळ, सप्तरंग*
*रविवार, १६ एप्रिल २०१७*

# रामकृष्ण परमहंस

*१८ फेब्रुवारी १८३६ ला रामकृष्ण परमहंस बंगालमधील एका खेड्यात जन्मास आले. त्या गावाचे नाव होते कुमारपुकूर. आई-वडलांनी त्यांचे नाव गदाधर ठेवले. हा गदाधर पुढे रामकृष्ण परमहंस म्हणून साऱ्या जगात प्रसिद्ध झाला. १५ ऑगस्ट १८८६ मध्ये रामकृष्णांनी आपल्या भक्तांचा व जगाचा निरोप घेतला. आपल्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात त्यांनी परमेश्वराच्या प्राप्तीसाठी सर्व प्रकारच्या खडतर साधना केल्या. 'ईश्वर एक आहे, सर्व धर्म त्याच्याकडे जाणाऱ्या वाटा आहेत' असा संदेश दिला. 'जीवाची सेवा हीच ईश्वराची सेवा' हा आदेश आपल्या अनुयायांना देऊन त्यांच्याकरवी दीन दुबळ्यांची सेवा करून घेतली. श्री स्वामी विवेकानंदांसारखा एक अलौकिक शिष्य तयार केला. आजही रामकृष्ण मिशन ही सेवाभावी संस्था त्यांनी घालून दिलेल्या भक्तीमार्गाचे निष्ठेने पालन करत आहे.*

आपल्या साधनाकाळात श्री रामकृष्ण आपल्या मनातून पैशाचा कसलाही मोह व जन्माने मिळणारी उच्च–नीचता काढून टाकण्याचा विशेष प्रयत्न करत. एकदा गंगानदीच्या काठावर बसलेल्या रामकृष्णांच्या एका हातात मूठभर रुपयांची नाणी आणि दुसऱ्यात मूठभर माती होती. बराच वेळ ते इकडची नाणी तिकडे तर तिकडची माती इकडे खेळवत विचार करू लागले. त्यांच्या मनात विचार



येत होता– 'पैसा मला जास्तीत जास्त आराम, चैन देईल त्यामुळे मी काही दानधर्मही करू शकेन. पण तो परमेश्वराचे दर्शन घडवून देऊ शकणार नाही. म्हणजे, या नाण्यांची किंमत या मातीपेक्षा किंचितही जास्त नाही...!' असे म्हणून त्यांनी ती नाणी व माती दोन्ही गंगेच्या पाण्यात सोडून दिली. तेथून पुढे त्यांना पैशाचा स्पर्शही सहन होईना.

एकदा एक श्रीमंत व्यापारी त्यांच्या दर्शनास आला. रामकृष्णांच्या बिछान्यावर घातलेली चादर मळकी, फाटकी दिसली त्याला. ताबडतोब त्याने रामकृष्णांच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी बँकेत दहा हजार रुपये ठेवण्याची तयारी दाखवली. रामकृष्णांनी त्याच्यापुढे हात जोडून तो विषय पुन्हा काढू नये अशी प्रार्थना केली. पण तो व्यापारी आपला आग्रह सोडेचना. रामकृष्णांनी त्याची खूप समजूत घातली. तरीही उपयोग होईना. शेवटी, रामकृष्ण कळवळून ओरडले– 'माते, (कालीमाता) असल्या माणसांना का धाडतेस माझ्याकडे? ते मला तुझ्यापासून दूर नेताहेत ग!' त्यांचा हा आक्रोश पाहिल्यानंतर तो व्यापारी गप्प बसला. या प्रसंगाची आठवण झाली की रामकृष्ण सांगत– 'मधूर बाबू व लक्ष्मी नारायण (त्या व्यापाऱ्याचे नाव) यांचे ते शब्द कानांवर पडल्याबरोबर कोणीतरी माझ्या फासळ्या करवतीने कराकरा कापत आहे असा भास व्हायचा!'

**– माधव मोर्डेकर**

*'मोठ्यांच्या छोट्या गोष्टी' या पुस्तकातून*

❖

# ठिपके जोडा व चित्र रंगवा.



# ‘अनुभव अनुवादाचे...’ लीना सोहोनी यांच्याशी संवाद (नाशिक)




अनुवाद भाषेपल्याड संवाद घडवतो. दोन संस्कृतींची नाळ जोडतो. मेहता पब्लिशिंग हाऊसने अनुवादाच्या माध्यमातून जगभरच्या साहित्यिकांची ओळख मराठी वाचकांना घडवली. चाळीसहून अधिक पुस्तकांच्या अनुवादाचा अनुभव पाठीशी असणाऱ्याा ज्येष्ठ अनुवादक लीना सोहोनी या प्रवासातील महत्त्वाच्या साथीदार आणि साक्षीदारही. १९८७ साली सोहोनी मॅडमनी केलेला पहिला अनुवाद प्रकाशित झाला. अनुवादातली त्यांची ही तीस वर्षांची वाटचाल मराठी साहित्यातल्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर प्रकाश टाकते. त्यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या ‘आखाडा’ या पुस्तकाच्या अनुवादाच्या निमित्ताने नाशिकमध्ये झालेल्या मुलाखतीत त्यांच्या संपूर्ण वाटचालीचा मागोवा घेण्यात आला. मुलाखतकार स्वानंद बेदरकर यांचं समोरच्या माणसाला बोलतं करण्याचं कौशल्य आणि सोहोनी यांचा प्रदीर्घ अनुभव यांचं अनोखं मिश्रण या कार्यक्रमात रसिक वाचकांनी अनुभवलं.

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 July, 2017. Posting Date : 11 July, 2017.

मेहता पब्लिशिंग हाऊस

**मेहता पब्लिशिंग हाऊसचा अभिनव उपक्रम !**




**कमीत कमी ₹१००० MPH वॉलेटमध्ये भरा व वर्षभर या रकमेची पुस्तके घ्या! तसेच वॉलेटमध्ये पैसे भरल्यावर मिळवा ₹१००चे 'एक' पुस्तक मोफत.**
(नियम व अटी लागू*)

**अधिक माहितीसाठी संपर्क : ९४२२०४६५७५**

Website: www.mehtapublishinghouse.com
Email: sales@mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

500 Marathi books Available as e-Book | E-book available : play.google.com/store/books | m.dailyhunt.in/Ebooks/marathi | www.amazon.in

## मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनिल अनिल मेहता हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट २०/१डी /१ अ, सोमवार पेठ,महाराजा लॉज मागे, पुणे ४११ ०११.